# माणूस

किंमत पन्नास पैसे

९ डिसेंबर १९७२



मानस आणि तत्त्वविचार धनंजय कीर

पन्नास पैसे

शनिवार
९ डिसेंबर १९७२

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : सत्तावीस



## सप्रेम नमस्कार

२ डिसेंबर, ७२

□ दोन डिसेंबरचा 'माणूस' वाचला. आवडला. निळू दामले तळमळीने लिहितात. त्यांना अधिक लिहिते करावे.

आपले '२८ नोव्हेंबर' वाचले. आपण फार सूत्ररूपाने लिहिता ही माझी प्रेमाची तक्रार या स्फुटाबद्दलही आहेच ! आपल्या मनातील चिंतन फार व्यापक असेल–आहेच. पण वाचकांना मधले दुवे फॉलो होणे कठीण जाते. टिळक–फुले यांना ६०–४० टक्के असे काही मार्क देणे हे मूल्यमापन जरा ढोबळ वाटते, नाही का ?

म. फुले यांच्याविषयी 'माणूस'ने अधिक विस्तृतपणे लिहिले पाहिजे–फार मोठा माणूस होता तो !

**चंद्रशेखर मराठे**, पुणे

२५ नोव्हेंबर, ७२

□ दिवाळी अंक वाचून–मोकाशींचं मुक्तचिंतन, मराठ्यांचा लेख, मीननाथ जोशींची गझल आणि रवींद्र पिंग्यांचा कुमारांवरचा लेख टॉप. भाऊची यंदाच्या दिवाळीची भंकस म्हणजे गुरुदत्तवरचा लेख. चार-दोन इकडचे तिकडचे तुकडे ठिगळं लावल्यागत. मनापासूनचं वाटतं नै. अशोक शहाणेकडून अनुवाद वेळेवर अन् सगळा मिळाला–मिळवलात हेच मोठं यश. असो.

**चंद्रकांत कल्लोळी**, कोल्हापूर

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणं ३० : दूरध्वनी : ५७३५१

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**

# दुष्काळातही म्हैसाळ प्रयत्नाचे पाऊल मागे हटता कामा नये

एक पत्रकार

हरिजनांवर होणाऱ्या अत्याचारांमुळे दलितांच्या प्रश्नाची चर्चा महाराष्ट्रात पुन्हा जोराने चालू झाली आहे. विचारवंत या प्रश्नाबाबत विविध मते, दृष्टिकोन मांडतात. पण, हरिजनांना आर्थिकदृष्टया स्थिर पायावर उभे केल्याखेरीज दलितांचा प्रश्न सुटणार नाही, याच निष्कर्षाशी अखेर बहुतेकजण येऊन थांबतात.

हरिजनांना आर्थिकदृष्टया स्थिर पायावर उभे करण्याचे ध्येय उराशी बाळगून म्हैसाळ नामक गावी गेली काही वर्षे एक प्रयोग चालू आहे. म्हैसाळ हे मिरजेपासून ६ मैलांवर कृष्णेकाठी असलेले एक गाव. वस्ती सुमारे ७-८ हजार. त्यातच दोन-एकशे हरिजन कुटुंबे. बव्हंशी महार तर काही चांभार व काही मांग. सर्वांचे उदरनिर्वाहाचे साधन मात्र एकच. ते म्हणजे शेतमजुरी. पूर्वी या मंडळींच्या जमिनी होत्या. पण काही गावगुंडांनी घशात घातल्या तर बाकीच्या सावकारांकडे गहाण पडल्या. पाठोपाठ हरिजनांची गुलामसदृश अवस्था झाली. सालमजूर म्हणून अत्यल्प वेतनावर कुटुंबेच्या कुटुंबे सावकारांकडे राबू लागली. लग्नासाठी, मयताच्या क्रियाकर्मासाठी काढलेली कर्जे वाढत गेली. हरिजनांचा पाय अधिकाधिक खोलात जाऊ लागला. आठवड्यातून दोन-दोन, तीन तीन दिवस चूल पेटू नये हा नियम बनला.

पण १९६५ साली म्हैसाळचेच एक रहिवासी श्री. मधू देवल यांच्या पुढाकाराने काही हरिजन मंडळी एकत्र आली. श्री. देवल बी. एससी. झालेले असून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनेक वर्षे प्रचारक होते. महाराष्ट्रात १९५२ सालीही तीव्र दुष्काळ पडला होता. त्यावेळी कै. डॉ. धनंजयराव गाडगीळांनी मध्यवर्ती दुष्काळ निवारण समितीतर्फे श्री. देवल यांना नासिक भागात दुष्काळ निवारण कार्यासाठी पाठविले होते. 'एक कुशल व सचोटीचा कार्यकर्ता' असा श्री. देवलांचा गौरव डॉ. गाडगीळांनी केला होता. रोह्याला श्री. देवल काही वर्षे शिक्षक होते. तेथून शेती करण्यासाठी ते म्हैसाळला गेले व अल्पावधीतच त्यांनी हरिजनांमध्ये कामास प्रारंभ केला. म्हैसाळला सरकारी दुग्धविकास योजना आली होती. पण कधीच दुग्ध-व्यवसाय केला नसल्यामुळे हरिजन मंडळी म्हशी घेण्यास तयार नव्हती व हरिजनांना यासाठी उद्युक्त करावे, असा विचार योजनेच्या प्रवर्तकांनाही कधी सुचला नव्हता. पण देवलांनी हरिजनांना पुनः पुन्हा एकत्र आणून या योजनेचे फायदे समजावून दिले. प्रथम

एकच हरिजन तयार झाला. पण त्याचे म्हशीचे कर्ज एका वर्षात फिटलेले पाहिल्यावर इतरही मंडळी पुढे सरसावली. गतवर्षीपर्यंत ७० ते ७५ हरिजन कुटुंबात १ पासून ४ पर्यंत म्हशी आल्या होत्या. ज्यांच्या मुलांना ८–१५ दिवसांनी सावकाराच्या घरचे शिळेपाके ताक चाखायला मिळे, त्यांची मुले मधूनमधून का होईना, घरचे दूध पिऊ लागली. दही ही त्यांना नवलाची वस्तू राहिली नाही.

दूध योजनेमुळे जो आत्मविश्वास झाला, त्याचे दृश्य फलित म्हणजे हरिजनांच्या 'श्री. विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटी या संस्थेची स्थापना. यासाठी जमीन कोठून आणली ? काहींकडे अर्धा, पाऊण एकर जिराइत रान होते. पण चांगली जमीन सावकारांकडे गहाण होती. त्यापैकी काही सोडविणे जरूर होते. श्री. देवल यांच्याच पुढाकाराने दीर्घ मुदतीच्या ठेवी उभारण्यात आल्या. ठेवींचा आकडा आहे दीड लक्ष रुपये. ३५ एकर जमीन हाती येताच, मा. वसंतदादा पाटील यांच्या हस्ते १ जानेवारी १९६९ रोजी संस्थेच्या कार्याचा शुभारंभ झाला. महाराष्ट्रात, हरिजनांची ही पहिलीच बहुधा एकमेव शेती सहकारी संस्था असावी.

आज या संस्थेकडे १०० एकर जमीन असून, ९५ हरिजन कुटुंबे संस्थेत सामील आहेत. यापैकी साठ एकर जमीन पाण्याखाली आली असून त्यात यंदा ऊस, गहू, कपाशी ही पिके घेण्यात आली आहेत. एक एकर द्राक्ष बाग फुलते आहे, तर गुरांसाठी ४ एकरात वैरणही पिकविण्यात येत आहे. स्वतःच्या जमिनी पिकांनी अशा बहरून निघाल्याचे दृश्य पाहिल्याचे म्हैसाळच्या हरिजनांना तरी आठवत नाही. नुकतेच काही पत्रकार संस्थेचे कार्य पाहण्यासाठी म्हैसाळला गेले होते. संस्थेच्या सदस्यांनी त्यांना अभिमानाने सांगितले की, चालू दुष्काळामुळे गावात अनेकांच्या घरी उपास घडू लागले आहेत. पण आमच्या संस्थेच्या एकाही सदस्याला आम्ही अद्याप तरी उपाशी राहू दिले नाही. यंदाच्या वर्षी १॥ ते १॥। लक्ष रुपयांपर्यंत शेतीमालाचे उत्पादन व्हावे. संस्थेत ज्यांनी आपल्या जमिनी समाविष्ट केल्या, त्यांना संस्था मोठ्या प्रमाणात खंड देणार आहे. यंदा शेतमजुरांच्या मजुरीची रक्कम ४० हजार रुपयांपर्यंत जाईल. फायदा उरेल त्यातून ठेवींचे व्याज व उरलेल्या जमिनीची सुधारणा हे खर्च करावे लागतील. कर्जफेड हा लांबचा टप्पा आहे.

चालू दुष्काळाने मात्र संस्थेला थोडी माघार आली आहे. या दुष्काळामुळे साऱ्या महाराष्ट्राची पाचावर धारण बसली असताना, म्हैसाळचे हरिजनच या तडाख्यातून कसे वाचू शकतील ? संस्थेची ३०–३५ एकर जिराईत जमीन आहे. तेथे यंदा काहीही पीक आले नाही. जुलैमध्ये थोडासा पाऊस झाल्यामुळे पेरण्या झाल्या. पण पिके फूटभर उंच होऊन नंतर पाण्याभावी पळून गेली. हरिजनांचा मुख्य व्यवसाय शेतमजुरीचा. पण यंदा शेतात कामेच

नसल्यामुळे त्यांची परवड झाली आहे. मात्र, दुष्काळामुळे सर्वात जबर फटका बसला असेल तर तो छोट्या दूध व्यावसायिकांना. म्हैसाळच्या ७०–७५ हरिजन कुटुंबात हा व्यवसाय सुरू झाला होता. पण दाणा-वैरण इतकी कडाडली आहे की, ३०–३५ कुटुंबांना यापूर्वीच आपल्या म्हशी विकाव्या लागल्या आहेत. बाकीचे अद्याप कसाबसा नेट धरून आहेत. पण दुष्काळाची वाढती तीव्रता लक्षात घेतली तर या कुटुंबांनाही म्हशी ठेवणे शक्य होईल की नाही, शंकाच आहे.

म्हैसाळच्या हरिजनांनी आत्मोद्धारांचा जो अभिनव प्रयोग चालविला आहे तो दुष्काळामुळे फसणे घातक ठरेल. म्हैसाळच्या पंचवीशीतील अनेक खेड्यांतील हरिजन बांधव या प्रयोगाकडे आशेने, औत्सुक्याने पहात आहेत. आपणही म्हैसाळकरांच्या पावलावर पाऊल टाकले पाहिजे, असे विचार गावागावातून बोलले जात आहेत. म्हैसाळच्या मंडळींना मधूनमधून इतर गावाच्या हरिजनांकडून चर्चेसाठी आमंत्रणे येतात हे या औत्सुक्याचेचं द्योतक नव्हे काय? पण यासाठी म्हैसाळचा उपक्रम यशस्वी झाला पाहिजे. ती जबाबदारी केवळ स्थानिक हरिजनांची नाही. ती आहे दलिताबद्दल आस्था बाळगणाऱ्या सर्व महाराष्ट्रीय जनतेची.

सावकाराकडून जमिनी सोडविण्यासाठी व कर्जात बुडालेले सालमजूर मुक्त करण्यासाठी शेती संस्थेने १॥ लक्ष रुपयांचा कर्जाचा बोजा शिरावर घेतला आहे. तो जसा उतरविला गेला पाहिजे, तद्वतच दुष्काळामुळे म्हशी विकण्याची पाळी हरिजनावर येऊ देता कामा नये. कोणत्याही धंद्याचे जसे असते, तसे या दुग्ध-व्यवसायाचेही आहे. एकदा बंद झाला तर तो पुन्हा सुरू व्हायला काही वर्षे जावी लागतील. पुढे पडलेले पाऊल मागे येईल. तसे होऊ द्यायचे नसेल तर आपला मदतीचा हात पुढे व्हावा. गेल्या वर्षी संस्थेच्या कर्जफेड निधीसाठी जे आवाहन करण्यात आले होते. त्याला इष्ट प्रतिसाद मिळाला. २० हजार रुपयांवर देणग्या संस्थेकडे आल्या. पण दलिताबद्दल आस्था बाळगणाऱ्या लोकांची संख्या व संस्थेची गरज यांचा विचार करता ही रक्कम समाधानकारक मानता येईल काय? दुष्काळामुळे संस्थेची गरज कितीतरी वाढली आहे. महाराष्ट्रातील सुबुद्ध जनता एक नमुनेदार कार्य फसू देणार नाही, अशी आमची खात्री आहे.

□ □ □

# पुणे वार्ता

## नाट्याचार्यांचे पुण्यस्मरण

प्रनिनिधी

कोल्हटकर आणि केळकर यांच्यानंतर नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर उर्फ काकासाहेब खाडिलकर यांची जन्म-शताब्दी नुकतीच साऱ्या महाराष्ट्रात साजरी झाली. काकासाहेबांच्या स्मृतीस आदरांजली वाहताना अर्थातच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीने आघाडी मारली. कारण ११ नोव्हेंबर पासून सुरू झालेला पुण्यातील हा समारोह २ डिसेंबरपर्यंत म्हणजे तब्बल बावीस दिवस चालू होता. यात मुख्य पुढाकार महाराष्ट्र साहित्य परिषदेचा होता आणि त्यांना सहाय्य झाले होते ते केसरी-मराठा संस्था, भरत नाट्य संशोधन मंदिर, पुणे महानगरपालिका, पुणे विद्यापीठ अशा विविध संस्थांचे ! निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनी एकत्र येऊन एखादा कार्यक्रम (चांगल्या प्रकारे) पार पाडणे हे दृश्य पुण्यात तरी दुर्मिळच ! यावेळी झालेल्या संपूर्ण सोहळ्यात एका न उमजलेल्या कार्यक्रमाचा उल्लेख करणे अस्थानी ठरणार नाही. हा कार्यक्रम म्हणजे बालगंधर्व रंगमंदिरात केंद्रिय आरोग्यमंत्री उमाशंकर दीक्षित यांच्या उपस्थित झालेला समारंभ. तीन महिन्यापूर्वी

केळकर जन्मशताब्दीच्या वेळीही असाच एक कार्यक्रम गंधर्व रंगमंदिरात झाला. त्यावेळी अध्यक्ष होते अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण. अशा कार्यक्रमांच्या वेळी केंद्रिय मंत्र्याला पाचारण करण्याचा आग्रह समजू शकत नाही. कारण हे मंत्री जेव्हा अशा समारंभासाठी पुण्यात येतात तेव्हा त्यांच्या उपस्थितीचा फायदा घेण्यासाठी इतर अनेक जण अनेक प्रकारचे कार्यक्रम चतुराईने आयोजित करतात. त्यामुळे ठरलेल्या मर्यादित वेळेत कार्यक्रम अक्षरश: उरकण्याची जबाबदारी संयोजकावर येते. केळकर जन्मशताब्दीच्या वेळीही असेच दिसून आले आणि यावेळीही! एकीकडे छायाचित्रकारांची चाललेली धावपळ तर दुसरीकडे वक्त्यांची खुर्चीपासून माईकपर्यंत चाललेली पळापळ! डॉ. रा. शं. वाळिंब्यांना यासंबंधी विचारले असता ते म्हणाले का 'हे चालायचेच हा पुणे शहरातर्फेचा कार्यक्रम असतो. तेव्हा तो घाईत उरकला जाणारच! लग्नसमारंभात नाही का काही कार्यक्रम घाईगर्दीत उरकले जात?' याच्या उलट भरत नाट्य संशोधन मंदिरात झालेले कार्यक्रम व व्याख्याने अविस्मरणीय ठरली. खर्चाच्या बाबतीतही पाहिल्यास भरत नाट्यमधील संपूर्ण आठवडाभराच्या कार्यक्रमांना मिळून अगदी नाममात्र खर्च झाला तर बालगंधर्व रंगमंदिरातील एकाच कार्यक्रमाला दोन हजार रुपये खर्च झाले! (ही माहिती डॉ. भीमराव कुलकर्णींनी जाहिरपणे सांगितली.)

तीन आठवड्यापूर्वी केसरी ऑफिसमध्ये 'खाडिलकरांचे राजकारण' या विषयावरील परिसंवादाने सोहळ्यास प्रारंभ झाला व सांगता झाली ती डॉ. गो. के. भट यांच्या 'खाडिलकरांचा विनोद' या व्याख्यानाने! मधल्या काळात भाऊसाहेब माडखोलकर, डॉ. हेमंत इनामदार, वसंत देसाई, नीळकंठ खाडिलकर प्रभृतींनी खाडिलकरांच्या एकेक पैलूचे गुणगान केले. सौ. इंदिराबाई खाडिलकर व बाबुराव जोशी यांनी संगीत कार्यक्रम पेश केले. खाडिलकरांच्या गाजलेल्या नाटकांचे प्रयोगही सादर करण्यात आले. हे सर्वच कार्यक्रम अत्युत्कृष्ट झाले. त्यातील एका व्याख्यानाचा उल्लेख करतो.

## पत्रकार खाडिलकर

'पत्रकार खाडिलकर' या विषयावर खडिलकरांचे नातू व दैनिक 'नवाकाळ'चे संपादक श्री. नीळकंठराव खाडिलकर यांचे व्याख्यान झाले, खाडिलकरांच्या पत्रकारित्वाबाबत बरेच काही लिहिले गेले आहे. पण काही घरगुती घटनांच्या अनुषंगाने नीळकंठराव बोलतील अशी श्रोत्यांची अपेक्षा होती. पण प्रथमत:च त्यांनी हा फुगा फोडला. कारण पत्रकार या नात्याने काकासाहेब १९३० साली निवृत्त झाले व नीळकंठरावांचा जन्म झाला १९३० मध्ये, काकासाहेबांच्या मृत्यूच्या वेळी नीळकंठराव १३ वर्षांचे होते. पण थोड्या अंधुकशा आठवणी व काकासाहेबांच्या चरित्राचे चिंतन यांच्या

सहाय्याने नीळकंठरावांनी विषय असा काही गुंफला की बरेच दिवस तो स्मरणातून न जावा !

नीळकंठराव म्हणाले की, " काकासाहेब हे वीरवृत्तीचे म्हणून ओळखले जात. पण त्यांच्या वीरवृत्तीला चिंतनशीलतेची बैठक होती. ग्रंथातील प्रत्येक वाक्य वाचल्यावर ते त्यावर चिंतन करीत. महाभारतात भीष्म-द्रोणाचार्यांनी वारंवार काढलेल्या 'अर्थस्य पुरुषो दास:' या उद्‌गाराचा प्रचलित अर्थ म्हणजे माणूस द्रव्याचा गुलाम आहे. पण काकासाहेबांनी यावर खूप विचार करून वरील वाक्याचा नवीन अर्थ काढला. अर्थस्य पुरुषो दास: म्हणजे माणूस पुरुषाचा दास आहे !" खरं म्हणजे वरील उक्तीचा प्रचलित अर्थ जो आहे तोच भीष्म-द्रोणाचार्यांना महाभारतात अभिप्रेत आहे. पण खाडिलकरांनी 'अर्थ' याचा पुरुषार्थ हा जो अर्थ काढला त्यात त्यांच्या मनोवृत्तीचेच प्रतिबिंब दिसते. कारण काकासाहेबांनी आपल्या उभ्या आयुष्यात पुरुषार्थच गाजविला. त्यासाठीच ते लढले. नीळकंठरावांनी त्यांच्या वीरवृत्तीसंबंधी एकदोन घटना सांगितल्या.

काकासाहेब १८९६ साली केसरीत गेले. पण त्यांनी केसरी सोडला. कारण १९१० साली एक दिवस अचानक संपादक म्हणून न. चिं. केळकरांचे नाव केसरीवर झळकले. त्यांच्या मानीवृत्तीला हे सहन झाले नाही. त्यांनी केसरीचा तात्काळ राजीनामा दिला. पुढे टिळकांच्या मृत्यूपूर्वी केसरीचा ट्रस्ट करण्याची कल्पना निघाली. काकासाहेबांनी विश्वस्त म्हणून काम पहावे असे प्रयत्न झाले. पण काकासाहेबांनी सांगितले की, 'मी तयार आहे पण केसरी किंवा मराठा यापैकी एक पत्र संपूर्ण माझ्या ताब्यात दिले पाहिजे.' पण ते तसेच राहून गेले. नंतर टिळकांच्या मृत्यूनंतर परत एकदा काकासाहेबांना विचारणा करण्यात आली. पण त्यांनी पूर्वीचीच मागणी केली. त्यांना नकार मिळाला व इथेच काकासाहेबांचा केसरीबरोबरचा ऋणानुबंध संपला ! पुढे ते मुंबईच्या 'लोकमान्य' दैनिकाचे संपादक झाले. त्यावेळी लोकमान्यच्या डायरेक्टरने उद्‌गार काढले की, 'लोकमान्य' पत्र हे केवळ लोकमान्य या नावाच्या पुण्याईवर चालते. हे म्हणणे खाडिलकरांना उघडउघड

## गिरीविहाराचे गिर्यारोहण शिबीर

अनुभवी व तज्ज्ञ शेर्पांच्या देखरेखीखाली कान्हेरी गुंफा, मुंबई येथे दि. ३ ते ७ जानेवारी पर्यंत वरील शिबीर भरविण्यात येणार आहे. राहण्या-जेवण्याचे शुल्क रु. ३०. शिबिरार्थींनी शुल्क भरून नाव नोंदविण्याची अखेरची मुदत सोमवार दि. २५ डिसेंबर १९७२.

पत्रव्यवहारासाठी पत्ता :–

प्रा. आनंद चांदेकर

११५ विष्णुप्रसाद हौसिंग सोसायटी,
महात्मा गांधी रोड, विले–पार्ले (पूर्व)
मुंबई–५७

आव्हान ठरले. ते ताबडतोब 'लोकमान्य'मधून बाहेर पडले व स्वतःचे 'नवाकाळ' हे पत्र काढले. 'नवाकाळ' चालू राहिला व 'लोकमान्य' बंद पडले. नंतर २९ साली ते तुरुंगात गेले व परत आल्यावर वृत्तपत्र सृष्टीतून निवृत्त झाले. 'नवाकाळ' त्यांनी सुरू केला तो आपला पुरुषार्थ सिद्ध करायचा होता म्हणून! नवाकाळ चालू असतानाच लोकमान्य बंद पडला, त्यामुळे त्यांची कर्तबगारी आपोआपच सिद्ध झाली.

अर्थात ते इतक्या तडफदार वृत्तीने वागू शकले कारण नाट्यलेखनाची कला त्यांना अवगत होती. पडत्या काळात त्यांच्या नाटकांनीच त्यांना हात दिला. 'नवाकाळ'ची सुरुवातीची तूट त्यांनी नाटकाच्या उत्पन्नातून भरून काढली. त्यांनी केसरीचा राजीनामा दिला ही गोष्ट घरी कळविली नाही. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे ते घराबाहेर पडले व वही-पेन्सिल घेऊन परत घरी आले. घरून विचारणा झाली, त्यावेळी ते शांतपणे म्हणाले, 'मी केसरी सोडलाय आणि आता 'मानापमान' नाटक लिहिणार आहे!' काकासाहेबांच्या नाटकांची पुण्याई आजही नीळकंठरावांच्या पाठीशी उभी आहे. ते म्हणाले, 'आजही काकासाहेबांच्या नाटकाच्या रॉयल्टीची रक्कम मला पुरेशी आहे!'

खाडिलकरांना अध्यात्माची आवड नव्हती. पण लहानपणी एकदा पाण्यात बुडत असताना त्यांना 'अदृश्य शक्ती'चा प्रत्यय आला आणि या अदृश्य शक्तीचा कौल पुढे त्यांनी वारंवार मानला. त्यांनी पुस्तक प्रसिद्ध केले की शेवटच्या पानावर त्यांच्या आगामी पुस्तकाची जाहिरात असायची. त्यांचे सहावे पुस्तक प्रसिद्ध झाले त्यावेळी पुढील पुस्तकाची जाहिरात छापायची नजरचुकीने राहून गेली. या घटनेतून त्यांनी अर्थ असा काढला की, यापुढे आपण पुस्तक प्रसिद्ध न करावे हीच नियतीची इच्छा असणार!—आणि खरोखरच त्यांनी पुढे पुस्तके लिहिणे बंद केले.

नीळकंठरावांनी नंतर खाडिलकरांच्या जीवनातील नाट्याचे वर्णन केले. नाटकात जसा आरंभ आणि अंत यांच्यात एक दुवा असतो तसाच प्रकार काकासाहेबांच्या अनेक कार्यक्षेत्रात दिसून आला. नीळकंठरावांनी याची अनेक उदाहरणे दिली. त्यापैकी एक असे. खाडिलकर केसरीत असताना त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखाबद्दल टिळकांना सजा झाली. ही गोष्ट खाडिलकरांना खूप लागून राहिली. पुढे नवाकाळमध्ये न. र. फाटकांच्या एका अग्रलेखामुळे खटला उभा राहिला. पण खाडिलकरांनी फाटकांना गप्प बसायला सांगून अग्रलेखाची जबाबदारी स्वतःवर घेतली व एक वर्षाचा तुरुंगवास भोगला!

खाडिलकरांनी वृत्तपत्रव्यवसायाचे उदात्तीकरण जसे केले तसे आधुनिकीकरणही केले. साखळी वृत्तपत्रे काढण्याची 'भांडवलदारी' योजनाही त्यांनी विचारात घेतली होती. 'स्वाधीन भारत' नावाचे हिंदी दैनिक काढले व

एका गुजराती दैनिकाचीही तयारी केली. तसेच टाईप फौंड्री सुरू करून जॉब वर्क करण्यासही सुरुवात केली. पूर्वी पी. टी. आय. वृत्तसंस्थेच्या तारा येत. या तारा स्वीकारणारे नवाकाळ हे पहिले दैनिक ! नंतर पी. टी. आय..ने जेव्हा यंत्रे केली तेव्हा ही यंत्रे टाईम्स व नवाकाळ यांनीच प्रथम आपल्या कचेरीत बसविली. त्याचप्रमाणे वृत्तपत्रात फोटोचे ब्लॉक करून छापण्यास त्यांनीच प्रथम सुरुवात केली व पुढे इतरांनी ती अवलंबिली. तसेच बातम्या-जाहिराती यांची सुयोग्य मांडणी करून वृत्तपत्राचा तोल न बिघडू देणारी 'मेट अप्'ची कल्पनाही त्यांनीच प्रथम अंगीकारली !

पत्रकार हा न्यायाधीश नसावा, तर वकील असावा असे केळकरांच्या अगदी विरुद्ध असे—खाडिलकरांचे म्हणणे होते. हेही बरोबर आणि तेही बरोबर अशी मध्यस्ताची भूमिका पत्रकाराने घेतली की तो संपलाच ! कुठलीही एकच बाजू घेऊन त्याचा हिरीरीने प्रचार पत्रकाराने केला पाहिजे असे ते म्हणायचे. वर्तमानपत्राचा निवडणुकीच्या प्रचारासाठी कसा खुबीने उपयोग करावा हेही काकासाहेबांनी दाखवून दिले. नीळकंठरावांनी एक मजेशीर उदाहरण सांगितले. गोपाळराव देशमुख म्युन्सिपालटीच्या निवडणुकीसाठी उभे होते. त्यांच्या प्रचारसभेसाठी स्वत: काकासाहेब गेले. सभा होती कामगारांच्या एका चाळीत. वक्ते सभास्थानी आले तरी श्रोत्यांचा पत्ताच नव्हता. घरात जाऊन मंडळींना बोलाविण्यात आले. पण तरीही कुणी आले नाही. अखेर दोन चार लहान मुले येऊन बसली. गोपाळरावांचा धीरच खचला. पण काकासाहेबांनी त्यांना सांगितले, तुम्ही काळजी करू नका. नेहमीसारखेच भाषण करा. चांगले जाडजूड शब्द वापरा. तसे त्यांनी केले. आणखी एक दोन वक्त्यांनी व स्वत: काकासाहेबांनी त्या पोरांपुढे अतिशय विद्वत्ताप्रचूर भाषण केले. दुसऱ्या दिवशी 'नवाकाळ' मध्ये पहिल्या पानावर जाड टाईपात बातमी, 'गोपाळरावांची प्रचंड सभेपुढे सिंहगर्जना !' आणि खाली 'सर्वांची भाषणे विस्तृतपणे दिलेली. 'ती वाचून जो तो गोपाळरावांचे अभिनंदन करू लागला. गोपाळराव नंतर निवडून आले हे सांगायला नकोच !—काकासाहेबांचा हा वारसा अनेक पत्रकार आणि स्वत: नीळकंठरावही चालवताना दिसत नाहीत काय ?

असो. तर असे हे अथपासून इतिपर्यंत रंगलेले भाषण. काकासाहेबांच्या वृत्तपत्रव्यवसायातील अवाढव्य कर्तृत्वाची मांडणी मर्यादित वेळात नीळकंठरावांनी कौशल्याने केली. प्रत्येक मुद्द्याचा धागा धरून विवेचन करताना त्यांनी सांभाळलेला तोल अभिनंदनीय होता.काकासाहेबांवर वेळोवेळी झालेल्या टिकेचे निरसन करताना खोटा अभिनिवेश बाळगला नाही तर कधी भावनाविवशही झाले नाहीत.

बरेच दिवसांनी एक चांगले भाषण ऐकायला मिळाले हे नक्की ! □ □ □

# सरळपणाला आजच्या जीवनात स्थान आहे किंवा नाही ?

श्री. ग. सबनीस

एका साखर कारखान्यामार्फत चाललेल्या शाळेत मध्यंतरी वक्तृत्व स्पर्धा झाली. तेथे मी होतो एक परीक्षक. स्पर्धेचा विषय होता, 'सरळपणाला आजच्या जीवनात स्थान आहे किंवा नाही ?' या स्पर्धेला जणू वाग्युद्धाचे स्वरूप आले होते. एका विद्यार्थ्याने होकारार्थी बोलावे तर लगेच दुसऱ्याने त्याच्या मुद्यांचे खंडन करून नकारार्थी उत्तर द्यावे असा हा परिसंवाद अखंड तीन तास चालला होता. शालेय विद्यार्थ्यांचे मनमोकळे विचार ऐकत असताना श्रोत्यांच्या पुढे आजच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे जिवन्त सत्य चित्र उभे रहात होते. आपल्या पुरातन संस्कृतीतील चांगल्या वाईट गोष्टींचे दाखले दिले जात होते. निखारे फुलताना ठिणग्या उडतात त्याप्रमाणे या सवालजबाबातून प्रच्छन्न टीकेचा अंगार फुलत होता. हे बाल वक्ते सध्याच्या शिक्षणसंस्थेपासून ते लोकसभेच्या विविध क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे व वशिलेबाजीचे प्रछन्न वाभाडे काढत होते. उपस्थित शिक्षक, पालक, परिक्षक आदि वडीलधाऱ्या श्रोतेमंडळींना मुलांच्या भाषणातील निस्पृहता, अभ्यासूपणा व बेडरपणा याचे कौतुक वाटत होते. पण त्यावेळी या कोवळ्या वयातील मुलांच्या मनावर 'सरळपणाला आजच्या जीवनात स्थान नाही' असे नैराश्य बिंबले गेले तर या या पिढीचे भवितव्य काय ? त्यांची उमेद, भवितव्यांची सुखस्वप्ने, आकांक्षा यांना उत्तेजनाचे खतपाणी मिळण्याऐवजी त्यांच्यातील नैसर्गिक निष्पाप भावना करपून जाणार नाहीत का ? ही चिंता काही पालक व्यक्त करीत होते. साखर कारखान्याच्या साखर व मद्यार्क निर्मितीच्या गोड व धुंद वातावरणात हा गंभीर विषय चर्चिला गेला व तो खूप रंगलाही ! असा–

## सरळपणाला स्थान नाही

१. शालेय प्रवेशापासून कृषिविद्यापीठ प्रवेश मिळवताना सर्वत्र स्वैर संचार करणारी वशिलेबाजी, भ्रष्टाचार या अनिष्ट प्रथेवर चौफेर हल्ला चढविण्यात आलाच. पण, सरकारी महसूल खाते, पोलीस खाते, सहकारी संस्था आदि क्षेत्रात कांचनाची किमया किती प्रभावी आहे याचे मासलेवाईक किस्से सांगितले.

२. शाळेत 'खरे बोलावे, चोरी करू नये' असा सदुपदेश केला जातो. पण व्यवहारात खोटेपणाला चलती आहे व भलती प्रतिष्ठाही आहे.

३. लाखो रुपये खर्चून अशिक्षित चारित्र्यशून्य उमेदवार लोकसभेला व विधानसभेला निवडून येतो. गरीब व चारित्र्यसंपन्न व्यक्तीला आजच्या लोकशाहीत निवडून येता येत नाही. सरळपणाने काम करणारा कारकून कामाच्या ओझ्याखाली नेहमी दडपून जातो. याउलट खुषमस्करी लाचखाऊ कारकून गबर होतो व त्याला लवकर प्रमोशन मिळते.

४. स्वत:ची तुंबडी भरणे म्हणजेच यशस्वी जीवन समजले जाते. घरी खाण्यासाठी ५–१० किलो तांदूळ सीमाभागातून आणणारा गुन्हेगार ठरतो व परमीटशिवाय ट्रंकांनी तांदूळ आणणारे व लाखो रुपयाच्या सोन्याची चोरटी आयात करणारे शहाजोग ठरतात, टुरिंग गाड्या घेऊन फिरतात.

५. चारित्र्यसंपन्न, सालस, सत्प्रवृत्त देशभक्त आज अर्धपोटी क्वचित उपाशी राहून जीवन कंठीत आहे. तर चारित्र्यशून्य लबाड लुच्ची माणसे सभा संमेलनातून अध्यक्ष, स्वागताध्यक्ष म्हणून मिरवितात व समाजाला त्यागाचा व नीतीमत्तेचा उपदेश करतात.

६. पूज्य बापूंनी साधी राहणी व उच्च विचारसरणीचा आदर्श लोकांपुढे ठेवला पण, त्यांच्या नावाचा सदैव जयजयकार करणारे त्यांचे आजचे वारसदार उच्च राहणी व क्षुद्र विचारसरणी प्रमाणे वागताना आढळतात.

७. 'चिनी-हिंदी भाई-भाई' ही घोषणा कै. पंडीतजींनी केली व चीनने भारतावर पाशवी आक्रमण केल्यावर त्याच पंडीतजींनी 'दुनिया हराम है' असे हताशपणे उद्गार काढले.

८. पाकिस्तान निर्माण होण्यासाठी भारताने फार मोठा त्याग केला त्याच पाकिस्तानने विश्वासघाताने आमच्यावर आक्रमण केले व आजही लाखो निर्वासितांचा भार आमच्यावर नाहक टाकून आम्हालाच आक्रमक म्हणून ठरवू पहात आहेत.

९. आमच्या पुढाऱ्यांनी परदेशी बॅन्कांमध्ये लाखो रुपयाची कमाई ठेवली असल्याचे सांगतात पण, गरीब व मध्यमवर्गाला मात्र त्यास कष्ट करण्याचा मानभावी उपदेश केला जातो.

१०. पोलिसांनी निरपराधी जनतेला संरक्षण देण्याऐवजी दरोडेखोरांना मदत करावी, त्याप्रमाणे अमेरिका पाकिस्तानलाच शस्त्रास्त्रे पुरवित आहे.

११. चांगल्या नाटक सिनेमांची तिकिटे क्यूत उभे राहून मिळत नाहीत पण, दुप्पट तिप्पट किंमतीने काळ्या बाजारात उघडपणे मिळतात. हीच गोष्ट बसच्या प्रवासाची. दादागिरी करून बसमध्ये घुसणाऱ्याला खाली उतरविण्याची कंडक्टरला हिंमत होत नाही. पण, क्यूमध्ये रखडत तासन्तास उभा राहणाऱ्या प्रवाशाला बसप्रवेश मिळेलच असे नाही.

१२. थोरामोठ्यांच्या चिठ्ठ्यावर फडतूस लोकांना सहज नोकरी मिळून जाते पण, गुणवत्तेप्रमाणे नोकरीत स्थान मिळत नाही. या सर्व उदाहरणांचा साधा, सरळ स्पष्ट अर्थ म्हणजे जीवनाची वाट बिकट असली तरी धोपट

मार्ग सोडू नको ' हे जुने तत्त्व बाद होऊन ' पैसा व वशिला यांच्या वाकड्या मार्गाने गेलात तर जीवनाच्या मार्गात काटे नसून सर्वत्र मऊ गालीचे अंथरले आहेत. ' असा अनुभव ह्याच आहे.

## स्थान आहे

१. पौराणिक काळात देखील सरळपणा सर्वत्र नव्हता. भगवान श्रीकृष्ण देखील अनेकदा खोटे बोलले–खोडसाळपणाने वागले. धर्मराजांनी ' नरो वा कुंजरो ' असे दुटप्पी अर्धसत्य सांगितले. एकाही संताच्या जीवनात त्यांना सुख लाभले नाही. नंतरच समाजाने त्यांचा जयजयकार केला आहे.

२. अजूनही समाजात चांगली माणसे आढळतात व त्यांचे कौतुकही होते. पैशाचे विसरलेले पाकिट परत करणारा टांगेवाला भेटतो. चुकलेल्या तरुणीला तिच्या पित्याकडे पोचते करणारा सत्प्रवृत्त नागरिक भेटतो. बुडणाऱ्याला वाचविण्यासाठी स्वतःचा प्राण धोक्यात घालणारा कर्तव्यनिष्ठ तरुण आजही आढळतो.

३. व्यापारी लाखो रुपये मिळवितात पण तितक्याच मोठ्या रकमेच्या देणग्या संस्थांना देतात. देवालये बांधण्यात खर्च करतात. त्यांचे जुने शिक्षक भेटले तर त्यांच्याशी आदराने वागून आपल्या मोटारीतून प्रेमाने घरी घेऊनही जातात.

४. केवळ पैशाचेच राज्य असते तर कै. लालबहादूर शास्त्रींसारखी बटूमूर्ति आपल्या देशाचे पंतप्रधान कधी झाली नसती. आचार्य विनोबांसारख्या संतांना समाजाने मान दिला नसता.

५. वास्तविक सत्याचाच नेहमी अंतीम विजय होत असतो. आज जी माणसे केवळ सत्तेमुळे व संपत्तीमुळे श्रेष्ठपदाला पोहोचली आहेत त्यांचे श्रेष्ठत्व वरवर दिसणारे क्षणिक आहे. चांगुलपणा जाणण्याची कृतज्ञता अजून समाजात आहे. म्हणूनच कै. लोकमान्य टिळक, कै. स्वातंत्र्यवीर सावरकर, कै. महात्मा गांधी व कै. महात्मा फुले या थोर व्यक्तिंच्या चारित्र्याचा सुगंध आजही दरवळत आहे.

६. सरळपणा म्हणजे काय ? हे आधी सरळ ठरले पाहिजे. युनो सारख्या शस्त्रसंधीचा जागतिक संदेश देणारी जागतिक संस्था आहे. लोकांची धर्म व संस्कृतीवर अजूनही नितांत श्रद्धा आहे. ' सर्वच बिघडले ' हा आक्रोश खोटा आहे.

अध्यक्षांनी या परिसंवादाचा समारोप करण्याचे चातुर्याने टाळले असावे. याचा सपर्पक समारोप कसा करावयाचा हाही प्रश्नच आहे. कारण सत्य हे एकच असते त्यात हे ' माझे सत्य ' ' त्याचे सत्य ' अशी फारकत होत नाही. ही समाजाची आजवरची प्रामाणिक समजूत होती. पण, तिला सध्याच्या अर्थप्रधान संस्कृतीत जबरदस्त धक्का बसला आहे हे कटुसत्य आहे ! आजच्या काळात कोणतेही सत्य वादाचा विषय बनते. राजकीय सत्य, न्यायालयीन सत्य, प्रचारी सत्य, वृत्तपत्रीय सत्य पक्षीय सत्य व व्यवहारी सत्य अशी खऱ्या (?) सत्याची राजरोस विटंबना सुरू आहे. तेव्हा या बिचाऱ्या निष्पाप विद्यार्थ्यांना आजच्या गुंतागुंतीच्या जीवनात अचूक सत्याचा शोध कसा घेता येणार ? □ □ □

# आ ले पा क

■ मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री पी. सी. शेठी म्हणाले : मुख्यमंत्री होण्यापेक्षा दिल्लीच्या अशोक हॉटेलात आचारी व्हावे असे अनेकदा मला वाटते.

आचारी होणे म्हणजे खायचे काम नाही आहे.

■ कोणी म्हणतात की आध्यात्मिक गुरू म्हणजे समाजातील सायकियाट्रिस्ट आहेत.

हे म्हणजे विवाहाला शरीरसंबंध म्हणण्यासारखे आहे.

■ महाराष्ट्रराज्याचे गृह व प्रसिद्धी खात्याचे राज्यमंत्री श्री. शरद पवार एका व्याख्यानात म्हणाले : शिवछत्रपतींचा वारसा मागणाऱ्या महाराष्ट्रातून आज लष्करात चांगली भरती होत नाही.

शिवछत्रपतींपेक्षा नवा महाराष्ट्र प्रतिशिवछत्रपतींचाच वारसा अधिक सांगतो; त्यामुळे साहजिकच सगळी भरती काँग्रेसमध्येच होते.

■ भारतातील ग्रंथविक्रीच्या व्यवस्थेबाबत केलेल्या पाहणीत पुस्तक-दुकानदारांनी सांगितले की दुकाने इतकी लहान असतात की तेथील पुस्तकांच्या आणि ग्राहकांच्या गर्दीमुळे नवी प्रकाशने प्रदर्शित करण्याएवढी जागा उपलब्ध नसते.

शिवाय लॉटरीच्या तिकिटांना जागा लागते ती वेगळीच.

■ श्रीमती इंदिरा गांधी म्हणाल्या : नगर सुधारण्यास स्त्रियांनी घराबाहेर पडावे.

त्यावेळी घर सुधारण्यासाठी पुरुषांनी घरात राहावे.

■ मीनाकुमारीवर लिहिल्या जाणाऱ्या एका लेखमालेच्या प्रस्तावनेत म्हटले आहे : अशी मीनाकुमारी—समजली अशी वाटावी आणि तरीही खूप न समजलेली, न उमजलेली.

अरेच्या हे तर आमच्या आणि तुमच्या आणि त्यांच्या बायकोचेच वर्णन झाले.

■ मुंबईतील प्रभादेवी येथील सुप्रसिद्ध सिद्धिविनायक देवालयाच्या पुजाऱ्याने दादरच्या हिंदू कॉलनीत ओनरशिप बेसिसवर फ्लॅट घेतला आहे, असे म्हणतात.

खरे म्हणजे त्याने ओनरशिप बेसिसवर आणखी एक देऊळच घ्यायचे !

■ एक वार्ता : एअर-इंडियाचे पर्सोनेल मॅनेजर श्री. नंदा यांना शिवसैनिकांनी मारहाण केली. त्यावेळी सेनापती श्री. बाळ ठाकरे उपस्थित होते.

ठाकरे यांना आम्ही 'ठोक-रे' म्हणतो ते बरोबरच आहे.

■ 'स्त्री' मासिकाच्या दिवाळी अंकात 'स्त्रीचे स्त्रीत्व कशात आहे?' या विषयावर एक परिसंवाद आहे.

आमच्या मते 'स्त्री'चे 'स्त्री'त्व 'मनोहर' आणि 'किर्लोस्कर'मध्ये आहे!

■ एक नाट्यसमीक्षक एका परीक्षणात तळतळून लिहितात: हे नाटक रूपांतरित आहे ही वस्तुस्थिती कटाक्षाने अनुल्लेखित ठेवण्यात आली होती. मूळ लेखक व नाटक यांचे ऋण मान्य करायला मराठी नाटककारांना इतकी लाज का वाटते कुणास ठाऊक!

कुणास ठाऊक? मूळ लेखकाला मात्र जरूर लाज वाटत असावी.

■ 'सोवत' साप्ताहिकात 'ब्रेख्ट आणि माडगूळकर' या विषयाच्या निमित्ताने दिलेल्या आत्मचरित्रपर माहितीत श्री. प्र. ना. परांजपे म्हणतात: गेली नऊ वर्षे इंग्रजीचा प्राध्यापक म्हणून मी काम करतो आहे. ब्रेख्टचे 'द लाईफ ऑफ गॅलिलिओ' हे नाटक मी तीन वर्षे शिकवलेले आहे.

त्याच्या एवढ्या गमजा कसल्या सांगता परांजपे? आम्ही तर एकच विषय एकाच पद्धतीने तीस तीस वर्षे शिकवणारे प्राध्यापकबहाद्दर पाहिले आहेत. या प्राध्यापकांपुढे तुम्ही म्हणजे अगदी ब्रेख्टपुढे माडगूळकर. ◻

## आठ पत्रांची किंमत

नुकतेच आम्ही श्री. ह. वि. मोटे प्रकाशनाचे 'विश्रब्ध शारदा' हे पुस्तक पाहिले. ('पाहिले' याचा येथे अर्थ चाळले, वाचले किंवा पाहिले.) त्यातील पत्रसंग्रह पाहून मी थक्क होऊन गेलो. पत्रातूनसुद्धा चिंतन प्रकट करणाऱ्या, मार्मिक विश्लेषण करणाऱ्या, मौलिक विचार मांडणाऱ्या या पत्रलेखकांबद्दल केवढा थोरला आदर वाटायला लागला. कारण आम्ही आधी पत्रच लिहीत नाही; कधीमधी लिहिलेच तर भरघोस मायना आणि खाली, प्रसंगानुरूप, खुशाली वा बिनखुशाली. आता आमच्या या असल्या पत्रातून सद्य:कालीन समाजस्थितीवर काय प्रकाश पडत असेल कोण जाणे.

पत्रे लिहिण्याबद्दल मला थोडासुद्धा उत्साह वाटत नाही याचे आणखी एक कारण आहे. मोबदल्याशिवाय एक शब्दही न लिहिण्याचे माझे ब्रीद आहे. त्यामुळे मोबदल्याबद्दल पूर्ण उदासीन असणाऱ्या तमाम मराठी साहित्यिकांचा मला अचंबा वाटतो. खरे म्हणजे त्यांनी पत्रव्यवहाराबद्दल मोबदला मागितला पाहिजे, मग भले कोणी तो दिला नाही तरी चालेल. (शहाणेच दिसता. तुम्ही. तुम्ही म्हणजे मी.)

पण पत्रलेखनाबद्दल मोबदला मिळेल अशी आशा वाटण्यासारखी एक बातमी नुकतीच वाचनात आली. १९४९ ते १९५१ या तीन वर्षांत अर्नेस्ट हेमिंग्वेने स्कॉट फित्झेराल्ड या कादंबरीकाराच्या चरित्रकाराला आठ पत्रे लिहिली होती. या पत्रातून हेमिंग्वे आणि फित्झेराल्ड यांच्या संबंधांचे वर्णन आणि माहिती होती. या आठ पत्रांचा हल्लीच जाहीर लिलाव करण्यात आला तेव्हा कोणीतरी त्यासाठी ८६,६०० रुपये मोजले!

इकडे आम्ही मात्र 'विश्रब्ध शारदे'चे कौतुक करता करताच तिच्या आवाक्याबाहेरच्या किंमतीबद्दल तक्रार करतो आहो. ◻

## पो पो पो पो पो पो पो

पुस्तकाला नाव ठेवणे हे कित्येक वेळा प्रत्यक्ष पुस्तक लिहिण्यापेक्षाही अधिक अवघड असते. कारण पुस्तकात काही असले नसले तरी त्याच्या नावात सगळे असावे, असे लेखकाला वाटत असते. यामुळे कधी कधी पुस्तकाला मोठे विलक्षण नाव ठेवले जाते. उदाहरणार्थ नुकतेच एका अमेरिकन प्राध्यापकाने कवी आणि रहस्यकथालेखक एडगर अॅलन पोचे एक चरित्र लिहिले; या चरित्राला त्याने नाव दिले : 'पो पो पो पो पो पो पो'

अलिकडच्या आणखी काही पुस्तकांची पुढील नावे पाहा : प्लीज डोंट इट द डेसीज; एव्हरिथिंग यू ऑल्वेज वॉन्टेड टु नो अबाऊट सेक्स; राइट यू आर इफ यू थिंक यू आर; द मिल्क ट्रेन डजन्ट स्टॉप हियर अेनी मोअर; ओ डॅड, पुअर डॅड, ममाज लॉक्ड हिम इन द क्लॉजेट अँड आयॅम फीलिंग सो सॅड; द परसिक्यूशन अँड ॲसासिनेशन ऑफ जां-पॉल मारात अॅज प्रेझेंटेड बाय द इनमेट्स ऑफ द असायलम अॅट चारेंटॉन अंडर द डायरेक्शन ऑफ द मारक्वी द साद. ◻

## एका दिवसाचे दोन दिवस

तुमच्या-माझ्यासारख्या सरळमार्गी माणसांचा दिनक्रम सामान्यत: सारखा असतो. भरपूर झोप आणि उरलेल्या वेळात जमेल त्यापेक्षा थोडे कमी का, अशी दिवसरात्रीच्या चोवीस तासांची सोयीस्कर विभागणी करून आपण मोकळे होतो. थोर मंडळी चोवीस तासांची काही वेगळी विभागणी करतात; किंबहुना चोवीस तासांची वेगळी विभागणी करणारी मंडळी थोर होतात, असा माझा अनुभव आहे. दुसऱ्या महायुद्धातील ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्या मते माणसाने दुपारच्या झोपेचा (रात्रीची ती वेगळीच) परिपाठ ठेवल्यास त्याला एका दिवसाचे दोन दिवस करता येतात. चर्चिल यांच्या कार्याचे प्राचंड्य पाहता एकाचे दोन दिवस करण्याची किमया त्यांना साधली होती, हे इतिहासाला कबूल करावे लागेल.

पण चर्चिलना जे साधले ते सामान्यांनाही साधेल असा डॉ. मिचेल सिफर या तरुण (वय ३३) फ्रेंच शास्त्रज्ञाचा विश्वास आहे. कार्यरती आणि विश्रांती यांनी बनलेली दिनचक्राची चोवीस तासी गती बदलून छत्तीस तास काम आणि बारा तास विश्रांती अशी नवी गती दिनचक्राला देता येईल, असे डॉ. सिफरना वाटते. दिवस असा अट्ठेचाळीस तासाचा झाला म्हणून माणसाचे काही बरेवाईट होणार नाही, झाले तर कामच अधिक होईल, अशी ही कल्पना आहे.

आता अशा कल्पना काय आम्हाला सुचत नाहीत ? सुचतात. पण म्हणून काही लगेच त्या पारखून घेण्याचा वेडेपणा आम्ही करत नाही. पण हे त्या

फ्रेंच अण्णांना कोणी सांगावे. त्यांनी सरळ स्वत:ला टेक्सासमधील एका गुहेत सहा महिने कोंडून घेण्याचे ठरवले. तेथे एका दिवसाचे दोन दिवस करण्याचा आपला प्रयोग ते कसाला लावत आहेत. डॉक्टरसाहेबांना भूमिगत होऊन दोन महिने झाले. आता त्यांनी दिनचक्राची गती अठरा तास काम, आठ तास विश्रांती, अशी साधली आहे. सहा महिन्यानंतर छत्तीस तास काम, बारा तास विश्रांती असा दिनक्रम आपण निश्चित करू शकू, असे डॉक्टरसाहेब मानतात.

दोन महिन्यांच्या एकान्तवासामुळे डॉक्टर कंटाळले आहेत. पण बाकी त्यांचे ठीक चालले आहे. या विजनवासात उंदरांची मोठीच सोबत त्यांना लाभली आहे.

एक दिवसाचे दोन दिवस करण्याच्या डॉ. मिचेल सिफरसाहेबांच्या (विज्ञ-वटचा) प्रयोगाची वार्ता वाचून काही-तरी झणझणीत बोलण्यासाठी माझी जीभ शिवशिवत होती; परंतु हा प्रयोग केवळ पुरुषांसाठी आहे असे बायको म्हणाल्यावर माझी वाचाच बसली. उपरिनिर्दिष्ट प्रयोगकल्पनेतून हा अर्थ बायकोने कसा काढला हे मला अजून उमजलेले नाही. ◻

## खोटे आत्मचरित्र

पुस्तकांच्या विश्वात ठकसेनी कशी चालते याचे एक मोठे उदाहरण नुकतेच उघडकीला आले आहे. क्लिफर्ड आयर्व्हिंग नावाच्या एका अमेरिकन लेखकाने विख्यात अमेरिकन क्रोडोपती हॉवर्ड ह्यूजेस यांचे २३०,००० (दोन लाख तीस हजार) शब्दांचे प्रचंड 'आत्मचरित्र' लिहिले. हॉवर्ड ह्यूजेसबरोबर वेळोवेळी झालेल्या प्रदीर्घ मुलाखतीतील निवेदनाचे संकलन करून आपण हे आत्मचरित्र प्रसिद्ध केले, असे आयर्व्हिंगचे म्हणणे. मॅक्ग्रॉ हिलसारख्या सुप्रतिष्ठित प्रकाशकांनाही आपले म्हणणे त्याने पटवले. हॉवर्ड ह्यूजेस यांच्या विवाद्य कारकीर्दीतील सारे चढउतार या हस्तलिखित आत्मचरित्रात इतक्या प्रभावीपणाने मांडले होते की प्रकाशकांना, हे हे पुस्तक प्रकाशित करण्याची संधी आपल्याला मिळाली, याची धन्यता वाटली. त्यामुळे आयर्व्हिंगला ६५०,००० (सहा लाख पन्नास हजार) डॉलर्सइतके मानधन प्रकाशकांनी आगाऊच दिले!

इकडे हॉवर्ड ह्यूजेसनी त्या हस्तलिखिताशी आपला काही संबंध नाही, आपण मुलाखती दिल्या नाहीत, आपले आत्मचरित्र कल्पित आहे, असे जाहीर केले. प्रकाशकांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

मग 'टाईम' या सुप्रसिद्ध मासिकाने सुरुंग लावला. आयर्व्हिंगचे पुस्तक खोटे आहे, दुसऱ्या एका हस्तलिखितातून मजकुराची उचल त्याने केली आहे, असे त्या 'टाईम' ने सप्रमाण सिद्ध केले. त्यामुळे अपराधाची कबुली देण्यावाचून आयर्व्हिंगला गत्यंतरच उरले नाही.

## सव्वीस आणि बावन्न

ही गोष्ट तुम्हाला माहीत असली तरी पुन्हा सांगतो : काही महिन्यांपूर्वी विजय तेंडुलकरांनी ' सखाराम बाईंडर ' नावाचे एक नाटक लिहिले होते. ते अतोनात गाजले. (कोणी ते ' गाजवले ' असेही म्हणतात.) ते नाटक अश्लील आहे असा बोलबाला झाला. मग नाटकाविषयी डोळस आस्था असणाऱ्या सगळ्या मराठी प्रेक्षकांना ते नाटक पाहिलेच पाहिजे असे वाटू लागले. नाटचपरीक्षण मंडळालाही तसेच वाटू लागले. ते आले; नाटके पाहिले; त्याच्यावर बंदी घातली. त्यामुळे टी. व्ही. ची तहान रेडिओवर भागवावी तशी ' सखाराम बाईंडर ' नाटक पाहायची तहान त्यावरच्या चर्चा, मुलाखती, परिसंवाद, पत्रे, धमक्या-प्रतिधमक्या यावर भागवण्याचा प्रसंग मराठी रसिकतेवर आला; आणि मराठी रसिकतेने तो यथासांग साजराही केला.

मराठी माणूस अन्याय सहन करीत नाही, असे म्हणतात. नाटचपरीक्षण मंडळाने बंदी घालून 'सखाराम बाईंडर 'वर घोर अन्याय केला असे नाटचस्वातंत्र्यप्रेमी सव्वीस सज्जनांना वाटले. लगेच त्यांनी एक पत्रक काढून ' सखाराम बाईंडर ' हे थोर नाटक आहे असा निर्वाळा दिला. ' सखाराम बाईंडर ' आणि सव्वीस सज्जन (अलिबाबा आणि चाळीस चोर या चालीवर) यांची याद मराठी नाटचसृष्टीच्या इतिहासकाराला ठेवावी लागेल.

त्या इतिहासकाराचे जाऊ द्या; मला त्यांची याद नुकतीच आली. इंग्लंडमध्ये नुकताच एक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. हा अहवाल आहे अश्लील निर्मितीबद्दलचा. दोन लाख शब्दांच्या या अहवालात कलाक्षेत्रातील वाढत्या अश्लीलतेचा कडक शब्दात निषेध केला असून, अश्लीलता-प्रतिबंधक नवे आणि प्रभावी कायदे करण्याची शिफारस सरकारला केली आहे. ज्या समितीने हा अहवाल सिद्ध केला तिच्यातील बावन्न सज्जनात धर्मोपदेशक, कायदेपंडित, लेखक, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते, गायक इत्यादी विविध क्षेत्रातील मंडळी आहेत. आपण आत्यंतिक नीतिवादी किंवा उगाच गंभीरराव नसूनही वरील शिफारस करतो याचे कारण वाढत्या अश्लीलतेमुळे कलेच्या खऱ्या आनंदाला रसिक पारखे होत आहेत, हे होय, असे या मंडळींचे म्हणणे आहे.

इंग्लंडचे हल्ली काही खरे नाही. दिवसेंदिवस त्याची पीछेहाटच होत चालली आहे. हेच पाहाना. आमच्याकडे कलास्वातंत्र्याचा पुरस्कार करायला सव्वीस जण पुढे सरसावतात तर इंग्लंडमध्ये त्या स्वातंत्र्याची गळचेपी करायला बावन्न जण धजावतात. आमच्या एकास त्यांचे दोन ! या वुरसटलेल्या देशात आपण जन्माला आलो याची शेक्सपियरला लाज वाटेल ! (नाटकाबद्दल काहीही लिहायचे असेल तर एकदा तरी शेक्सपियरचा उल्लेख झालाच पाहिजे, अशी आमची श्रद्धा आहे.)

—अनंतराव

# वयात न आलेल्या राष्ट्रीकृत बँका

प्रा. राम बिवलकर

बँकांचे राष्ट्रीयीकरण करताना जे उद्देश समोर ठेवून तो झंझावाती निर्णय घेतला होता, अटीतटीने, सुप्रीम कोर्टी निर्णयांना तोंड देऊनही राष्ट्रीयीकरण प्रत्यक्षात आणले गेले होते; ते उद्देश गेल्या तीन साडेतीन वर्षात सफल झाले का ? या प्रश्नाचे नाही असे त्वरित उत्तर द्यायला हवे. कारण बँक राष्ट्रीयीकरणाचे जे उद्देश होते त्यातला प्रमुख उद्देश असा होता की, या देशाच्या सर्वांगीण विकासात बँकांनी आता अग्रेसरत्व पत्करावे. पूर्वी बँका उद्योग-उदीमाच्या पाठीशी उभ्या राहात आता त्यांनी पुढे सरून उद्योग-उदीम सुरू करायला कारणीभूत झाले पाहिजे. शेती, छोटे उद्योग, व्यावसायिक यांना साहाय्यभूत झाले पाहिजे.

व्यापारी बँकानी असले काम कधीच केलेले नव्हते. त्यामुळे त्यांच्या गाठी तो अनुभव नव्हता. त्यात वाकबगार असा सेवकवर्ग त्यांच्याजवळ नव्हता. ज्या विविधक्षेत्रात व्यापारी बँकानी काम करावे असे म्हटले जाते त्या क्षेत्रात सहकारी बँकांचे अराजक अजूनही तसेच चालू आहे. सरकारी अधिकारी, पोलीस व स्थानिक पुढारी मंडळी यांचे साहाय्य होण्याऐवजी हीच मंडळी बँकांच्या कामात समस्या निर्माण करतात असा अनुभव आहे. बँकांची रचना, संचालन, धोरणे, कार्यपद्धती, विविध पतसंस्थांच्या कार्यातील एकसूत्रीकरण, सेवकवर्गाचे प्रशिक्षण, सोई, सुरक्षितता, कर्जवसुली, हमी, तारणे, या बाबतीत एक धोरण ठरविण्यात, अगर एक ढाचा तयार करण्यात गेल्या ३ वर्षात ना रिझर्व्ह बँकेला यश आले, ना सरकारने मनावर घेतले, ना बँकिंग कमिशनने मार्गदर्शन केले ! रिझर्व्ह बँक वा केंद्रीय अर्थखाते, समित्या नेमतात, अहवाल आणतात, पण वरील बाबतीत प्रत्यक्ष काय केले पाहिजे हे सांगत नाहीत ! मंत्री, पुढारी, राजकारणी मंडळी तर बँकांवर ताशेरे झाडतात पण त्यांच्या समस्यांचा विचार करीत नाहीत. राष्ट्रीयीकरण करताना अशी हवा निर्माण करण्यात आली की राष्ट्रीयीकरण झाले की सर्व थरातील मंडळींचे, सर्व भागातील लोकांचे सारे आर्थिक प्रश्न चुटकीसरसे सुटतील ! त्यामुळे सामान्य माणसांच्या अपेक्षांनी स्व-स्वस्तिक गाठले ! आपण उचललेली पावले सुरतपुण्यदायी आहेत हे दाखविण्याची घाई झालेल्या सरकारने, शेतकरी, लघु-उद्योगवाले, लहान व्यापारी, सामान्य जनता, रिक्शावाले, सलूनवाले, टॅक्सीवाले, स्वतंत्र व्यावसायिक, कारागीर, डॉक्टर्स, वकील, आर्किटेक्ट्स् या साऱ्या मंडळींना अग्रहक्काने कर्जे द्यावी

असे आदेश दिले. पूर्वी तारण हजर करणाऱ्या पतदारांना कर्जे दिली जात, आता तारण देऊ न शकणाऱ्या नापतदाराना पतदार बनवायचे होते ! 'मी कर्जाचे हप्ते वेळेवर भरीन' असे त्याने म्हटले की त्याची वैयक्तिक दानत आहे असे मानून व तो ते कर्ज उत्पादक उद्योगात वापरील असे समजून ही कर्जे द्यायची होती. बँकांच्या मूळ साच्यात हे बसत नव्हते. कार्यपद्धतीच उलटीपालटी होत होती ! कर्ज उत्पादकरीतीने वापरले जाईल की नाही याची शाश्वती नव्हती; कर्जदाराला तसे भाग पाडायला बँकाजवळ तशी यंत्रणा नव्हती. पण सरकार म्हणाले, "कुछ फिक्र नही ! कमी धोका अन् जास्त नफा हे तत्व तुम्ही आता बदलले पाहिजे. धोका पत्करूनही विकासाला कारणीभूत झाले पाहिजे. समाजवाद लोकांपर्यंत पोचवायचा आहे. तुम्ही झारीतले शुक्राचार्य बनता उपयोगी नाही."

आणि मग सरकारी नोकर झालेल्या बँकर्सना दुसरा पर्याय नव्हता. त्यांनी या अग्रहक्कवाल्या मंडळींना व दुर्लक्षित क्षेत्रांना धडाक्याने कर्जे द्यायचे सत्र सुरू केले ! गरीब बिचारा शेतकरी आपल्या एकुलत्या एक जमिनीच्या तुकड्याच्या तारणावर सहकारी सोसायटीकडून कर्ज घेत होता, स्टेट बँकेतूनही घेत होता, आता त्याची गरिबी हटवायला राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकही आली ! तलाठ्याला चिरीमिरी दिली की तो 'नोड्यू' प्रमाणपत्र देई; शेती अधिकाऱ्याचे हात ओले केले की तो दहा हजाराच्या जमिनीची किंमत ५० हजार आहे असे सांगे. बँकांच्या अधिकाऱ्यांना 'सात बाराचे' उतारे म्हणजे काय हेही समजत नव्हते. जमिनीची, घरांची मूल्ये कशी ठरवावी हे ठाऊकही नव्हते. मंत्र्यांच्या घोषणा, स्थानिक पुढाऱ्यांचा लकडा यांच्या दडपणाखाली ते बिचारे कर्जे वाटीत होते. कुणालाच नाही म्हणण्याची सोय नव्हती. साधा सलूनवाला सुद्धा ताडकन् इंदिराजींना लिहीत होता. यशवंतरावांचा हवाला देत होता. खरोखर दिल्लीपर्यंत, निनावी पत्र पोहचले तरी चौकशीचे दुष्टचक्र सुरू होत होते !

## फक्त कागद हजर !

या साऱ्या सनसनाटी व्यवहारात जुन्या चौकटीत वाढलेले बँकर्स गडबडून गेले. त्यामुळे कर्जवाटप करताना हवी ती कागदपत्रेच तयार झाली नाहीत. रकमा मात्र आदा केल्या गेल्या. बहुशः अज्ञानामुळे हे घडले. काहींनी आपल्या पोळीवर पुरेपूर तूप ओतून घेऊन हे राष्ट्रकर्तव्य पार पाडले ! वरून आदेश आला, 'तुमच्या क्षेत्रात इतके शेतकरी खातेदार झालेच पाहिजेत, इतके पंप बसलेच पाहिजेत.' मग काय करणार ? बँकेच्या एजंटाने पंपसेट्स विकणाऱ्याला बोलावून आणले. त्याच्या हाती कर्जवाटपासंबंधीचे विविध कागद ठेवले. 'इतके इतके खातेदार मिळवा, त्यांना तुमच्याच दुकानातले पंप द्या. कागद बँकेत हजर करा—रक्कम तुम्ही घेऊन चला. तुम्हीच ती शेतकरी—कर्जदाराला आदा करा. पावत्या हजर केल्यात की

मी सुटलो अन् तुम्ही सुटलात.' पंपसेट-वाल्या व्यापाऱ्याला तर नागडे कोल्हे भेटले ! त्याने आपल्याशी संबंधित अशा अनेकांच्या नावे कर्जे मंजूर केली. पंपसेट बसविल्याचे कागद तयार केले. रसीटा तयार केल्या. कधी त्यांना कागदावर आंगठे उठविल्याबद्दल थोडीफार रक्कम दिली. कधी आपल्याच चाकरा-नोकरांच्या हातापायांचे आंगठे उठवून कागदे तयार झाली. लाखो रुपयांची उत्पादक गुंतवण कागदावर तयार झाली. बँकेच्या सायबापुढे कागद गेले. रक्कम व्यापाऱ्याच्या हाती पडली. त्याने कृतज्ञतेच्या भावनेने १०–२० टक्के रक्कम सायबाच्या खिशात बळे बळे कोंबली. 'कशाला कशाला ? तुम्हीच माझे मोठे काम केलेत्' असे म्हणत सायबाने ती ठेऊन दिली. वीस पंचवीस वर्षांच्या नोकरीतही त्याला असा अनुभव नवा होता ! पण मग लोककल्याण करायचे त्याला जमू लागले ! पंप सेट्स् कधी दुकानाच्या बाहेर पडले नाहीत ! त्यांनी माणसे ओली केली पण जमीन भिजवली नाही ! आपण कर्ज काढले आहे हेच ठाऊक नसलेल्या शेतकऱ्यांनी कर्जाचे हप्ते वेळेवारी भरणे कसे शक्य होते ? थकबाक्या भरमसाठ वाढल्या, तेव्हा चौकशा सुरू झाल्या. त्यातून या गोष्टी उमगल्या. सरकारी नोकरीत बदली करणे हीच शिक्षा असते. तशा बदल्या झाल्याही.

असल्या कटु गोष्टींचा उल्लेख अशासाठी की निरनिराळ्या क्षेत्रात कर्जाचे वाटप होऊ लागले हा राष्ट्रीयीकरणाचा मोठाच फायदा असला तरी ती कर्जवाटपे बँकिंगच्या तत्वांना बाजूला सारून कशी केली जात आहेत हे लक्षात यावे यात ठेवीदारांना धोका पोचण्याचा संभव आहे.

खेड्यापाड्यातील लोकांना बँक-व्यवहारांची सवय लागावी, आपली बचत त्यानी बँकेत ठेव म्हणून जमा


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) पो. कतरी सरायग (या)**

करावी, तिच्या जोरावर त्यांच्या उत्पादक उद्योग व्यवसायांना कर्जाचा पुरवठा व्हावा हा बँक राष्ट्रीयीकरणाचा उद्देश होता. राष्ट्रीयीकरणापूर्वी दमदार तारण देऊ शकणाऱ्या लब्धप्रतिष्ठितानाच बँकांची द्वारे खुली होती. कोटयावधी सामान्यजनाना तिथे प्रवेश नव्हता. पण राष्ट्रीयीकरणामुळे ही द्वारे उघडली. उत्पादक-उद्योग-कल्पना घेऊन बँकेच्यादारी येणाऱ्या कुणालाही आता कर्ज मिळू शकेल. तारण नको, पण उद्योग आर्थिकदृष्टचा उपयुक्त असावा, किफायतशीर ठरणारा असावा. तो तसा करण्याची जिद्द व कर्जफेडीची दानत असणारा खातेदार हवा, एवढीच पतदारापासून अपेक्षा आहे; पण माणसाची दानत वा जिद्द, ठरविण्याचा निकष काय ? आर्थिकदृष्टचा उपयुक्त उद्योगही पुढे मागे किफायतशीर ठरेल याची खात्री काय ? कर्ज देणाऱ्या बँकेजवळ कर्जाचा योग्य उपयोग होतोय की नाही हे पाहायची यंत्रणा हवी की नको ? स्वाहाकाराची सवय लागलेली, खेडोपाडी काम करणारी सर्व सरकारी व राजकारणी पुढारी मंडळी आपापसात हातमिळवणी करून बँकांना लुबाडायला निघाली तर ? खेडोपाडी निघालेल्या बँकांच्या शाखातून काम करणाऱ्या मंडळींना हे अनुभव येऊ लागले आहेत.

### ढळलेला समतोल

म्हणून पहिल्या तीन वर्षात या देशातील बँकांच्या शाखांची संख्या ४७२३ नी वाढली असली, ती आता एकूण १२९८५ शाखा एवढी झाली असली, यात ग्रामीण भागात ४८८९ शाखा व छोटया शहरात ४२२४ शाखा काम करीत असल्याचे दिसत असले, राष्ट्रीयीकरणापूर्वीचे ६५ हजार लोकवस्तीला १ बँकशाखा हे प्रमाण आता ४२ हजाराला एक शाखा असे झाले असले, तरी बँकाचे खर्च वाढविण्याचे व नफ्यात घट करण्याचेच काम या वाढत्या शाखा करीत आहेत; हे विसरता यायचे नाही. नफ्यात घट आली तर फारसे बिघडते असे नाही पण खर्च अमाप वाढूनही-धंदा वाढत नाही – बँकांचा त्या त्या भागाला व्हावा तसा उपयोग होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. कुणी म्हणेल बँकांच्या ठेवी जुलै ६९ ला ४६४६ कोटींच्या होत्या त्या आता ७५२४ कोटी रुपयांच्या झाल्या हे राष्ट्रीयीकरणाचे यश नव्हे का ? थोडे फार नाही असे नव्हे पण गेल्या तीन साडेतीन वर्षात चलन फुगवटा किती झाला, अर्थव्यवहाराचा वेग किती वाढला याही गोष्टी ठेवीत वाढ होण्यात सहभागी आहेत हे विसरून चालणार नाही; शिवाय बँकांनी दिलेल्या कर्जात ३५९९ कोटीवरून ५३७७ कोटी एवढी वाढ झाली असली तरी आजवर दुर्लक्षित क्षेत्रांना कर्ज द्यायची घाई झाल्याने झालेल्या घोटाळयांचा मी वर उल्लेख केला आहेच पण शिवाय ज्या ग्रामीण भागात बँका गेल्या आहेत तिथे स्थानिक लोकात उपक्रमशीलता कमी असल्यामुळे नवनव्या उत्पादक कल्पना काढून नवे नवे उद्योग सुरू करण्याची जिद्द उणी असल्यामुळे, सुरवातीला राष्ट्रीयीकर-

णाच्या जोषात कर्जे दिली गेली असली, बँका राजकीय दडपणांना बळी पडल्या असल्या तरी बँकर्सना आपली ठेवीदारांच्या बाबतीतली जबाबदारी विसरता यायची नाही आणि अनुदानासारखी कर्जाची खिरापत वाटता यायची नाही - येत नाही. त्यामुळे ठेवीच्या एक दशांश वा पंचमांश रक्कम खातेव्यवहारात गुंतते – जादा ठेवीची रक्कम – अधिक जरूर असलेल्या भागाकडे रवाना होते. म्हणजे पुन्हा ग्रामीण बँका ग्रामीण ठेवींचा दुसरीकडे निचरा करणाऱ्या ठरतात; व विकासाचा प्रादेशिक समतोल ढळविण्याला कारणीभूत होतात. पहिल्या तीन वर्षात शेतकरी खातेदारांच्या संख्येत १ लक्ष ३९ हजारावरून ६ लक्ष ५४ हजार एवढी वाढ झाली. लघुउद्योगातील खातेदारांची संख्या ३६ हजारावरून ७५ हजारावर गेली, त्यांना कर्जे मोठ्या प्रमाणात देण्यात आली, खाजगी वाहतुकदारांना दिलेली कर्जे ७ कोटींची ३८ कोटी झाली, किरकोळ व्यापाऱ्यांना दिलेली कर्जे १९ कोटींची ५९ कोटी झाली. स्वयंउद्योग्याना १० कोटी रुपयांची तर शिक्षणासाठी ४ कोटी रुपयांची कर्जे दिली गेली – हे सगळे अखिल भारतीय आकडे मान्य धरूनही, ग्रामीण भागात विकासाला नेट लावण्याचे अगर विकास-समतोल साधण्याच्या दृष्टीने बँका फार थोडे करू शकल्या ही गोष्ट मान्य करायला हवी.

## अग्रणी बँक योजना

बँकानी देशाच्या विकासात अग्रेसर ठरावे या दृष्टीने, राष्ट्रीयीकरणानंतर 'अग्रणी बँक' योजना पुढे आली. देशातील ३६६ जिल्हे विविध बँकाना वाटून देण्यात आले. प्रत्येक बँकेने आपल्या वाट्याला आलेल्या जिल्ह्यात आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने पुढाकार घ्यायचा होता. त्यांनी त्या त्या जिल्ह्यातील, बँकदर्शन न झालेल्या भागात आपल्या शाखा उघडायच्या होत्या अगर त्या क्षेत्रात काम करणाऱ्या इतर बँकांना तसे करण्यास उद्युक्त करायचे होते. विविध प्रकारच्या योजना आखून जिल्ह्याच्या सर्वंकष विकासाकरता पतपुरवठा करायचा होता. विकासाला चालना द्यायची होती. अधिक रोजगारी उपलब्ध करायची होती. लोकांचे राहणीमान उन्नत करायचे होते. लोकांना बचतीची सवय लावायची होती.

'अग्रणी बँक' नेमून त्या त्या बँकेच्या अखत्यारीत विविध जिल्हे दिले की, विकासाला गती आलीच; असे घोषणावाल्या राज्यकर्त्यांना वाटले तरी ते होणे सहजसाध्य मुळीच नव्हते. या देशाला स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झाली. योजनाबद्ध आर्थिक विकास साधणाऱ्या चार-पाच वार्षिक योजना आखून इथे कार्यवाहित झाल्या. पण अग्रणी बँकांना, आपल्या जिल्ह्यांची आर्थिक ताकद, विकासाची पातळी, विकासाची शक्यता असलेली क्षेत्रे, स्थानिक उद्योग, धंदे, व्यवसाय, लोकसंख्येची व्यवसायवार विभागणी, वीज, रस्ते, शिक्षणपातळी, उपलब्ध तंत्रज्ञान

या संबंधीचे सम्यक चित्र उभे करणारे 'इकॉनॉमिक प्रोफाइल्स' काही उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे बँकांना प्रथम आपल्या अखत्यारीतल्या जिल्ह्यांची सामाजिक व आर्थिक पाहाणी करण्याची कामे अंगावर घ्यावी लागली. अशी पाहाणी करून, योजना आखून मग शाखाविस्तार, ठेवी जमविणे व कर्ज-वाटप करणे, मार्गदर्शन करणे बँकांना सुविहितपणे करता आले असते, पण त्याऐवजी सरकारने साऱ्याच आघाडया एकदम उघडायला बँकांना भाग पाडले. भारतासारख्या,भौगोलिक दृष्टया आणि लोकसंख्येच्या दृष्टीने अवाढव्य असलेल्या देशात असे करणे हे राजकीयदृष्टया कदाचित बरोबर असेल पण आर्थिक दृष्टया ते बरोबर नव्हते, त्यामुळे स्थानिक पुढारी व जनता यांचे ग्रामीण भागातील बँकांच्या शाखावर भयंकर दडपण आले आणि घोटाळे माजले. व्यापारी बँकांच्या कामाला ग्रामीण ढंग देणे अधिक विचारपूर्वक व्हायला हवे होते. कारण तिथल्या समस्या अगदीच वेगळ्या होत्या.

पण तसे न घडल्याने, जनतेच्या अपेक्षा वाढल्या; राज्यसरकारे व जिल्ह्याचे अधिकारी, बँकांना विकास कार्यात खेचायला अधीर झाले; कित्येक ठिकाणी तर या अधीरतेने घायकुते-पणाची पातळी गाठली. सरकारच्या घोषणांमुळे बँकांच्या अपेक्षित कार्या-विषयी चुकीच्या कल्पनांचा घोळ उभा राहिला. कुणी म्हणे बँकांच्या शाखा खेडोपाडी पोचल्या की विकासाला आप-सूक गती येईल, कुणी म्हणे बँका या योजनाबद्ध आर्थिक विकासाच्या घटकच झाल्या आहेत. बँकांच्या अधिकाऱ्यांना विकासाची नसती झंगटे आपल्या मागे लागायला नको होती तर राज्यसरकारे त्यांना सुखासुखी सोडायला तयार नव्हती. या साऱ्या घोळात रिझर्व्ह-बँकेच्या प्रश्नावली प्रमाणे पाहाण्या पार पडल्या पण त्या बहुशः 'इंप्रेशनिस्टिक' होत्या. विकासाला गती द्यायची तर विविध कार्यपद्धती स्थानिक अडचणी लक्षात घेऊन ठरायला हव्या होत्या. त्या दृष्टीने विविध समस्यांच्या शास्त्रीय पहाण्या त्वरित व्हायला हव्यात आणि पद्धती ठरायला हव्यात. रिझर्व्ह बँकेने निरनिराळ्या भागातील विविध बँकांचे अनुभव एकत्रित करून एकमेका साहाय्य करायला बँकांना उद्युक्त करायला हवे. कार्यपद्धती ठरून बँकांच्या कार्याला गती मिळाली नाही तर विकासाचे अग्रेसरत्व बँका कशा करणार? विकाससंबंधीच्या सर्व-कल्पना, मूर्त योजनेच्या पातळीवर आणण्याकरता बँकांना इतर संशोधक संस्थांनी मदत करणे जरूर आहे. बँकांना दत्तक दिलेल्या जिल्ह्यांमध्ये विकासपातळीच्या दृष्टीने खूपच तफावत दिसून आली आहे. विकासाच्या सम-तोलाच्या सरकारी घोषणा संपूर्णतया कार्यवाहीत झालेल्या नाहीत याचेच हे द्योतक आहे. काही जिल्हे विकसित आहेत तर काही फारच मागासलेले आहेत. काही ठिकाणी विकास रुजू घातला आहे तरी काही ठिकाणी सारे थंड आहे! नव्हे तिथला विकास खचत

चालला आहे. याची कारणे शोधून विकास विरोधी गोष्टी उखडून काढायला हव्यात.

खेडोपाडी पोचून बँकांनी या कामाला लागायला हवे. त्याकरता जिल्हाधिकाऱ्यांनी, जिल्हापुढाऱ्यांनी पेंढारी वृत्ती न दाखविता बँकांना मदत करायला हवी. त्याकरता जिल्हापातळीवर सुसूत्रता व सल्लागार समित्या स्थापन करून त्यांनी जिल्ह्याचा सर्वतोपरी विकास हे आपले ध्येय मानून कामाला लागले पाहिजे. म्हणजे व्यापारी बँका व सहकारी बँका यांच्या कार्यक्षेत्रात सुसूत्रता येईल. एकाच व्यक्तीला एकाच तारणावर अनेक कर्जे मिळणे बंद होईल. कर्जे विकासार्थ सबबीखाली राबविली जातील आणि थकबाक्या शून्याकडे झुकतील !

## अविकसित विभागाकडे...

मागासलेल्या प्रदेशात बँकांच्या शाखा पोचविण्यात अनेक अडचणी उभ्या असतात. जागा, सुरक्षितता शीक्षित व सेवारत कर्मचारी वर्ग, धंदा लवकर न वाढण्याची शक्यता, साऱ्याच अडचणी मोठ्या. पण यावर मात केल्याशिवाय बँका विकासाच्या नाडीचे एंजिन बनणे शक्य नाही. रस्ते, पाणी, वीज, शाळा यासारख्या मूलभूत सोयीही कित्येक जिल्ह्यात उपलब्ध झालेल्या नाहीत. विकासाची घाई झालेल्या राज्यसरकारांनी बेकारी निवारणार्थ खर्च होणाऱ्या रकमा प्रथम या कामी लावाव्यात. नको असलेले पूल वा रस्ते बांधण्यात अलीकडे लाखो रुपये खर्ची पडले—थोडी कल्पनाशक्ती राबविली असती तर अनेक खेड्यांना वरील मूलभूत सोयी उपलब्ध करता आल्या असत्या. त्यामुळे सध्या ग्रामीण भागात बँकांच्या ज्या शाखा निघाल्या आहेत त्या सर्व तुलनेने विकसित अशाच भागात निघाल्या आहेत. त्या दूरवरच्या खेड्यात पोचल्यावाचून विकासाला गती येणे वा विकासाचा पाया भरणेही शक्य होणार नाही.

पण तोपर्यंत मागासलेल्या भागात बँकांची मदत पोचू नये का ? पोचायला हवी. त्याकरता ग्रामीण भागाची व तिथल्या लोकांची चांगली माहिती असलेल्या मंडळींची उदा.निवृत्त तहशीलदार वा विकासाधिकारी यासारख्या लोकांची करारपद्धतीवर नेमणूक करून बँकांनी खेडोपाडी आपला धंदा पोचवावा. पुढे मागे, बँकांनाच आपली तशी यंत्रणा उभारता येईल. सध्या या मंडळींना कर्जवाटप, त्याचा उत्पादक उपयोग, हप्ते वेळेवर भरले जाणे, थकबाक्या वसूल करणे या कामाकरता पगाराव्यतिरिक्त कमिशन्सही देता येतील.

बँकांनी अशा रीतीने झटपट पावले उचलणे आता जरूर आहे. कारण असे प्रत्यक्ष काम दिसल्याखेरीज आता बँका जनतेचे समाधान करू शकणार नाहीत.

या देशातील वाढती बेकारी हटविण्याच्या दृष्टीने आजवर दुर्लक्षित असलेल्या स्वयं-उद्योगी मंडळींना बँकांनी कर्जे द्यायला पुरवात केली आहे. ही गोष्ट स्पृहणीय असली तरी ही कर्जे तंत्रज्ञ, यंत्रज्ञ, डॉक्टर्स, वाहतूकदार

अशा मंडळींपुरतीच मर्यादित आहेत. त्यांचा आवाका आता चांभार, शिंपी, धोबी, सोनार, प्लंबर्स, इलेक्ट्रिशियन्स्, वीजेची साधने दुरुस्त करणारे, फुलवाले, फळविके, भाजीवाले, छोटे हॉटेलवाले, जोडधंदे करणारे शेतकरी, झोपडीतील छोटे उद्योग, सलूनवाले, चणेवाले यांच्यापर्यंत वाढला पाहिजे. तो वाढवावा अशी ठक्कर समितीची शिफारस प्रत्यक्षात उतरवायची तर त्याकरता बँक ऑफ बरोडा या बँकेने सध्या मुंबई व लखनौ या ठिकाणी सुरू केलेल्या 'मल्टी सर्व्हिस एजन्सी 'सारख्या यंत्रणा ठिकठिकाणी निघाल्या पाहिजेत. या यंत्रणा अशा छोटचा स्वयं उद्योग करणाऱ्या मंडळींना आर्थिक व्यवस्थापनात तांत्रिक मदत करू शकतील. त्यांना कच्चा माल पुरवू शकतील. त्यांच्या मालाला बाजार मिळवून देऊ शकतील. नवनवीन उपक्रमांची आर्थिक सुदृढता तपासून देऊ शकतील.

गेल्या साडेतीन वर्षांत राष्ट्रीयीकृत बँकांनी काहीच केले नाही असे म्हणण्याचा या लेखाचा हेतू नाही. पण त्यांनी जे करावे अशी अपेक्षा होती त्या दृष्टीने सरकारने करायला हव्या होत्या त्या गोष्टी केल्या गेल्या नाहीत. बँकांच्या कर्मचाऱ्यांनी आपल्यावर पडलेली नवी जबाबदारी पुरेशी ओळखली असे दिसले नाही. स्थानिक पुढारी व अधिकारी मंडळींनी बँकांच्या व्यवहाराचे स्वरूप समजावून घेऊन त्यांना मदत करून विकासाची पायाभरणी करण्याचे काम सुरू केले नाही. नुसत्याच जनतेच्या अपेक्षा शिगेला पोचविल्या ! व त्यामुळे बँक-राष्ट्रीयीकरणाचा मूळ हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने हवी तेवढी जलद पावले पडली नाहीत; असे मला म्हणायचे आहे. बँक-व्यवहारात घुसू पाहणारा भ्रष्टाचार, दुहेरी पतपुरवठा, सेवेऐवजी संप करून अधिक पैसा पदरात पाडून घेण्याची कर्मचाऱ्यांची वृत्ती, बँकांची संचालक मंडळे नेमण्यातही चाललेली चालढकल, घसरणारी कार्यक्षमता, वाढणारी तांबडी फीत, धोरण ठरविण्याबाबतचा घोळ या गोष्टी नजरेसमोर आल्या, की शाखावाढ, ठेवीवाढ, कर्जेवाढ–हे बँकांच्या प्रगतीचे निदर्शक फसवे वाटतात, थिटे वाटतात ! आंतरराष्ट्रीय तुलनेने ते थिटे आहेतही. पण अजून वयात न आलेल्या आपल्या बँकव्यवसायाची, प्रगत देशांशी तशी तुलना करणे अन्याय्य ठरेल. पण वयात येतानाच या व्यवसायाला नसत्या सवयी लागू नयेत. नको ते दोष व दुर्गुण त्यात शिरू नयेत म्हणून हा प्रपंच ! □ □ □

# भिजलेली संध्याकाळ !
# गारठलेल्या गप्पा !

मुक्काम : मद्रास

चंद्रकांत अंबाडे

नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यातील मद्रासमधील एक सायंकाळ. सभागृहाच्या बाहेर थोडीशी मराठी मंडळी जमलेली आहेत. इकडे धो धो पाऊस कोसळतोय आणि जोराचा वारा, थेंब जणू छऱ्यांप्रमाणे अंगावर मारतोय. संध्याकाळचे पाचच वाजताहेत, पण मिट्ट अंधार पडलाय. तेवढ्यात मी जाऊन पोहोचलोच तेथे.

'या !' –एकाने अनाहूतपणे स्वागत केले.

'नमस्कारम् सारे.'

'सारे म्हणजे मराठी सर्वजण अशा अर्थी की तमीळ सारे ?'

'कसंही समजा !'

'काहो, तुमचे खेळाडू कुठे आहेत ?' –नवा प्रश्नकर्ता.

'खेळाडू गेलेत तिरूपतीच्या दर्शनाला. अजून आले नाहीत.'

'मग आता इथे सत्कार कुणाचा करणार ?'

'करा वरुणराजाचा. धो धो कोसळतोय केव्हापासनं.'

'तुम्ही रेडिओ ऐकला दुपारी ?'

'तमीळ बातम्या कोण ऐकतंय इथं?'

'अहो, इंग्लिशमध्येही सांगितलंय की, चक्रीवादळ सध्या बंगालच्या उपसागरात आहे अन् २२ च्या मध्यरात्रीपर्यंत मद्रासच्या किनाऱ्याला टच करणार आहे. बंदरात धोक्याचा बावटा लावलाय.'

'तरीच, दोन दिवस पावसाचं न् वाऱ्याचं थैमान आहे तर.'

'तिकडे महाराष्ट्रात जा म्हणावं, दुष्काळ पडलाय.'

'हो ना, इकडे उगीचच नद्यांना पूर.'

'अन् झोपडपट्ट्यांत पाणीच पाणी मग.'

'बरंच झालं की मग एम्जीआरला.'

'ते कसं काय बुवा ?' –माझा भावडेपणा.

'लगेच त्यांना कपडे न् तांदूळ वाटायला चान्स.'

'हो ना, बनियन्सवर लाल काळा उगवता सूर्य, बायकांच्याही साड्या काळ्याच अन् काठपदर लालच. दानधर्मातही पक्षाचा प्रचार.'

'अहो, त्याचा कोणताही सिनेमा पाहा. त्यात ४१५ वेळा तरी तो उगवता सूर्य असणारच, नायक अण्णांच्या फोटोला नमस्कार तरी करणारच,

त्याचा ड्रेस लाल न् काळाच असणार.'

'अस्सं ?' –मी वेड पांघरून केलेला प्रश्न.

'झोपडपट्ट्यांत जाऊन बघा एकदा. रामाचे न् कृष्णाचे फोटो दिसणार नाहीत, पण एमजीआरचे निरनिराळ्या पोझेसमधले अन् सगळ्या नटयां बरोबरचे फोटो दिसतील.'

'हो ना, देवासारखं मानतात त्याला' –नवा आवाज.

'दानधर्म करतो मात्र चिक्कार. आमच्या 'आडको इंडिया'चे कंपौंडलाच त्याच्या बंगल्याचं कंपौंड भिडलंय.आम्ही बघतो ना रोज. कुठून कुठून गोरगरीब बायामाणसं येतात अन् फाटकाशी बसून राहतात. हा आला की, भराभर नोटा काढून देतो. म्हातारीकोतारी कुणी त्याला हात जोडते की, हा तिचे हात धरून स्वतःच्या डोक्यावर ठेवून घेतो, म्हणतो, 'आशीर्वाद दे. नमस्कार कसला करतेस ?'

'त्याची इन्कम्‌टॅक्स बाकी आहे म्हणे चिक्कार.'

'सोळा लाख आहे. जप्ती नेली होती म्हणे दोनदा.'

'मग ?'

'ह्यानं म्हणे हप्ता बांधून दिलाय सरकारला. दरसाल २ लाखप्रमाणे बाकी फेडणार, हप्ता चुकला की दंड २ हजाराचा.'

'तशा सगळ्याच नटनटयांच्या बाक्या आहेत, पण दानधर्मात एमजीआरची सर कुणालाच नाही.'

'अन् निर्व्यसनी. दारू तर सोडाच, सिग्रेटदेखील नाही.'

'अहो, आमची भांडेवाली आहे ना, उपाशी राहते कधी कधी, तांदळाला पैसा नसतो, पण एमजीआरचा सिनेमा पाहणारच.'

'हो, हे मात्र खरं ! तीनच्या शोला, क्यू बारापासूनच !'

'तुम्ही 'बंद'च्या प्रोसेशनमध्ये होतात का ?'

'का ? दगडफेकीसाठी की लाठ्या खायला ?'

'छे, छे, तो मोर्चा म्हणजे एक्सेप्शन होतं.'

'केव्हाचा ? १५ नोव्हेंबर 'तमीळनाडू बंद'चा ना ?'

'मोर्च्यातच दोन लाख लोक असतील अन् मौट रोडवर गर्दी किती होती बघायला ? सहा मैलाचा मौट रोड आहे म्हटलं'

'मद्रासच्या इतिहासात असा निघाला नव्हता म्हणे !'

'मग एमजीआरनं काय केलं ?'

'गव्हर्नरांच्या हातात दिला तो लांचखोरीचा हिशोब-लेखी !'

'ते काहीही असो. सत्तेपुढं शहाणपण चालत नाही म्हणजे नाही.'

'बघुयात की आता ! केस हायकोर्टात गेलीय.'

'कोर्ट काय सांगणार कपाळ ? काँग्रेसच्या बाबतीत काय झालं ? एकाला गायवासरावर गप्प केलं तर एकाला चरख्यावर ! तसंच इथंही होणार. ड्रामा तोच, पात्रे फक्त निराळी – एमजीआर करुणानिधी !'

'काहो, पण ह्यांचं एकाएकी कसं बिनसलं ?'

'एकाएकी कसलं ? मदूरा कॉन्फरन्स पासनं. त्यांच्या त्या हिशोबत म्हणे कित्येक लाखांची अफरातफर आहे अन् ट्रेझरर म्हणून ह्याने जाब विचारला म्हणून तिकडे त्यांना राग आला. पुढे एमजीआरने खाजगी मालमत्ता जाहीर करावी असं सभेत सांगताच त्याचीच पक्षातून हाकालपट्टी केली न् तिथेच लढाईस तोंड लागलं.'

'बाकी कामराज, राजाजी सुद्धा एमजीआरचे बाजूला हं.'

'भक्तवत्सलम्चं नाव ऐकू येत नाही. माजी मुख्यमंत्री.'

'ते आजारी आहेत ना ! हॉस्पीटलात आहेत. बाथरूममध्ये पडले म्हणे.'

'तुम्हाला बरं ठाऊक ?'

'जीएच् मधे देखील नसेल कुणाला ठाऊक ? माडीवरच्या एका स्पेशल रुमात म्हातारा ठेवलाय आपला बॅण्डेजमध्ये. तोच एखादा दुसरातिसरा मिनिस्टर असता तर ?'

'पण एमजीआर चिडला त्याला खरं कारण निराळंच आहे.'

'तो मुथ्थू ह्या लोकांनी पुढे आणला. ते ना ?"

'ते तर आहेच, पण बाय द वे इन् वूईच ही इज बिइंग ब्रॉट.'

'किती झालं तरी चीफ मिनिस्टरचा पोरगा ना !'

'ती वाढदिवसाची मिरवणूक पाहायला हवी होतीत्. गणेशोत्सवाचे दिवशी महाप्रसादाचं जेवण होतं ना, त्याच दिवशीची. नाव अण्णादूरैचं, पण प्रचार, जयजयकार मात्र मु. का. मुथ्थूचा ! त्याच्या फोटोचे फलक दहाबारा हजार तरी असतील. चौसष्ट फ्लोटस् मिरवणुकीत. सारे पोलीस बंदोबस्तालाच. एकेका फ्लोटवर केव्हढा खर्च झाला...'

'आणि हिंदी राक्षसीणीचा विद्रूप पुतळा पण एका फ्लोटवर होता ना ?'

'पहाना, हिंदी विरोधाचा व वाढदिवसाचा काय संबंध ?'

'मुथ्थूमुळे, एमजीआरचे हिरोपणाला शह बसला ना !'

'बसला नाही, पण तसे प्रयत्न सुरू झालेत.'

'हे मात्र खरं !'

एव्हाना पाऊस जरासा कमी झाला होता अन् मंडळीही पुष्कळच जमली होती. त्यापैकी कुणीतरी घड्याळात पाहात, दुसऱ्यास विचारलं सहजच.

'कुणाचा सत्कार आहे आज ?'

'पोहोण्याच्या स्पर्धातल्या मुलामुलींचा'

'कधी झाल्या ?'

'तिकडे चौपाटीवर झाल्या. मी गेलो होतो. राष्ट्रीय चॅम्पीयनशीप स्पर्धा होत्या. महाराष्ट्रातून ८०।८५ जणाचा गट तेवढ्यासाठी मद्रासला आला होता. यंदा मराठी लोकांनी मद्रास गाजविलं बरं का ! अगदी प्रथमच.'

'ते कसं ?'

'टिंगू खटावने नवं रेकार्ड केलं. मुंबईची ती कोण स्मिता देसाई, तिनं तर सगळ्या स्पर्धा जिंकल्या. सगळ्यात मला आवडली ती जोत्स्ना तळवलकर.

बारा-तेराची एवढीशी चिमुरडी, पण पाण्यात जशीकाही पापलेट–दुसरा नंवर मारलान्.'

'आपल्या काणे इंजिनियरांचा मुलगा पण होता ना?'

'पण तो तमीळनाडूच्या बाजूने होता. त्याच्यामुळे तरी यंदा तमीळ-नाडूचं नाव बोर्डावर लागलं हेच पुष्कळ झालं'

'अन् तिकडे क्रिकेट-टेस्टमध्येही साळगांवकर अन् वाडेकर – दोघांनी खुद्द मद्रासच्या पीचवर, मद्रासला हरविलं.'

'पांडूरंग साळगावकर आमच्या कोल्हापूरचा बरं का!

का कोण जाणे! उगीचच सारेजण हसले. मीही तेथून हळूच सटकलो. अंग गारठलं होतं. मस्तपैकी गरमगरम चहाच्या डवलकपाची तातडीने जरूरी होती. पण तेवढयात एकानं मला हटकलंच –

'ऑ? तुम्ही चाललात? मग रिपोर्ट कोण देणार?'

–पण माझ्याऐवजी कुणीतरी परस्परच उत्तर दिलं –

'कार्यक्रम वघूनच रिपोर्ट लिहायचा असतो असं कुणी सांगितलं?'

–मी सोईस्करपणे ते ऐकलंच नाही!

□ □ □


माणूस
मधून
प्रसिद्ध
झालेली
अरुण
साधू
यांची
लेखमाला

फिडेल
चे
आणि
क्रांती

पुस्तक
रूपात
प्रसिद्ध
झाली

राजहंस
प्रकाशन
किंमत
सात रुपये



शेल्फमधली पुस्तकं आणि कोपऱ्यात पडलेल्या अनेक चौकटी, कागदांची भेंडोळी झटकून ठेवली आणि मी बाहेर जायला वळले. भितीलगतच्या आराम खुर्चीमधे रमाकांत केव्हा येऊन बसला ते मला कळलंसुद्धा नव्हतं. मला आश्चर्यच वाटलं. चेहऱ्यावर घामाचा ओलावा होता. त्याच्या अंगावरचा शर्ट कसा मळून चुरगळून गेलेला होता. बूटावर धूळ होती. चांगलीच पायपीट झालेली दिसते. चटकन् मनात विचार केला, म्हटलं उद्याला रमाकांताचे कपडे स्वच्छ धुवून ठेवायला हवेत आणि आतल्या आतच माझ्या पोटात पीळ पडला.

"हे काय ? असा उगा मुगा आलास ? मला कळलं-सुद्धा नाही केव्हा आलास ते ? चहा आणू ना ?" मी म्हटलं.

"नको !"

वा : झालंय तरी काय ?"

# विमला

सौ. चंद्रप्रभा जोगळेकर

"मला चहा नकोय."

"अगबाई, राग आलाय वाटतं ?"

त्याच्या ओठांवर जे हास्य उमटलं त्याचा अर्थ फक्त मलाच ठाऊक होता. कुणाला कळणार ? त्याच्या प्रत्येक हालचालीचे अर्थ मी जाणत होते. हा केव्हा खुशीत असतो, केव्हा थट्टा करायच्या मूडमधे असतो, केव्हा थकलेला असतो, केव्हा तंद्रीत असतो, केव्हा उदास असतो केव्हा विफल मन:स्थितीत असतो, सारं सारं माझ्या मनाला ठाऊक होतं. ते हास्यही मला कळलं होतं. आज तो भलताच वैतागलेला होता, डिवचला गेला होता. पण ह्या मन:स्थितीत सहानुभूती दाखवणं वाजवी नव्हतं. त्याची कीव करणं योग्य नव्हतं. त्याच्या भकास चेहऱ्याकडे दृष्टीक्षेप टाकून मी तशीच बाहेर पडले. बाकी उद्योगाला लागले, पण माझं चित्त नव्हतं कशात.

रमाकांत किती तरी वेळा बाहेर आलाच नाही. मीही पुन: आत डोकावले नाही. काही काही वेळेला माणसाला एकट सोडणं भाग असतं. त्याशिवाय खंत सुटत नसते.

"आई, पपा नाही आले ?" राणी खेळून घरात येताच म्हणाली.

"आलेत की ! पण राणी पपांना त्रास नाही द्यायचा हं ?"

"नेहमी कसा ग आमचा त्रास होतो तुम्हांला ? जेव्हा पहावं तेव्हा तेच. कुठायत पपा ?

"राणी, माझी शपथ आहे तुला. आता तेथे जाऊ नकोस. ऐकणार नाही माझं ?" राणीचा चेहरा विलक्षण कावरा बावरा झाला. डोळे कमालीचे हिरमुसले. क्षणभर माझ्याकडे पाहून तिने माझ्या कंबरेला मिठी घातली. नको नको म्हणता माझा गळा गच्च भरला.

"आई, आज पण पपांचं चित्रं परत आलं ?" राणीनं मान उंचावून विचारलं.

"छट् वेडे. कुणी सांगितलं तुला ? मनास येईल ते बोलावं होय ?"

"मग मला का जाऊ देत नाहीस ?"

"राणी उगाच प्रश्नांची सरबत्ती करू नकोस. थकून आलेत ते फार. त्यांना त्रास नाही द्यायचा. ऐकायला शीक जरा. जा तिकडे. मलाही काम करू दे."

"पपांना रिपोर्ट दाखवायलासुद्धा नको जाऊ ?"

"रिपोर्ट ? रिपोर्ट आला राणी तुझा ? अन् का ग लबाड, मला नाही दाखवलास दिवसभरात ?"

राणीनं उजव्या हाताचा अंगठा नाचवला. जीभ दाखवीत म्हणाली, "पहिला मान पपांचा. मग दुसरा तुझा ?"

"मोठी आली आहेस मानापानांच्या गोष्टी सांगणारी. आण, दाखव ना मला ?"

"उहूं ! पपांना रिपोर्ट अन् तुला पत्र पहिले दाखवायचं."

"पत्र ?"

"हो. सिस्टरनं दिलंय." ते पत्र काय होतं तेही मला ठाऊक होतं. पुन: माझ्या पोटात पीळून आलं. किती

दिवस चालायचं हे असं ? किती अन् कसं ओढायचं सारं ? मजूर वर्गासाठी लोक शिरा ताणून व्याख्यान देतात. गरिबी हटावचे शंखध्वनी करतात. पण खरा पीळला जातो तो आमच्यासारखा वर्ग. श्रम करायला राजी असून आम्हाला काम करता येत नाही. नोकऱ्या मिळत नाहीत, मिळाल्या तर टिकत नाहीत. व्यवसायाला वाव नाही.

गेल्या दीड वर्षात अगदी चार घरी जाऊन पोळ्या लाटून यायचीसुद्धा माझ्या मनाची तयारी मी केली होती. पण आपल्या इकडे श्रमदानाला महत्वच नाही मुळी. नुसता कोंडमारा, नुसत्ता वैताग.

राणीनं पळत पळत जाऊन सिस्टरचं पत्र माझ्या हाती आणून ठेवलं. सिस्टरचं हे पाचवं पत्र होतं. एकच मजकूर. पाठ होता एव्हाना मला तो. पाच महिन्यांची फी थकली होती. देणार कुठून ? माझ्या-जवळ काय होतं ? अन् रमाकांतला तरी कोण्या तोंडानं सांगणार होते ? घरात चार घास खायची पंचाईत उभी झाली होती. मी ते पत्र मुठीत ठेवून आवंढे गिळले. माझं त्राण संपत आलं होतं. केव्हातरी हे सारं कोसळून पडणार होतं.

रमाकांत एक भाऊक, दर्जेदार कला-वंत. नजर ठरू नये अशी त्याची चित्र-कला. त्याच्या कुंचल्यात विलक्षण धार आहे, जादू आहे. मोठे मोठे, वडील कलावंत त्याची पाठ थोपटतात. पण बाजारात किंमत शून्य. जीव ओतून घडवलेली कलाकृती जगापुढं मांडायला देखील वशीला लागतो आज. नुसतं कसब चालत नाही. बुद्धी चालत नाही. चालतो फक्त वशीला. पैसा कमवायला, जीव जगवायला, श्वास घ्यायचा असला तरी दाम मोजावा लागतो. खरंच, आग का नाही लागत अशा परिस्थितीला ?

दीड वर्षापूर्वीपर्यंत प्रपंच ठीक चालत होता. रमाकांताची नोकरी चार घास सुखानं खाऊ घालीत होती. अंगावर कपडालत्ता येत होता, राणीची शाळा, पुस्तकं व्यवस्थित भागत होती. पण दैवाला बघवलं तर ना ? दीडवर्षामागं रमाकांताची सुट्टी झाली. कुणा मंत्र्याचा काका, मामा मधे घुसला. आम्ही बेवारशी. एक प्रेमी कलाकार फेकला गेला.

दोघांनी एकमेकाला धीर देत आम्ही उज्वल भवितव्याची वाट पाहत राहिलो.

"तुझ्यासारख्या क्रीयेटिव्ह आर्टी-स्टला नोकरीच्या बंधनात जखडून चालणारच नाही. कालावंत कसा निर्बंध, मोकळा असायला हवा." मी त्याची समजूत घालत होते. पण अंतः-र्यामी माझेच शब्द धारदार पाट्या-सारखे मलाच कापत होते. कुठून तरी त्याच्या अंगची कला जीवंत ठेवण्याची माझी धडपड होती.

नुसती चित्रं रंगवून पोट भरत नव्हतं. सुरुवातीचे धक्केबुक्के हळूहळू सहनशीलतेच्या बाहेर जाऊ लागले. एकावर एक चित्रं रंगवून होत होती. जागोजाग रमाकांताच्या बुटांचे तळवे घासले जात होते. राणीच्या झग्यांना

शिवणी घालून घालून कपडे चिरचिरे झाले होते. चित्रांची भेंडोळी रमाकांता-बरोबर बाहेर जात होती, तशीच घराला परतत होती. प्रत्येक नमुना अडगळ होऊन पडत होता. माझी भूक मला दाबता येत होती. पण रमाकांताची भूक, ते कागद, ते रंग, ते कुंचले, त्या चौकटी मला बाजूला सारता येत नव्हता. प्रत्येक कागद खरीदताना राणीनं मागितलेल्या कॅडबरी चॉकलेटची आठवण मला जाळीत होती.

माझी बुद्धीमत्ता, माझं शिक्षण सारं त्या त्रिकोणात वुरसटून गेलं होतं. राणीला खूप शिकवायचं होतं. राणीच्या रुपाचं चीज करायचं होतं. राणीला हट्टानं मी कॉनव्हेंटमधे घातलं होते. पण आता हा गाडा ओढणं फार कठीण होऊन बसलं होतं. पाच महिन्याची फी थकली होती. चार वेळा मी शाळेत भेटून आले होते. मुदत मागून आले होते. एकादं चित्रं विकलं गेलं, की प्रथम मी तिची फी भरणार होते.

मला गरगरून आलं. पत्र मुठीत दाबून मी छातीत दाटलेले आवंढे कचाकच गिळले. आता शक्य नाही. आता हा कलावंत जीवंत ठेवणं शक्य नाही. आजच मी केवढी तरी रद्दी विकून टाकली होती. किती कागद. किती चित्रं ?

"आज कीनई, पपांना रिपोर्ट दाखवून बक्षीस घ्यायचं." राणी म्हणाली. "तो गुलाबी फ्रॉक, त्यादिवशी आपण पाहिला नं ? तोच. घेऊन देशील न आई ?" राणीनं पुनः मला विळखा घातला.

"राणी, तुला कसं कळत नाही ? सारखा हट्ट नसतो करायचा ?"

"आता जाऊ पपांकडे ?"

"आधी मला रिपोर्ट दाखव."

राणी परत आली तेव्हा तिच्या हाती एक कागदाचं चिटोर होतं. "हे काय ?"

"रिपोर्ट !"

"असा ? ह्या कागदाच्या कपटयावर ?"

"मग काय करणार ? तुम्ही फी देत नाही. सिस्टरनं मला मार्क उतरून दिलेत. रिपोर्ट मिळालाच नाही. पहिला नंबर आलाय म्हटलं बच्चंजी."

आई ग,......कोण दशा माझ्या बाळाची ? मी घट्ट घट्ट दात आवळले. ◻

एका दुपारी दारावर थाप पडली. माझा जीव धपापला. घरमालकाचा कारकून ? की वाण्याचा माणूस ? थरकापत मी दार उघडलं.

"रमाकांत आहेत ?"

"आता या वेळी ?" मी विचारून गेले.

"ओहो. स्टुडिओत गेले असणार."


कुठला आलाय स्टुडिओ. सारं घरात, इथंच, तोही अर्धा अधिक रिकामा करून टाकलाय मी.

"केव्हा भेटतील ?"

"संध्याकाळी !"

"त्यांच्या स्टुडिओचा पत्ता द्याल ?"

"खरं तर ते गावाला गेलेत. संध्याकाळपर्यंत येतो म्हणालेत." मी लाज न आवरून म्हटलं.


मिळवा!
7 1/4 %
टपाल कचेरीच्या
5-वार्षिक
मुदतीच्या ठेवीतून
3 वर्षांना 7 टक्के
1 वर्षाला 6 टक्के
इतर करपात्र सुरक्षापत्रें आणि अनामतींसह या ठेवींवरील
1 वर्षातील रु. 3000 पर्यंतचे व्याज प्राप्तीकरांतून मुक्त.
अधिक तपशीलासाठीं टपाल कचेरीत चौकशी करा.
राष्ट्रीय बचत संघटना

davp 71/291

" आली का पंचाईत ?"

" का, काय झालं ?"

" काही नाही. पुन: भेटू त्यांना."
मला काहीच बोध झाला नाही. आलेले तसेच परत गेले. माझ्या मनाचं ओझं उराशी बांधून मी माघारी वळले.

चार दिवसांनी रमाकांत केव्हा तरी उशीराच घरी आला. आताशी काळजी-चंही दुःख जाणवेनासं झालं होतं.

" राणी कुठाय ?" किती दिवसांनी ही राणीची चौकशी ऐकत होते मी ? मला आश्चर्य वाटलं. रमाकांताच्या काजळल्या चेहऱ्यावर तुकतुकी दिसली.

" राणी खेळतेय बाहेर. चहा ठेवू ना ?"

" चहा नको."

" का ?"

" तू हवीस !"

" हा काय पोरखेळ ?"

" रागवायला काय झ लं ?"

" रागावतेय कुठे ? माझं चित्तच उरलं नाही कशात."

" राणीसाठी चॉकलेट आणलंय !"

खरंच ?" मी वाघीणीसारखी झेप घेतली.

" चित्रं विकलं गेलं ?" मी आनंदून विचारलं. रमाकांतनं मान झुकवली. त्याचा अर्थ नकारात्मक होता. साऱ्या हालचाली पाठ झाल्या होत्या मला.

" मग हे चॉकलेट ?"

" एका ठिकाणी गेलो होतो. भेटायला बोलावलं होतं. तिथं राणीएवढीच एक मुलगी होती. फार गोड. फार लाघवी. खूप गप्पा केल्यान् तिनं. मग म्हणाली " अंकल, तुम्हाला चित्र काढत येतं ?" मी म्हटलं " हो." मग म्हणाली, " हा घ्या कागद. ही पेन्सील, काढा बघू एका सशाचं चित्र." मी म्हटलं, " मला काय देशील ?" तर म्हणाली, " चॉकलेट." मी पाच मिनिटात सुंदर ससा काढून दिला. तिनं मला चॉकलेट दिलं. राणीसाठी घेऊन आलोय ते."

माझं समाधान मुळीच झालं नाही.
" पण, ते, कुणाला भेटायचं होतं... त्याचं...त्याचं काय ?"

" त्यांची भेटच नाही झाली. खूप वाट पाहिली."

" मग ?"

" मग काय ? पुन: केव्हा भेटू ? आता तूही चल माझ्या बरोबर. फार गोड मुलगी आहे. तुला फार आवडेल."

मी जागच्या जागीच पाय घासले.
" मी नाही जाणार कुठं."

" का ? चांगली माणसं आहेत."

" असतील. मला नाही जायचं."

" राहिलं !" राणीला हाक मार ना ? राणू...ए राणी..." रमाकांतानंच हाक मारली. त्याच्या हातचं चॉकलेट पाहून राणी हरखली. बाप-लेकीच्या किती वेळ गप्पा झाल्या. दोघंही मला पार विसरून गेले. ◻

" चहा करतेस ना ?" माझ्या पाठीशी उभा राहून रमाकांत म्हणाला.

" आज आपणहून चहा मागतो आहेस ? एरव्ही विचारलं की नको म्हणतोस." मी म्हटलं. पटकन् त्याला चहा करून दिला. हल्ली कामाधामाचं विचारायचं मी सोडूनच दिलं. मी

विचारायचं अन् त्यानं हताशपणे नकार घंटा ऐकवायची. रबर ताणून तुटायला झालं होतं अगदी.

" ए, रागावणार नसलीस तर काही दाखवीन म्हणतो तुला." रमाकांत आगतिकपणे म्हणाला.

" काय ?"

" रागवणार नाहीस याची कबुली हवी आधी."

" नवं चित्रं ?"

" चौकशा व्हायलाच हव्यात ?" मला त्याची किव आली. दया आली.

" दाखव की. कबुली दिली."

एक मोठं कागदाचं पाकीट घेऊन तो आला. माझ्याकडे असं काही त्यानं पाहिलं की मी अगदी शरमिंधी झाले. मी ते पाकीट उघडलं. त्यांत एक साडी होती. एक ब्लाऊजपीस होता. हसावं का रडावं मला कळेना. सकाळी अगदी अक्षरश: पोटाला चिमटा घेऊन अखेरचे पैसे कागद आणि रंगासाठी मी त्याला काढून दिले होते. असे वापरायचा काय अधिकार होता त्याला ? मला चीड आली. संताप आला. राणीला आवडलेला गुलाबी फ्रॉक माझ्या डोळ्यापुढं झोकांड्या खाऊ लागला. माझ्या डोळ्यातला अंगार त्याला दिसला असावा.

" रागवायचं नाही म्हणून कबूल केलं आहेस."

" पण रमाकांत, तू हे असं का करतोस ? काय जरूर होती याची ? तुझं प्रेम एरव्ही मला समजत नाही असं तुला का वाटावं ?"

" शांती, शांती..."

" कसली शांती घेऊन बसला आहेस. वैताग आलाय !" रमाकांताचा फार हिरमोड झाला. त्यानं एक उसासा टाकला आणि तो निघून गेला. साडीची घडी हाती धरून मी किती किती रडले. जराशानं रमाकांत पुन: आत आला. माझ्या दंडाला स्पर्श करून म्हणाला,

" हे तुझे पैसे !" मला आश्चर्याचा धक्का बसला.

" सकाळी दिलेले ?"

" हो !"

" मग ही साडी..."

" रागावायचं नाही कबूल करून रागावलीस, तुझा दोष नाही म्हणा, पण मी तुझे पैसे वापरले नाहीत."

" मग ?...रमाकांत...उचलून तर आणले नाहीस ?" त्यानं मान हलवली. माझी खात्री पटली, रमाकांत असं कधी करायचा नाही.

" उद्या आपल्याला जायचं आहे. फार महत्त्वाची अपॉईंटमेंट आहे. मला ठाऊक होतं तुझ्याजवळ धडवाणी कपडे नाहीत म्हणून आणली."

" पण मला जायची काय जरूर आहे ?"

" आहे, म्हणूनच हा खटाटोप. जास्त प्रश्न विचारले नाहीस तरी चालेल."

" प्रश्न नाही विचारत रमाकांत. पण कुठल्या तरी आशातंतूला लटकून ही उधारी तू करायला नको होतीस." मी म्हटलं.

" ही उधारी नाही." सारं विश्व माझ्याभवती फिरलं. उधारी नाही. एका साडी-पोलक्याचे पैसे रमाकांताला

कमावता आले?...माझा ऊर भरून आला.

दुसरे दिवशी ती साडी नेसून मी रमाकांताबरोबर जायला तयार झाले. राणी कुठून कशी ती येऊन टपकली.

"अय्या, आई, नवी साडी? कुणी दिली?"

"तुझ्या पपांनी!"

"ओहो. New Pinch." राणीनं माझ्या दंडाला करकचून चिमटा घेतला.

"अग हो, हो...सोड तरी..."

"ऊंहूं! Thank you म्हण."

"Thank you." राणीनं चिमटीत धरलेलं माझ्या दंडाचं मांस सोडलं. पण ती हुळहूळ थांबेना. काचेच्या शोकेस-मधे टांगलेला ऑरगंडीचा नक्षीदार फ्रॉक माझ्या डोळ्याभवती नाचला. तिच्या अंगावरच्या फ्रॉकची ठिगळं फेर धरून उभी राहिली. तिला टाकून मी हे घ्यायला नको होतं. हे नेसायला नको होतं. पण मला बाहेर जायचं होतं. रमाकांताची लज्जा राखणं मला भाग होतं.

वारंवार दंडाला गोंजारीत मी रमाकांताबरोबर बाहेर पडले. पुढचं सारं जे घडलं ते बेहोष करणारं. शुद्ध हरपायला लावणारं.

हा नोटांचा ढीग रमाकांताच्या पुढ्यात साचला. पाचपंचवीस ऑर्डरी पदरी पडल्या.

"रमाकांत, तुम्ही पैशाची चिंता करू नका. आपल्याला असं ए वन् काम पाहिजे." त्या माणसानं एक चित्र आमच्यासमोर आणलं. मला मूर्च्छाच यायची त्या वेळी. ते चित्र उरावर धोंडा ठेवून मी त्या दिवशी रद्दीत विकलं होत.

"हे ह्यांचंच चित्र आहे." मी म्हटलं.

"माहीत आहे. एवढा मोठा आर्टिस्ट असा कचऱ्यात पडावा याचं मला नवल वाटतं. दोन रुपयाला मी हे चित्र विकत घेतलं. पण ह्या माणसाची कला अनमोल आहे."

कुणाचं माध्यम कसं उपयोगी पडलं मला सांगता येणार नाही. पण त्या दिवशी परमेश्वरानं अस्मान फाडून दिलं.

सारंच चित्र एकदम बदललं. राणीची फी देऊन रिपोर्ट आला. राणीचा गुलाबी फ्रॉकही आला.

पण माझ्या दंडाला बसलेला New Pinch चा चिमटा मात्र मी अद्यापही विसरले नाही. ◻ ◻ ◻

पुस्तके

# कमलाकी

## सरोज देशपांडे

कमलाबाई देशपांडे यांचे हे चरित्र. 'स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल' या ग्रंथामुळे कमलाबाई जरी काही लोकांना परिचित असल्या तरी त्यांच्या कार्याला किंवा जीवन कहाणीला विशेष प्रसिद्धी लाभलेली नसल्याने बहुसंख्य वाचकांना ही जीवन कहाणी अपरिचित असेल.

'कमलाकी' हे नाव हृद्य आहे. लेखिकेची कमलाबाईविषयींची आत्मीयता त्यातून स्पष्ट होते. या आत्मीयतेपोटीच, कमलाबाईच्या मृत्यूनंतर त्याचे चरित्र लिहिण्याची प्रेरणा लेखिकेला झाली. प्रस्तुत चरित्रात, कालानुक्रमाने कमलाबाईच्या जीवनातील घटना सांगता सांगता लेखिकेने विविध प्रसंगींच्या कमलाबाईच्या मनोव्यापारांचेही विवरण केले आहे. कमलाबाईच्या साहित्याचा परिचयही यात ग्रथित केलेला आहे.

कमलाबाई या तात्यासाहेब केळकरांची कन्या. साताराच्या देशपांडे कुटुंबातील सून. दोन्ही घराणी सुधारक. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हा आंतरजातीय विवाह दोन्ही घरच्या वडील मंडळींनी घडवून आणला यावरूनच हे दिसते. बुद्धिनिष्ठ विचारसरणी कमलाबाईंच्या वडिलांनी जोपासली होती. त्यात भर म्हणजे पतीला शिक्षणाविषयी विशेष आस्था व पत्नीच्या बौद्धिक उत्कर्षाविषयी तळमळ होती. पतिपत्नींच्या बौद्धिक सहजीवनाला— जरी ते फार थोडे लाभले असले तरी— उत्तेजन देणारी वडीलधारी माणसे सासरी होती. असे अत्यंत दुर्मिळ अनुकूल वातावरण कमलाबाईच्या भोवती होते. पंधराव्या वर्षी वैधव्य प्राप्ती ही विलक्षण दुर्दैवाची घटना अत्यंत अकल्पितपणे घडली व कमलाबाई मूळापासून हादरून गेल्या. परंतु ह्या आघातामधून त्या फार प्रशंसनीय रीतीने सावरल्या. वैचारिक परिपक्वतेच्या बळावर त्या कोवळ्या वयात त्यांनी तो आघात पचवला. शिक्षण हे ध्येय ठरविले. या काळात जो लोकविलक्षण कौटुंबिक पाठिंबा कमलाबाईंना मिळाला तो विशेष म्हटला पाहिजे. निरपवाद सामंजस्याने त्यांच्या सासरच्या मंडळींनी त्यांना सावरण्यास सहाय्य केले. त्यांच्या विकासाला सर्वपरींनी हातभार लावला.

डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चित्र नजरे-समोर आणले म्हणजे या कौटुंबिक आधाराची किंमत पुरेपूर जाणवते. घरातील विरोधाने मन पोळून निघत असताना, मनाचे स्वास्थ्य पणाला लावून शिक्षण पूर्ण करण्याची वेळ कमलाबाईं-वर आली नाही. त्यांना घरी उत्तेजन व आधार मिळाला. पुढे शिक्षण पूर्ण झाल्यावर स्त्रीशिक्षणाच्या कार्याला वाहून घेतानाही हाच भक्कम अधार त्यांना लाभला. आपला एकुलता एक मुलगा, श्रीधर याची जबाबदारीही त्याच्या बालवयातच त्यांना कुटुंबीयांवर सोपविता आली. स्वतःचे शिक्षण, स्वतःचा विकास व स्वतःचे जीवित-ध्येय मानलेले कार्य हेच त्यांना साधा-वयाचे होते. या अनुकूल पार्श्वभूमीवर त्यांचे यश तितके नजरेत भरत नाही. त्यांना अधिक भरीव कार्यही करता आले असते असे वाटत राहते.

## गौरवाचा चढा सूर

हे इतक्या विस्ताराने लिहिले याचे कारण कदाचित लेखिकेच्याही नकळत असेल, परंतु ही अनुकूल पार्श्वभूमी 'कमलाकी'त अनेकवार अधारेखित झाली आहे. त्यामुळे या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचे स्वरूप कमी भव्य वाटू लागते. कमलाबाईंच्या पदरी यशाचे माप जरा जास्त भरून टाकले जात आहे अशी बोच राहते. कमलाबाईंच्या व्यक्तित्वाने व कर्तृत्वाने लेखिका भारली गेली अस-ल्याचे स्पष्ट जाणवते. परंतु हे भारलेपण समर्थनीय ठरण्याएवढी भव्यता कमला-बाईंच्या कर्तृत्वाची आहे असे जाणवत नाही. कदाचित याचे कारण असे असेल की, लेखिकेनेच प्रस्तावनेत म्हटल्या-प्रमाणे, कमलाबाईंचे चरित्र लिहावे की आठवणींचा संग्रह प्रसिद्ध करावा या-विषयी लेखिका संभ्रांत होती. स्मृति-चित्रे रंगवितांना लेखकाला स्वतःचे रंग, एका मर्यादेपर्यंत, भरण्याचे स्वातंत्र्य घेता येते. परंतु चरित्रलेखकाला स्वतः-वर वस्तुनिष्ठतेचे बंधन अधिक कठोर-पणे घालून घ्यावे लागते. आपली आत्मीयता दूर सारून अलिप्त व तटस्थ दृष्टिकोनातून शक्य तेवढी वस्तुनिष्ठ प्रतिकृती चरित्रात साकारावयास हवी. हे भान लेखिकेला ठेवता आलेले नाही. हृद्य आठवणींचा संग्रह व त्यात गुण-गौरवाचा सूर किंचित चढा लागलेला असे या पुस्तकाचे स्वरूप झाले आहे.

कमलाबाईंचे व्यक्तित्व दुहेरी होते. त्यांच्या कार्यक्षेत्रातील त्यांचे व्यक्तित्व निग्रही, तत्त्वनिष्ठ, करारी, शिस्तप्रिय होते. कुटुंबातील कमलाबाई मात्र सर्वस्वी निराळ्या वाटतात. मर्यादशील, कामसू सासुरवाशीण व प्रेमळ वडील आप्त अशा त्या दिसतात. या दुरंगी चित्रा-तील तपशील अनेक लहानसान प्रसंगा-तून लेखिकेने भरला आहे. शंकरा-चार्यांनी त्यांचे स्वागत नाकारल्यावर, सातार्‍याच्या कन्या शाळेसाठी त्यांचे फक्त आशीर्वाद मागणाऱ्या कमलाबाई, प्राचार्यपदावर असताना विद्यार्थिनींशी समरसून जाणाऱ्या कमलाबाई अशी अनेक रूपे लेखिकेने लोभस चितारली आहेत. स्त्रीशिक्षण प्रसाराच्या त्यांच्या कार्यात त्यांच्या घरगुती प्रेमळ व्यक्ति-

मत्त्वाने बरेच इष्ट वातावरण कसे निर्माण केले तेही लेखिकेने स्पष्ट केले आहे. साताऱ्याच्या कन्याशाळेचे कमलाबाईंनी केलेले लालनपालन, त्यांची शाळेच्या उत्कर्षाविषयीची आटोकाट धडपड, त्यासाठी कसलेही काम पत्करण्याची जिद्द, सामाजिक प्रतिकूल वातावरणामुळे शाळेचा व्याप वाढण्यात उभ्या राहिलेल्या अडचणी, आर्थिक अडचणी यांचे तपशीलवार कथन केलेले आहे. त्यामुळे कमलाबाईंच्या कार्याचे स्वरूप स्पष्टपणे आकलन होते. (येथेही कुटुंबीयांचा पाठिंबा वेळोवेळी मिळालेला आहेच.) कन्याशाळेचे काम करताना, किंवा हिंगणे संस्थेचे आजीव सदस्यत्व पत्करल्यानंतर लगेचच्या काळातील अपेक्षांचा संघर्ष, त्यामधून कार्यक्षेत्रात निर्माण झालेले तणाव यांचेही निवेदन लेखिकेने केले आहे. हे बारीक सारीक तपशील कमलाबाईंच्या व्यक्तित्वाची उकल करण्यास मदत करतात.

पस्तिशीच्या सुमाराचा आजार ही कमलाबाईंच्या जीवनातील एक मोठी उलथापालथ. तिची उकल लेखिकेने अतिशय नाजूकपणे केली आहे. कमलाबाई व त्यांचे दीर वाग्भट यांच्यात समानशील मित्रत्वाचे असे विशेष जवळिकीचे नाते होते. ते त्याच निर्मळपणाने सर्व कुटुंबीयांस मान्य झालेले होते. परंतु वाग्भटांच्या द्वितीय पत्नी ते समजू न शकल्याने कमलाबाई भ्रमिष्टच झाल्या. ह्या वादळाची तीव्रता व तीमागील मनोव्यापार यांचे चित्रण बारकाईने केले आहे. हा आजार दीर्घकालीन ठरला. त्यातून सावरण्यास कमलाबाईंना फार काळ लागला. त्यानंतरच त्यांना परदेशगमनाचा योग आला. तेथे त्यांना ह्या मानसिक आघातातून सावरण्यास दादा दिवेकर यांचे सहाय्य झाले. या सर्व काळात कमलाबाईंच्या सर्व संबंधितांनी त्यांना आटोकाट जपलेले दिसते. परंतु कमलाबाई मात्र स्वतःच्याच एका कोशात अडकलेल्या दिसतात. ही आत्मकेंद्रितता व विकारवशता समजून घेण्याची धडपड लेखिकेने केली असली तरी तिनेच रंगविलेल्या सहृदय, समंजस व आधारभूत कौटुंबिक पार्श्वभूमीवर ती जरा खटकतेच.

यानंतर डॉक्टरेटचा अभ्यास, परतल्यावर एरंडवनातील प्राचार्यपद इत्यादी तपशील येतो. एरंडवनातील प्राचार्यपदाच्या राजीनाम्याची साद्यंत हकीकत लेखिकेने दिली आहे. यावेळची कमलाबाईंची प्रतिक्रिया विशेष तीव्र व बोचरी वाटते. जरी त्यांच्यावरील दोषारोप चुकीचे असले तरी ही प्रतिक्रिया समर्थनीय वाटत नाही. लेखिकेने मात्र स्पष्टीकरणाचा व समर्थनाचा प्रयत्न केलेला आहे.

कमलाबाईंच्या या चरित्रात निरनिराळ्या व्यक्तींकडून मिळवून बारीकसारीक तपशील लेखिकेने भरला आहे. कमलाबाईंशी निरनिराळ्या संदर्भात संबंध आलेल्या व्यक्तींकडून हा तपशील

लेखिकेने मिळविला आहे. कमलाबाईंच्या व्यक्तित्वाचे सर्व अंगांनी दर्शन घडावे या हेतूने कमलाबाईंचे आप्त, स्नेही, परिचित, सहाध्यायी, सहकारी, विद्यार्थीवर्ग या सर्वांकडून परिश्रमपूर्वक हा तपशील गोळा केला आहे. ह्या परिश्रमांची दखल घ्यावयास हवीच. लेखिकेने निवेदन सुसूत्र व साधे केले आहे. त्या साधेपणानेच हे निवेदन सुरस झाले आहे. विशेष प्रसिद्धी न मिळालेल्या या कार्यकर्तीविषयी अधिक खोलात शिरून माहिती मिळविण्याचे कुतूहल जागविण्याचे कार्य या पुस्तकद्वारा झाले आहे खचित.

कमलाकी
सौ. विद्या बाळ
मौज प्रकाशन
किंमत : १७–५० रुपये. ◻

# विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## मानस आणि तत्त्वविचार

### केशव मेश्राम

चरित्रग्रंथ लेखनाची एक स्वतंत्र शिस्त आणि पद्धती निर्माण करण्याचे श्रेय श्री. धनंजय कीर यांना द्यावे लागेल. चरित्र किंवा परिचय म्हणजे गाडाभर माहितीचा नुसता पसारा नव्हे, हे श्री. कीर यांनी आपल्या सगळ्या लेखनातून सिद्ध केले आहे. साधनांचा पद्धतशीर अभ्यास करून आणि काटेकोरपणाने छाननी करून चोखंदळपणाने त्या चरित्रनायकाचे रसरसते व्यक्तिमत्त्व उभे करण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांचे लेखन हा मराठी चरित्रलेखनाचा अननुकरणीय असा आदर्श म्हणावा लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्यावर श्री. कीर यांनी दिनांक २३, २४ व २५ मार्च १९७२ रोजी मराठवाडा विद्यापीठात जी तीन व्याख्याने दिली होती. त्यात नवीन भर टाकून सानुदानासहीत 'विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मानस आणि तत्त्वविचार' ही मोठ्या शीर्षकाची छोटेखानी पुस्तिका प्रसिद्ध केली आहे.

ह्या तीन व्याख्यानामागे श्री. कीर यांनी एक निश्चित सूत्र ठेवलेले आढळते. पहिले व्याख्यान तत्कालीन ब्रिटिश राजवट, त्यातील इतर समाजहितार्थ झटणाऱ्या सत्यशोधक समाज, आर्य-समाज, परमहंस सभा आणि प्रार्थना समाज यांच्या कृतीचा आणि या प्रेरणे-तून उभ्या झालेल्या चळवळींचा त्यांनी मागोवा घेतला आहे.

बुद्धधर्म आणि समता व मानवता-वादी पंथप्रसारकांच्या म्हणजे बसव, रामानंद, चैतन्य यांच्या कार्याचे तौल-निक मूल्यमापन करून तत्कालीन सवर्ण हिंदूंची मनोवृत्ती, समाजाचा कर्मठपणा आणि त्यांनी लादलेल्या निर्बंधामुळे

अस्पृश्यांच्या वाट्याला आलेले पशुतुल्य जीवन यांचे विदारक चित्र रेखाटून भीमराम सपकाळाचे आंबेडकरात आणि अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि तळा-मुळाच्या झाडपाल्यासारख्या जगणाऱ्या समाजाचा राष्ट्रीय बाण्याचा झुंजार नेता आकारास येईपर्यंतचा आलेख ओघवत्या भाषेत 'महापुरुषाची जडणघडण' ह्या पहिल्या व्याख्यानात घेतला आहे. सर्व-परिचित चरित्रकथन करूनदेखील श्री. कीर यांनी त्यातला वैचारिक गाभा अव्यंग व टवटवीत ठेवला आहे.

समाज़सुधारणा हा शब्द आता नव्याने सवंग झाला आहे. आता कोणीही फारसे काही न करता किंवा नुसते थातूरमातूर करून स्वतःला 'सोशल वर्कर' अशी उपाधी जोडतो आणि सत्ताधाऱ्याकडून व्यावहारिक सुखाची सनद मिळवितो. पण इ. स. १९२४च्या जुलै महिन्यात 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन होऊन दलित स्वातंत्र्याच्या चळवळीचा डॉ. आंबेडकरांनी पाया रचला. पहिल्या महायुद्धाने जगातील वारेही बदलले होते. त्या वेळी कार्य करणारे गोपाळबाबा वलंगकर व शिवराम कांबळे हे आंबेडकरांच्या आधीचे दोन नेते समाजाच्या उत्थानासाठी प्रयत्नरत होते. इतरही हिंदू सुधारक या विषमतेला व विषाला उतारा शोधण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. पण त्यांची ध्येयधोरणे आणि आंबेडकरांचे स्वीकृततत्त्व मूलत: भिन्न होते. स्त्रियांचा वारसा हक्क, विधवांचा पुनर्विवाह, प्रौढविवाह हे रानडे यांचे आवडते विषय. तर बुद्धि-प्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य हे आगरकरांचे घोषवाक्य होते. भिन्न 'समाजिष्ट' मंडळी सामाजिक संघर्ष टाळून भूतदयावादीदृष्टीने अस्पृश्यांकडे व त्यांच्या समस्यांकडे बघत होते. गांधी, सावरकर आणि आंबेडकर यांच्या चळवळीतला फरक श्री. कीर यांनी तारतम्याने पण ठामपणे मांडला आहे. ते लिहितात, 'आईच्या व दाईच्या प्रेमात फरक असतो तसाच ह्या फरक होता. उपकारकर्त्यांच्या वा भूतदयावाद्यांच्या औदार्यातून झालेली सुधारणा ही खरी सुधारणा नव्हे. तसेच राजकीय धोरणातून जन्म पावलेली सुधारणाही खरी सुधारणा नव्हे.'

१९२७ नंतर म्हणजे महाडच्या सत्याग्रहानंतर आंबेडकरांचे नेतृत्व कणखर आणि सबल बनू लागले. २५ डिसेंबर १९२७ रोजी सर्व हिंदुस्थानला जबरदस्त हादरा देणारी गोष्ट आंबेडकरांनी महाड मुक्कामी केली आणि ती म्हणजे, 'शूद्रांचा उपमर्द करणारी, त्यांची सामाजिक, आर्थिक व राजकीय गुलामगिरी कायम ठेवणाऱ्या 'मनुस्मृती'ची प्रकटपणे होळी केली. याच सत्याग्रहात हिंदुसमाजाच्या पुनर्घटनेची मागणी करून 'बहिष्कृत भारत' या नावाचे पाक्षिक सुरू केले. पाक्षिकाचे नाव हे आंबेडकरांनी या देशातल्या एका मोठ्या घटकाची वेदना वेशीवर टांगणारे असेच ठेवले आणि याच अंकात त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करून धर्मांतराच्या बाबतीतले सूतोवाचही केले

आहे. १९२७ साल हे विचारवंत आणि लढवय्या वाण्याच्या परिपक्व नेत्याच्या भक्कम कृतीउक्तीचे वर्ष होते. श्री. कीर यांनी आपल्या लेखात व भाषणात ह्या अनेक सूक्ष्म पण दूरगामी नोंदोंचा चातुर्याने उपयोग केला आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मूल्यमापनात कीर यांनी आणखी एक भान जाणीवपूर्वक ठेवलेलें दिसते. डॉ. आंबेडकरांना दलितांचे पुढारी, दलितसमाजाचे उद्धारकर्ते, असे म्हणत असताना त्यांच्या राष्ट्रभक्तीचा व खऱ्याखुऱ्या भारताच्या सुपुत्राचा विसर कसा पडतो हे त्यांनी सुस्पष्ट केले आहे. ब्रिटीशांना दलितांच्या हालअपेष्टांची जाणीव करून देताना आंबेडकरांनी 'स्वराज्या'च्या मागणीचा जाहीर पुरस्कार धीटपणे केला होता. म. गांधींना १४ ऑगस्ट १९३१ रोजी प्रत्यक्ष भेटीत, "महात्मे हे धावत्या आभासासारखे असतात. त्यांच्या धामधुमीने धुरळा मात्र खूप उडतो. पण ते समाजाची पातळी उंचावू शकत नाहीत." असे सांगणारे आंबेडकर पाहून गांधीगोतावळा व तोंडपूजे दिङ्मूढ झाले होते. पण "डॉक्टर, तुम्ही बावनकशी देशभक्त आहात." हे गांधीजींना मान्य करावे लागले व संयुक्त मतदारसंघ, पुणे करार, आणि गांधीजींशी वैचारिक युद्धाला आरंभ या घटना अटळ झाल्या. १३ ऑक्टोबर १९३५ च्या येवला परिषदेत धर्मांतराचा विचार पक्का बनत गेला आणि १४ ऑक्टोबर १९५६ ला तो प्रत्यक्षात आणतानाही राष्ट्रभक्त आंबेडकरांनी स्वतःला व आपल्या समाजाला कःपदार्थ मानणाऱ्या हिंदूंचेही हीत दृष्टिआड केले नाही म्हणून त्यांनी 'बुद्धधर्म' निवडला हे श्री. कीर यांनी साधार व सप्रमाण मांडले आहे. डॉ. ऱ्हीस डेव्हिडस यांच्या उद्गारांनी, "ते सर्व हिंदूत थोर, शहाणे आणि उत्कृष्ट प्रॉटेस्टंट हिंदू होते" कीर यांनी दुसरा लेख पूर्ण केला आहे.

'राजकीय विचारसरणी' ह्या तिसऱ्या व्याख्यानात व लेखात श्री. धनंजय कीर यांची विषय व मांडणी याबाबत धावपळ झालेली दिसते. कदाचित व्याख्यान व त्याची बंदिस्त वेळ यातूनही हे निर्माण झाले असावे.

गांधीयुगाचे आंबेडकरांनी 'Dark Age' तमोयुग असे वर्णन केले आहे. रानडे आणि गांधी यांची तुलना करताना आंबेडकरांचे परिपूर्ण विश्लेषण व योग्य मूल्यमापन याचे प्रत्यंतर येते. ग्रामपंचायतीवर आधारलेल्या लोकशाहीला आंबेडकर अनुकूल नव्हते. इतकेच नव्हे तर पं. नेहरू यांनाही गांधीजींची विचारसरणी नापसंत होती. खेड्याबद्दल आंबेडकर, "खेडे म्हणजे त्या भागातील स्थानिक वादांचे कोंडाळे, अज्ञानाची, कोत्या मनाची आणि

---

## ६ डिसेंबर १९५६ डॉ. आंबेडकर यांचा महानिर्वाण दिन

---

जातीयवादाची गुहा!" असे म्हणत. तर नेहरूसुद्धा, "संकुचित मनाचे लोक असत्यवादी व दांडगट असण्याचा फारच मोठा संभव." अशा भाषेत गांधीकल्पनांचे खंडण करीत.

'थॉट्स ऑन पाकिस्तान' ह्या ग्रंथातील डॉ. आंबेडकरांच्या दूरगामी विचारांचा व भाकितांचा आजही विचारवंताना यथातथ्य प्रत्यय येतो. लोकसंख्येच्या अदलाबदलीचे त्यांनी सुचविलेले रहस्य न पाळल्याने फाळणीच्या वेळच्या कत्तली उद्‌भवल्या. आंबेडकरांच्या विचारांचा पल्ला तत्कालीन राजकर्त्यांना न कळल्यामुळेच, "काँग्रेसने देशाची फाळणी अधिक हिंदूंची कत्तल अशा दोन्ही घटना स्वीकारल्या!" असे श्री. धनंजय कीर परखडपणे लिहितात.

लोकशाही, राज्यशासित समाजवाद, दप्तरी भाषेसाठी हिंदी भाषेचा आग्रह, सत्याग्रहाबद्दलची स्पष्टोक्ती, या अनेक विषयावरील आंबेडकरांचे विचार कीरांनी या अखेरच्या व्याख्यानात गोवले आहेत. समारोपादाखल म्हणून त्यांनी आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वावर जे भाष्य केले आहे ते अतिशय रसाळ व बोलके आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चरित्रलेखक कसा असावा व त्याचे लेखन कसे असावे हे सोदाहरण समजावून सांगायचे असेल तर या ग्रंथाच्या अखेरीच्या पृष्ठ ७९ ते ८४ या पृष्ठांची आग्रहपूर्वक निवड करावी लागेल.

पिकते तेथे विकत नाही असे म्हटले जाते. डॉ. आंबेडकरांची हिंदुस्तानने आणि स्वतंत्र भारताने जी परवड केली त्या संदर्भात हे ठळकपणे जाणवते. त्यांचे जीवन, त्यांचा अभ्यास व व्यासंग, त्यांचे द्रष्टेपण, त्यांची राष्ट्रनिष्ठा व विज्ञाननिष्ठा या सगळ्या बाबतीत त्यांना जे जे भोगावे लागले ते पाहिले तर लोकशाहीत 'झुंड' डोकी मोजते. डोक्याच्या आत काय आहे ते कधीच ध्यानात घेत नाही असा निष्कर्ष काढावा लागतो.

एक विचारप्रवर्तक ग्रंथ व्याख्यानातून निर्माण झाल्यामुळे मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू रे. पं. नाथ, व विद्यापीठ, श्रीगजानन बुकडेपोचे रघुवंशी आणि लेखक श्री. धनंजय कीर यांचे मन:पूर्वक अभिनंदन करावे लागेल.

**विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
मानस आणि तत्त्वविचार
धनंजय कीर

श्रीगजानन बुक डेपो प्रकाशन
मुंबई
किमत ४ रु. ५० पैसे,
पृष्टे ८४

□ □ □

# फिंगर प्रिन्टस् ब्यूरो !

श्रीकांत सिनकर

मुंबईत लॅमिंग्टन रोडवर रहाणारा एक पोलीस अधिकारी आपल्या पत्नी-सह सिनेमाला गेला असताना एका चोरटयाने त्याचेच घर फोडून सुमारे नऊशे रुपयांचा ऐवज आणि त्या अधि-काऱ्याचे रिव्हॉल्व्हर पळवले. पोलिसांना या गुन्ह्याची खबर मिळताच ते घटना-स्थळी येऊन दाखल झाले. परंतु कसून शोध घेऊनही पोलिसांना तपासकामाची निश्चित दिशा सापडेना. फक्त चोर-टयाच्या हाताचे काही ठसेच तेवढे पोलिसांना सापडले.

हे ठसे पोलीस रेकॉर्डवरही नव्हते. त्यामुळे तपासकार्य अधिकच गुंतागुंतीचे झाले. पुढे जवळजवळ तीन महिन्यांनी सि. आय. डी. अधिकाऱ्यांनी दुसऱ्याच एका इसमास त्याचे जवळ रिव्हॉल्व्हर बाळगल्याबद्दल अटक केली. पोलिसांना रिव्हॉल्व्हर सापडले. पण हे रिव्हॉल्व्हर वरील पोलीस अधिकाऱ्याचेच निघाले. पोलिसांना एवढा धागा सापडताच पुढील तपासास वेग मिळाला आणि सि. आय. डी. अधिकाऱ्यांनी रामचंद्र भिकाजी परब या नावाच्या चोरटयास अटक केली. ही अटक होताच परबच्या फिंगर प्रिन्ट घेण्यात आल्या. वरील पोलीस अधिकाऱ्यांच्या घरात आरंभी पोलिसांना जे ठसे सापडले होते, त्या ठशाबरोबर परबचे ठसे ताडून पहाण्यात आले, तेव्हा हे दोन्ही ठसे एकाच व्यक्तीचे आहेत, ही गोष्ट ठसे तज्ज्ञांनी सिद्ध केली. वस्तुत: परबविरुद्ध सकृत-दर्शनी कोणताही पुरावा नव्हता. परंतु न्यायालयात ठसे तज्ज्ञांचे मत ग्राह्य मानून परबला दिड वर्ष सक्तमजूरीची शिक्षा देण्यात आली...

फिंगर प्रिन्टचा महिमा हा असा आहे. एखाद्या गुन्हेगाराने गुन्हा केल्या-नंतर जरी कोणताही भक्कम पुरावा मागे ठेवला नसला, तरी तिथे मिळा-लेल्या त्याच्या हाताच्या ठशावरून त्याच गुन्हेगारास अटक करणं सहज शक्य आहे. केवळ करंगळीचा अथवा अंग-ठयाचा जरी ठसा सापडला तरी त्या गुन्हेगारास अटक करण्यात येते.

पोलीस तपासकामाची जणू गुरु-

## पंचवीस हजारांची घडयाळे

मुंबईत केवळ पंचवीस सेकंदात पंचवीस हजार रुपयांची घडयाळे डोळयांसमोरून नाहीशी करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर मुंबईत आजपर्यंत घडलेला अशा प्रकारचा हा एकमेव गुन्हा. पोलीस बुचकळयात पडले. या ठकसेनाच्या फिंगर प्रिंटस् पोलीस रेकॉर्डवर नव्हत्या. मग गुन्हेगार कसा शोधायचा ?

पोलिसांनी भारतीय पातळीवर या गुन्हेगाराचा शोध घेण्यास सुरुवात केली. तेव्हा कलकत्ता फिंगर प्रिन्ट ब्यूरोकडे या गुन्ह्यावर प्रकाश पडला. जसा मुंबईत झाला होता तसाच कलकत्ता, दिल्ली, दार्जिलिंग येथेही तोच गुन्हा झालेला होता.

पोलिसांना या गुन्हेगाराच्या फिंगर प्रिन्टस् मिळताच सी. आय. डी. अधिकारी श्री. टी. बी. गौड यांनी शिलाँग येथे लॉईड शेडाफ या बिलंदर ठकसेनास अटक केली आणि मुंबईहून त्याने नाहीशी केलेली सर्व घडयाळे परत मिळवली.

किल्लीच असलेल्या या फिंगर प्रिन्टची जन्मकथा विलक्षण उद्बोधक अशीच आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीस ही प्रथा प्रथम जन्मास आली. त्याकाळी भारतावर राज्य करीत असलेल्या 'इस्ट इंडिया' कंपनीस भारतीय लोक निरनिराळया प्रकाराने फसवीत होते. इतकंच नव्हे, तर भारतीय लोकांनी 'शाही खजिना'ही अनेकदा उघडलेला होता. अशा चोऱ्या करणाऱ्यांना नेमकं कसं ओळखायचे, अथवा पकडायचं हा कंपनीपुढे मोठा विकट प्रश्नच होता आणि त्यानुसार कंपनीच्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपआपल्या परिने संशोधन सुरू केले.

असं म्हणतात की, एका चिनी सुताराच्या संवयीवरुनच या पद्धतीचा उगम झाला आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीस हा चिनी सुतार आपली निशाणी म्हणून त्या त्या लाकूडकामावर स्वत:चा अंगठा कोरीत असे. त्यामुळे तो अंगठा नजरेस पडताच हे काम कोणत्या सुताराने केले आहे, ते आपोआप समजत होते.

पुढे १८२३ साली प्रो. परंकजी यांनी हस्तरेषासंबंधी अत्यंत मौलिक असा प्रबंध लिहिला. या प्रबंधात सुचविलेल्या मार्गानुसार सर विल्यम हर्षेल यांनी प्रत्यक्ष कृतीचे पाऊल उचलले. सरकारी तिजोरीतून पैसे उचलणाऱ्यांच्या अंगठ्याचे ठसे त्यांनी घेतले आणि यामार्गे पुढे तपास होऊ लागला.

सर विल्यम हर्षेल यांनी सुरू केलेल्या या प्रथेवर अधिक चिंतन करून, संशो-

धन करून १८५८ साली सर फ्रान्सीस गॅल्टन यांनी एका व्यक्तीचे ठसे हे दुसऱ्या व्यक्तीचे असूच शकत नाहीत, असा अलौकिक शोध लावला आणि हा शोध त्यांनी सिद्धही करून दाखवला, तेव्हापासून म्हणजे १८९२ सालापासून ही पद्धत कायम स्वरूपात अंमलात आणण्यात आली.

फिंगर प्रिन्टस्‌ची ही पद्धत अत्यंत प्रगत करण्याचा खरा मान मात्र सर एडवर्ड आर हेन्री यांचाच आहे. या शास्त्राचा सखोल अभ्यास करून हेन्रींनी अनेक नवे उपाय पुढे आणले. एखाद्या माणसाचे घेतलेले ठसे वर्षन वर्षे बदलत नाहीत, ते तसेच कायम रहातात हे हेन्रींनी सिद्ध करून दाखवले. अगोदर इस्ट इंडिया कंपनीत अधिकाऱ्याच्या हुद्यावर असलेले हेच हेन्री पुढे बंगाल प्रांताचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस झाले होते. फिंगर प्रिन्ट शास्त्रात मौलिक भर घालणारे हेन्री १९३१ साली निवर्तले.

फिंगर प्रिन्ट पद्धत अंमलात येण्यापूर्वी गुन्हेगारांना ओळखण्याची आणखीन एक पद्धत अंमलात आलेली होती. या पद्धतीला 'बर्टेलियन' पद्धत असे म्हणत. एखादा गुन्हेगार सुरक्षा अधिकाऱ्यांच्या हाती सापडला, म्हणजे त्याची उंची, वजन, इतकंच नव्हे, तर त्याच्या हातापायाचे मोजमाप घेण्यात येत होते आणि हे मोजमाप रेकॉर्डवर ठेवण्यात येत असे.

परतु एखाद्या व्यक्तीची उंची कालानुसार वाढत असल्यामुळे, आणि एकाच

## मिनी मनी पर्स

मुंबईतील एका प्रख्यात हॉटेलाच्या 'बॉल रूम'मध्ये डान्स चालू असताना बऱ्याच पर्सेस् चोरीस जायच्या. पर्स जागेवरच राहायची. पण आतील 'मिनी मनी पर्स' नाहीशी व्हायची आणि ही गोष्ट डान्स संपल्यानतर त्या त्या स्त्रीस समजायची.

पोलिसांनी बॉलरूममध्ये नजर ठेवली. त्यांना एका तरुणाचा संशय आला. पण त्याच्याविरुद्ध पुरावा काहीच नव्हता. अखेर एका कल्पक सी. आय. डी. अधिकाऱ्याने त्या तरुणाबरोबर गप्पा सुरू केल्या आणि त्याला सरबताचा ग्लास दिला.

त्या तरुणाने सरबत संपवून ग्लास पुन्हा ट्रेमध्ये ठेवला. तो ट्रे घेऊन वेटर आत गेला. तसा तो अधिकारीही 'कूक हाऊस'मध्ये गेला आणि त्याने तो ग्लास आपल्या ताब्यात घेतला. या ग्लासवर त्या तरुणाच्या फिंगर प्रिन्टस् उठलेल्या होत्या. या प्रिन्टस्‌च्या आधारे त्या अधिकाऱ्याने त्या तरुणास अटक केली. अटक करताच त्या तरुणाने आपले सर्व गुन्हे कबूल केले.

व्यक्तीचे मोजमाप अन्य अधिकारीही करीत असल्याने मोजमापात फरक पडू लागला. परंतु त्याकाळी दुसरी कोणतीच पद्धत अस्तित्वात नसल्याने याच पद्धतीचा, जरी ही पद्धत त्रासाची होती, तरी तिचाच अवलंब करावा लागत होता.

बर्टेलियन पद्धत अंमलात असताना पुढे आलेल्या या नव्या फिंगर प्रिंट पद्धतीचा आणि विशेषत: केवळ ठशावरूनच गुन्हेगार ओळखण्याच्या पद्धतीवर तुलनात्मक विचार करण्यासाठी लॉर्ड बेलपर यांच्या अध्यक्षतेखाली १९०० सालात एक कमिशन नेमण्यात आले होते. जवळजवळ चार महिने या कमिशनचे काम चालू होते आणि शेकडो पोलिस अधिकाऱ्यांच्या साक्षी या कमिशनसमोर काढण्यात आल्या होत्या. सर फ्रान्सीस गॉल्टन यांनी दोन माणसांच्या हाताचे ठसे सारखे कसे असू शकत नाहीत, हे कमिशनला पटवून दिले, तर सर हेन्री यांनी केवळ ठशावरून माणसाची अचूक ओळख कशी करता येते हे कमिशनला दाखवूनच दिले.

भल्या भल्या तज्ञांच्या या साक्षी ग्राह्य मानून आणि त्यांच्या संशोधनाचे कौतुक करून फिंगर प्रिंट पद्धतीस अखेर बेलपर कमिटीने मान्यता दिली. म्हणजेच फिंगर प्रिंट पद्धतीला कायदेशीर मान्यता मिळाली ती १९०० सालातच ! तेव्हापासूनच गुन्हेगारांच्या हाताचे ठसे ठेवणे, गुन्हेगार ओळखणे वगैरे कायदेशीर कामास प्रारंभ झाला.

डॉ. ए. बर्टिलियन यांची जी मोजमापाची 'बर्टिलियन' पद्धत होती, ती १८९४ पासून पुढे सहा वर्षे 'स्कॉटलंड यार्ड' मध्ये अंमलात आणण्यात आलेली होती. परंतु १९०० सालापासून स्कॉटलंड यार्डने सर हेन्री यांची पद्धत अंमलात आणली.

आपल्याकडे या पद्धतीचा पाया १८९४ सालातच रोवण्यात आला होता. परंतु जसजशी ही पद्धत अंमलात येऊ लागली, तसतशी ही पद्धत अधिक सुधारण्यात येऊन अधिकच कार्यक्षम करण्यात आली.

१८९८ साली मुंबईचे पोलिस कमिशनर सर आर. एच. व्हिन्सेंट यांनी मुंबईत पहिला 'फिंगर प्रिंट ब्युरो' स्थापन केला, आणि पोलिस इन्स्पेक्टर श्री. किर्तीकर यांना खास शिक्षणासाठी पुण्याला पाठवले. श्री. कीर्तिकर आणि त्यांचे सहाय्यक यांना सर हेन्री यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात फिंगर प्रिंटस् कशा काढायच्या, गुन्हेगार कसा ओळखायचा, वगैरे तत्सम शिक्षणाचे धडे मिळाले. फिंगर प्रिंट शास्त्राचे प्रथम धडे फिंगर प्रिंट शास्त्राच्या जनकाकडून मिळाले ते एका मराठी अधिकाऱ्यालाच !

१८९८ अखेर पोलिसांच्या संग्रही सुमारे तीनशे लोकांचे ठसे तयार होते. तर आज मितीस एकट्या मुंबई पोलिसांकडे लाखाच्या आसपास निरनिराळ्या गुन्हेगारांचे ठसे आहेत. अमेरिकेच्या 'एफ. बी. आय.' (फेडरेशन ब्यूरो ऑफ इन्व्हिस्टिगेशन)कडे तर सात कोटी छपन्न लाख माणसांच्या वीस

कोटी फिंगर प्रिंटस् संग्रही आहेत. याचाच अर्थ अमेरिकेतील दर तीन माणसांमागे एका माणसाचे ठसे एफ. बी. आय. कडे आहेत.

आपल्या महाराष्ट्रात पुणे येथे फिंगर प्रिंटस्चे प्रमुख कार्यालय आहे. याखेरीज मुंबई, नागपूर, औरंगाबाद वगैरे प्रमुख शहरांतही फिंगर प्रिंटस् ब्यूरोच्या शाखा आहेतच. फिंगर प्रिंटस् ब्यूरोचे संपूर्ण भारताचे प्रमुख कार्यालय कलकत्ता येथे आहे. आता या ज्या शाखा आहेत त्यांच्या कार्यपद्धतीची थोडक्यात ओळख करून घेऊ.

समजा, अ हा गुन्हेगार आहे. त्याने मुंबईत एकदा गुन्हा केला असल्यामुळे मुंबई पोलिसांनी त्याच्या हाताचे ठसे घेतले आहेत. हेच ठसे मुंबई सी. आय. डी. च्या रेकॉर्डला असतीलच. शिवाय हेच ठसे पुणे फिंगर प्रिंट ब्यूरोकडे, आणि कलकत्ता फिंगर प्रिंट ब्यूरोकडेही पाठविण्यात येतील. म्हणजेच अ या गुन्हेगाराचे ठसे राज्याच्या आणि देशाच्या प्रमुख फिंगर प्रिंट ब्यूरोकडे संग्रही असतील. पुढे समजा हाच अ गुन्हेगार मद्रास पोलिसांनी मद्रासला पकडला, तर या 'अ'ची अधिक माहिती मिळविण्यासाठी ते पुणे फिंगर प्रिंट ब्युरो-बरोबर संपर्क साधतील. इथे मद्रास पोलिसांना अ या गुन्हेगाराची संपूर्ण माहिती मिळू शकेल. समजा महाराष्ट्रात याच अ ने कोणताच गुन्हा केलेला नाही. याचे गुन्हाक्षेत्र गुजराथ हे आहे, परंतु गुजराथ पोलिसांनी याच अ च्या हाताचे ठसे कलकत्त्याला पाठवले असतील. म्हणजेच मद्रास पोलिसांना या अ ची माहिती कलकत्ता फिंगर प्रिंट ब्युरोकडून तावडतोब समजली जाईल. ही माहिती मिळविण्यासाठी मद्रास पोलिसांना कलकत्त्याला अ च्या हाताचे ठसे अर्थातच पाठवावे लागतीलच. याचाच अर्थ समजा, की नासिक जिल्ह्यात असलेल्या निफाड तालुक्यातील कसबे सुकेनी या खेडेगावात जर एखाद्याने एखादा गुन्हा केला, म्हणजे अल्पावधीतच त्या गुन्हेगाराचे ठसे नासिक, पुणे आणि कलकत्ता येथील फिंगर प्रिंट ब्युरोकडे जमा होतील. फिंगर प्रिंटस्ची ही यंत्रणा पहाताच आपल्याला प्रो. परंकजी, सर फ्रान्सीस गॉल्टन, सर हेन्री यांच्या बुद्धीमत्तेचं कौतुक वाटल्याखेरीज रहाणार नाही...

...या शास्त्राची महति पटण्यासाठी आणखी एक उदाहरण पहाण्यासारखे आहे. एका नदी किनारी एका स्त्रीचे प्रेत सापडले. हा निश्चितच खून आहे, ही गोष्ट पोलिस समजून चुकले. परंतु त्या स्त्रीचा चेहरा विद्रूप केल्यामुळे त्या स्त्रीची ओळख पटणे कठीण होते. पोलिसांनी सर्वत्र तपास करूनही त्या स्त्रीचा पत्ता पोलिसांना सापडला नाही. अखेर पोलिसांनी त्या स्त्रीच्या हाताचे ठसे घेतले. कदाचित ही स्त्री गुन्हेगार असेल आणि त्यायोगे आपण हिचा पत्ता मिळवू अशी पोलिसांची कल्पना होती. परंतु फिंगर प्रिंट ब्युरोच्या कोणत्याही शाखेत त्या स्त्रीचे ठसे नव्हतेच. म्हणजेच ही स्त्री गुन्हेगार नव्हती ही

गोष्ट आपोआपच सिद्ध झाली होती.

पुढे या प्रकरणाचा एक कच्चा धागा पोलिसांच्या हाती सापडला आणि पोलिस घटनास्थळापासून शेकडो मैल लांब असलेल्या त्या स्त्रीच्या घरी पोहचले. त्या घरात त्या स्त्रीच्या ज्या काही खासगी वस्तू होत्या, त्या वस्तूंचे फोटो घेऊन आणि त्या फोटोवरील ठशांचा पडताळा पाहून पोलिसांना आपण नेमक्या त्याच स्त्रीच्या घरी आल्याची खात्री होताच पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आणि तिच्याच नवऱ्याला स्वतःच्या बायकोचा खून केल्याच्या आरोपावरून अटक केली. त्या स्त्रीच्या नवऱ्याने आपला गुन्हा कबूलही केला.

फिंगर प्रिन्टचे शास्त्र अंमलात आलं खरं, परंतु हे शास्त्र खोटं पाडण्याचा चंग काही अट्टल गुन्हेगारांनी बांधला. जे अट्टल गुन्हेगार होते त्यांनी गुन्हा केल्यानंतर आपल्या हातावरील रेषाच नष्ट करण्याचा प्रयत्न केला. काही गुन्हेगारांनी आपल्या हाताच्या पंजावर धारदार ब्लेडचे वार करून रेषा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी चक्क आपला हातच जाळून घेतला. परंतु हे आणि अशा प्रकारचे तत्सम उपाय फोल ठरल्याचे नजरेस आले आहे. हातावरच्या जखमा भरून आल्यानंतर त्या हातावरच्या मूळ रेषा पुन्हा होत्या तशाच उगम पावल्या आहेत.

पाश्चात्य देशात – विशेषतः अमेरिकेतील काही अट्टल गुन्हेगारांनी ‘ प्लास्टीक सर्जरी ’च्या सहाय्याने स्वतःचा चेहराही पूर्णतः बदलून घेतलेला आहे. परंतु कोणत्याही गुन्हेगाराने आपले नाव बदलले, पत्ता बदलला किंवा चेहरा जरी बदलला, तरी तो आपल्या हातावरील रेषा बदलू शकत नाही ही गोष्ट सिद्ध झालेली आहे.

देशातील प्रमुख अथवा राज्यातील निरनिराळ्या फि. प्रि. ब्यूरोकडे अक्षरशः हजारो गुन्हेगारांच्या ‘ स्लिप्स ’ असतात. या हजारो स्लिप्समधून नेमक्या हव्या त्याच गुन्हेगाराची स्लिप शोधून काढणे किती जिकीरीचं काम असेल, याची कल्पना केलेली बरी ! हे काम सहजसुलभ व्हावे, यासाठी प्रत्येक फि. प्रि. ब्यूरोत निरनिराळ्या गुन्ह्यांचे वर्गीकरण केलेले आहे. कुलूप फोडून घरफोडी करणारे, डुप्लिकेट चावीने कुलूप उघडणारे, वहानं चोरणारे, खिसे कापणारे, अशा निरनिराळ्या गुन्हेगारांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे साहजिकच एका फिंगर प्रिन्टस एक्सपर्टचे पथक त्या त्या गुन्हेगारांच्या फिंगर प्रिन्टसवर लक्ष केंद्रीत करू शकते. थोडक्यात म्हणजे ‘ व्हेईकल थेप्ट ’ च्या एखाद्या गुन्हेगाराच्या फिंगर प्रिन्टस् ‘ हाऊस ब्रेकिंग डिपार्टमेन्ट ’कडे न मागता त्या प्रिन्टस् पोलिस ‘ व्हेईकल थेप्ट ’ डिपार्टमेन्टकडेच मागतील.

आता प्रत्यक्षात फिंगर प्रिन्टस् कशा घेतल्या जातात हे पाहू या ! समजा, तुमचं घर फोडण्यात आले आहे. पोलिसांना तुम्ही ही वर्दी देताच पोलिसपार्टी तुमच्या घरी येऊन हजर होते, आणि तपास कामास सुरुवात करते.

परंतु खूप तपासणी करूनही पोलिसांना तुमच्या घरात काहीच 'क्ल्यू' सापडत नाही. अशा वेळी पोलिस अधिकारी तुमच्या घरात चोरट्याने कोणकोणत्या वस्तूंना हात लावला आहे ते पहातो. समजा, तुमच्या घरातील कपाटच फ़ोडण्यात आले आहे. तेव्हा त्या कपाटाला चोरट्याने कुठे हात लावला असेल, याची कल्पना अधिकाऱ्याला येते. तो तावडतोब फिंगर प्रिन्ट एक्सपर्ट आणि पोलिस फोटोग्राफरना पाचारण करतो.

हे दोन्ही तज्ञ तुमच्या घरी येऊन दाखल होतात. त्यांच्याजवळ पोलिस अधिकारी आपला संशय व्यक्त करतो. अशावेळी फिं. प्रि. एक्सपर्ट तुमच्या कपाटावर एक विशिष्ट प्रकारची पावडर हळुवारपणे टाकतो. चोरट्याने कपाटाला जिथे स्पर्श केला असेल, तिथे ही पावडर अलगदपणे चिकटून रहाते. ही क्रिया आटोपल्यानंतर ती पावडर एका ब्रशने हळुवारपणे साफ करण्यात येते आणि थोड्याच वेळात तुमच्या घरात शिरलेल्या चोरट्याच्या हाताचा पंजा त्या कपाटावर दिसू लागतो.

हा पंजा नजरेस पडताच त्याचा फोटो घेण्यात येतो आणि फोटो डेव्हलप करून हाऊस ब्रेकिंग डिपार्टमेन्टकडे पाठविण्यात येतो. घर फोडणारा गुन्हेगार अर्थातच अगोदर पोलिसांच्या रेकॉर्डवर असतोच. कोणताही नवा गुन्हेगार घर फोडण्याचं धाडस आरंभी आरंभी करणार नाही. फिं. प्रिन्टस्च्या हाऊस ब्रेकिंग डिपार्टमेन्टकडून या फोटोंची पहाणी करण्यात येते. ही पहाणी अत्यंत काळजीपूर्वक – विशेषतः एका विशिष्ट प्रकारच्या भिंगातून करण्यात येते. नंतर फोटोवरचे ठसे पोलिसांच्या संग्रही असलेल्या इतर ठशांबराबर ताडून पाहण्यात येतात. आणि याद्वारे तुमच्या घरी चोरी करणारा चोरटा पोलिसांना सापडतो.

पोलिस तपासाचे जे निरनिराळे मार्ग आहेत, त्या अनेक मार्गातील 'फिंगर प्रिन्टस्' हा एक अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. केवळ याच मार्गाने पोलिसांनी अत्यंत गुंतागुंतीच्या कठीण केसीस यशस्वीरीत्या हाताळल्या आहेत. मुंबईत एकाच वेळी चार खून झालेले 'चुनीवाला मर्डर केस' (चार खून एकाच वेळी मुंबईत होण्याचा हा पहिलाच प्रसंग. दुसरा फिरोज दारुवाला मर्डर केस.) प्रकरण तिथे मिळालेल्या फिंगर प्रिन्टस्मुळे अधिकच सोपे झाले होते. आंतरराष्ट्रीय स्मगलर वॉलकॉट हा फिंगर प्रिन्टस्मुळेच पकडला गेला.

सिमल्यात गुन्हा करून एखादा गुन्हेगार रत्नागिरीत स्थाईक झाला अथवा रत्नागिरीत गुन्हा करून एखादा गुन्हेगार पंजाबमध्ये जरी स्थाईक झाला, तरी तो त्याच्या फिंगर प्रिन्टस्मुळे कधी ना कधीतरी पकडला जाणार असतो. दोन व्यक्तींच्या हस्तरेषा सारख्या नसतातच. शिवाय जुळ्या भावांच्या रेषाही सारख्या नसतात. त्यामुळे कोणताही गुन्हेगार पकडणं ही अशक्यप्राय घटना राहिलेली नाही.

काही गुन्हेगार हातमोजे (हॅन्डग्लोज) घालून गुन्हा करीत असतात. परंतु हातमोजे घालून गुन्हा करणारे गुन्हेगारही पकडण्यात पोलिसांना यश आलेले आहेच.

□ □ □



## जबानी तिसरी । हप्ता पहिला

**लेखक : नारायण सन्याल**

**अनुवादक : अशोक शहाणे**

भारतवर्ष आज परत एकदा आपल्या नियतीच्या फाटयावर येऊन उभा आहे.

भारतवर्ष आता साखळदंडातनं मोकळा झालाय्. पण त्याच्या ह्या नकतंच मिळालेल्या स्वातंत्र्यावर सीमेच्या आतनं-बाहेरनं दोन्हीकडनं एकाचवेळी हल्ला व्हायची भीती आहे. ह्या भीतीनं तो गांजलेला आहे. एकीकडे आहे ते जपणाऱ्या जुनाटपंथी मंडळींचा गाडलेपणा, न् दुसरीकडे सगळं उध्वस्त करून टाकायला बघणाऱ्या रुद्रभैरवाच्या तांडवनृत्याची अभिलाषा. अन् ह्या दोन्हीपेक्षा भयंकर सत्यानाशी झंझावातानं सध्या भारून

**चालू लेखमाला**

# मी नेताजींना बघितलंय्

गेलाय् आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा ईशान्य कोपरा. सबंध दुनिया आज दोन छावण्यात विभागलेली. दुसऱ्याचा नाश व्हावा अशा राक्षसी इच्छेनं दोन्ही गट पछाडलेले. आपल्या मानानं दुबळी न् नूर्त कोणत्याच गटात न मोडणाऱ्या राष्ट्रांनी आपल्याच गटात नाव नोंदवावं अशी दोघांचीही इच्छा. अन् ह्या दोन्ही गटांच्या हातात अशी ताकद की एखाद्या लहानसहान देशाला उखडून टाकणं म्हंजे त्यांच्या हातचा मळ आहे. तिसरं महायुद्ध झालं न् वेळ पडली तर असं काही करायला दोघांच्यापैकी कुणीच काही काचकुच करणार नाही.

प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरूंच्या सांगण्याप्रमाणं भारतानं शांततेचं न् तटस्थतेचं धोरण स्वीकारलंय्. लढाई टाळायची भारताची इच्छा आहे म्हणे. पण ह्या दोन भांडखोर गटांनी किंवा आणखीकुणी आपल्याच शेजाऱ्यानं शांततेऐवजी संघर्षाचीच निवड केली, तर आपली परिस्थिती काय होईल? तेव्हा शांततेच्याच धोरणाला चिकटून राहणं भारताला शक्य होईल? तसं शक्य झालं नाही तर तयारी नसल्यामुळं भारताचं स्वातंत्र्य धोक्यात येणार नाही का?

म्हणून मी म्हणत होतो. भारतवर्ष आज परत एकदा आपल्या नियतीच्या फाटयावर येऊन उभा आहे.

दहा वर्षांपूर्वीदेखील भारत अशाच एका फाटयावर येऊन उभा होता. अर्थात तेव्हाच्या न् आत्ताच्या परिस्थितीत किंचित फरक आहेच. ह्या स्वातंत्र्याचं रक्षण कसंकाय करायचं असा प्रश्न आहे आत्ता. दहा वर्षांमागं प्रश्न होता--ते स्वातंत्र्य कसंकाय मिळवायचं--असा.

त्या माहेंद्र मुहूर्तांच्या वेळी भारताच्या एका श्रेष्ठ सुपुत्रानं ह्या प्रश्नाला तोंड दिलं होतं. अन् ते काही एकटे नव्हते. त्यांच्या दुतर्फा येऊन ठाकले होते पूर्व–आशियातले तीस लाख स्त्री-पुरुष. रणांगणावरल्या वेगवेगळया खंडयुद्धात त्यांनी जय मिळवला होता. पण विजयलक्ष्मीनं त्यांच्या कपाळावर निर्णायक विजयाचा टिळा मात्र लावला नाही.

न लावू दे ! पण ब्रिटिश साम्राज्यवाद मात्र ह्या इंफाळ-कोहिमा-आराकानच्या रणांगणावर पुरता मोडून पडला होता—नैतिक दृष्टीनं. तटस्थ न्यायाधीशाच्या दृष्टीनं, जगाच्या दृष्टीनं देशात 'करेंगे या मरेंगे' मंत्र देऊन महात्मा गांधींनी जनतेला घेऊन ब्रिटिशांशी एक विषम लढाई सुरू केली होती. सीमेच्या पलीकडनं ह्या वीर सुपुत्रानं त्याचाच प्रतिध्वनि ऐकवला होता 'चलो दिल्ली 'च्या रणगर्जनेतनं.

भारताच्या सीमेपार १९४३ साली नेताजी सुभाषचंद्र बोसांनी स्वतंत्र भारताचं पहिलं हंगामी सरकार बनवलं होतं. परदेशी राज्यकर्त्यांचं टोळकं दोनशे वर्षं भारताच्या जमिनीला गोचिडीसारखं चिकटून होतं. त्यांना हाकलून लावण्याकरता मुक्तिसेनेनिशी नेताजी तुटून पडले होते – ह्या पराधीन देशाच्या पूर्वेकडच्या भागात.

नेताजींनी आझाद हिंद सेनेनिशी ब्रिटिश साम्राज्यवादावर नव्याच रणांगणावर अशी चढाई केली नसती तर काय झालं असतं, त्याचं संशोधन पुढं इतिहासकारांनाच करू दे. ह्या दुसऱ्या स्वातंत्र्यसंग्रामाचं नेतृत्व नेताजींनी केलं, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. अन् आमचं एवढंच म्हणणं आहे की आज ज्या स्वातंत्र्याबद्दल आपण चर्चा करतोय्, ते स्वातंत्र्य नेताजींनी अशाप्रकारे किमान दहा वर्षं तरी अलीकडे खेचून आणलं होतं.

एकोणीसशे सत्तेचाळीसच्या ऑगस्टमध्ये हे स्वातंत्र्य आलं. ब्रिटिश साम्राज्यवादी लोक ह्या देश सोडून निघून गेले. अर्थात् आणखी बरेच दिवस आपण इंग्लंडच्या राजाचं अनुयायित्व मान्य करून काढले. पन्नास सालच्या जानेवारीपर्यंत. 'रक्तपाताविना' सत्तेच्या समर्पणाचा शेवटचा अध्याय संपला. स्वतंत्र प्रजासत्ताक भारताचा जन्म झाला.

त्या बेचाळीस ते पंचेचाळीसच्या दरम्यानच्या काळात पूर्व-आशियात नेतजींनी जो मुक्तिसंग्राम चालवला होता--त्यात माझीहि एक अगदी क्षुल्लकशी भूमिका होती. ईश्वराची फार मोठी कृपा--नेताजी जेव्हा रात्रंदिवस अखंड श्रम करून इतिहासाचा नवा अध्याय रचत होते, तेव्हा त्यांना अगदी जवळनं बघायचं दुर्मिळ भाग्य मला

लाभलं होतं.

मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे. ही माझी प्रत्यक्ष साक्षीदाराची जबानी आहे. ही जबानी म्हंजे काही माझं म्हातारपणचं स्मृति चाळवणं नाही. सुस्त होऊन पडलेल्या आयुष्याच्या संध्याकाळी जुन्या आठवणी रवंथ करत बसणं नाही. ह्या जबानीचं प्रत्येक वाक्य तुम्हाला हाक देतंय्. म्हणतंय्—बघा! आज ह्या नव्या फाटयावर नव्यानं वाट सापडायची काही निशाणी, नव्या पावलाची काही प्रेरणा ह्या स्मृतिकथेत तुम्हाला मिळते का बघा.

निदान मला तरी खात्री आहे की नेताजींचं चरित्र न् त्यांच्या संदेशाची आवश्यकता भारतवर्षात राह्यलेलीच नाही असं मुळीच नाही. अन् निव्वळ आजच काय म्हणून, पुढंहि कोण्याकाळी त्याची किंमत कमी होणार नाही. पण हे आत्ता सुरवातीलाच कशाला. ते आपल्या जागी येईलच की सावकाशीनं.

दुसरं महायुद्ध तेव्हा पंधरा महिन्यांचं बाळ होतं. म्हंजे एकोणीसशेचाळीस साल. नवेंबर महिना. तेव्हा मी विमानानं बँकॉकला गेलो. मी होतो रॉयटरचा खास बातमीदार. पूर्व-आशियाच्या आकाशात जे वळवाचे ढग जमा व्हायला लागले होते त्यांचं निरीक्षण करणं हे माझं काम होतं. त्यांच्या बातम्या गोळा करायच्या. जपाननं मोठ्या नाटयपूर्ण रीतीनं महायुद्धाच्या रंगमंचावर एंट्री घेतली. एक्केचाळीसच्या आठ डिसेंबरला. मी प्रयत्न केला होता भारतवर्षात पळून यायचा. माझी बायकों-मुलं भारतातच होती. दक्षिण भारतात. पण पळून यायचा माझा प्रयत्न काही यशस्वी झाला नाही. तसंच रहावं लागलं पूर्व-आशियात. बँकॉकलाच.

सहा महिन्यांनी क्रांतिकारक रासबिहारी बोसांनी भारताच्या स्वातंत्र्य-आंदोलनाचा महायज्ञ सुरू केला. रासबिहारी बोसांचं तेव्हा वय झालेलं. भारतातनं पळून जाऊन बऱ्याच वर्षापास्नं ते जपानमध्ये राहात आलेले. बेचाळीसच्या जून महिन्यात त्यांनी ह्या आंदोलनाची मुख्य कचेरी बँकॉकला खोलली.

त्यांच्या झेंडयाखाली मला पहिल्यांदा घेऊन जाणाऱ्या मित्राचं नाव एम. शिवराम. दहा वर्षापास्नं हे थायलंडमधे वास्तव्य करून होते. अन् थायलंडमधल्या एकमेव भारतीय वर्तमानपत्राचे ते संपादक होते.

रासबिहारीबाबूंची मुख्य कचेरी त्रेचाळीसच्या मार्चमधे बँकॉकहून सिंगापूरला हलली. म्हंजे ब्रिटिश सैन्यानं सिंगापूर जपान्यांच्या हातात सोपवून दिल्यावर तेरा महिन्यांनी.

मुख्य कचेरी सिंगापूरला हलल्यानंतर चार महिन्यानी—म्हंजे त्रेचाळीसच्या जुलै महिन्यात—नेताजी सिंगापूरला येऊन पोचले. त्यांचा तो ऐतिहासिक पाणबुडीतला प्रवास उरकून. स्वातंत्र्याच्या आंदोलनाची पुरती जबाबदारी नेताजींनी आपल्या खांद्यावर घेतली. म्हाताऱ्या रासबिहारींनी अडतीस कोटी स्त्रीपुरुषांच्या आशा-आकांक्षांचं स्वप्न ज्या राजकीय मानमरातबानं न् गांभीर्यानं तरुण सुभाष-

चंद्रांच्या हाती सोपवलं––तो प्रसंग भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात विसरला जाऊनदेखील कायम राहणारा आहे.

जपानी लोकांचा मुकाबला करण्यात क्रांतिकारक रासविहारी बोसांना कितपत यश मिळालं होतं, त्याची काय फलश्रुती झाली होती––ह्याबद्दल सगळ्यांचं काही एकमत नाही. तरी त्यांच्या वैऱ्यालादेखील एक गोष्ट नक्कीच कबूल करावी लागेल की, आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत रासविहारींचं देशप्रेम तितकंच जळजळीत राह्यलं होतं. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना एकच ध्यास लागून राह्यलेला होता––स्वतंत्र भारतभूमीत आपल्या अस्थी पडाव्यात. त्यांना अंतिम सद्‌गती भारताच्या भूमीतच लाभावी. त्यामुळंच म्हातारपणान हल्ला चढवलेलं दुबळं शरीर घेऊनच ह्या मंत्रसिद्धीकरता त्यांनी देह ठेवला. वादळं उठली, विजा कडाडल्या, तरी ह्या ध्येयापासनं एवढंसुद्धा ढळले नाहीत ते.

४ जुलै १९४३. सिंगापूरच्या कॅथे सिनेमात पाच हजारांवर भारतीय जमले होते. हे होते सबंध पूर्व-आशियातल्या भारतीय नागरिकांचे प्रतिनिधी. ते स्वतःच्या डोळ्यांनी बघायला आले होते एका वृद्ध माणसाकडनं सगळा भार एका तरुणाच्या खांद्यावर ठेवायचा सोहळा. दर्दभऱ्या आवाजात अंतरीची सगळी व्याकुळता ओतून त्या जराग्रस्त क्रांतिकारकानं नेताजींना आवाहन केलं त्या दिवशी. खपून-खपून उभ्या केलेल्या आय-एन-ए न् आय-आय-एल ह्या दोन्ही संघटना त्यांनी ह्या नव्या अग्रदूताच्या हाती दिल्या. त्यांच्या दीर्घ क्रांतिकारी जीवनातलं ते शेवटचं जाहीर भाषण होतं. प्रतिज्ञेप्रमाणं सरसेनापतीचं पद नेताजींच्याकरता त्यांनी सोडलं, हे तर झालंच. पण शिवाय रंगमंचाच्या मागं राहूनदेखील खऱ्याखुऱ्या सैनिकाप्रमाणं त्यांनी नेताजींचे आदेश पाळले.

मूळच्याच सरळ स्वभावामुळं ते हलक्या मनाच्या राजकारणी मंडळींच्या कुटिल भोवऱ्याच्या खूप वर आपोआपच गेले होते. ईर्षा–द्वंद्व–मत्सराचं हीण त्यांच्या पवित्र अंतःकरणाला कधीच शिवलं नाही.

बँकॉकच्या एका हॉटेलमध्ये त्यांची पहिली भेट झाली. तो दिवस मला चांगला आठवतो. बेचाळीसचा मे महिना होता बहुतेक. माझ्या ह्या पहिल्या भेटीचं वातावरण मोठं अद्‌भुत होतं. आता खरं सांगायचं तर त्यांच्या इराद्याबद्दल मला चांगलाच संशय होता. त्याच्यामुळं मनात संकोच, दुविधा न् संशय घेऊनच मी त्यांना भेटायला गेलो होतो.

टेबलासमोरच्या एका खुर्चीकडे बोट दाखवून त्यांनी मला बसायला सांगितलं. मी बसलो. माझ्या डोळ्यांत त्यांनी स्थिर नजरेनं बघितलं एकदा न् ते हसले. ह्या हसण्यामुळंच माझ्या मनातलं मळभ वरचंस दूर झालं. अन् लगेचच मुद्द्यालाच हात घातला त्यांनी. पहिल्याच वाक्यात.

म्हणाले––मिस्टर अय्यर, तुम्ही रॉयटरचे बातमीदार होतात असं ऐकलं.

अजूनही आहात ना ? पण आता जहाज बदलायला हवं ! तुम्ही आमचे बातमीदार बनायला हवं !

त्यांना म्हणायचं होतं, भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात प्रचाराच्या कामाकरता मी पुरता वेळ द्यावा.

त्या महापुरुषाच्या त्या सरळ आवाहनाला तत्काळ तरी मी काहीच महत्त्व देऊ शकलो नाही. मी काही कुणी मोठा माणूस नाही. माझ्या मनात तेव्हादेखील दुविधा-द्वंद्व वगैरेचं ठाण होतंच.

ईश्वराची कृपा म्हणून थोडक्याच दिवसात माझ्या मनाची सगळी दुविधा, संकोच नाहीसा झाला. मी निर्णय घेऊन टाकला.

मग जवळपास रोजच मी त्यांना भेटायचो. इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या प्रचाराची दिशा कोणती असायला हवी ह्याच्याबद्दल त्यांचा सल्ला घ्यायचो. हळूहळू मी रासबिहारींचा एक विश्वासू अनुयायी बनून गेलो.

आझाद हिंद सरकारच्या प्रचार कार्यालयातले दक्ष कार्यकर्ते एम. शिवराम ह्यांच्यामुळं हे सगळं झालं. मित्र, कॉम्रेड अन् सहकारी असे तीन्ही एकाच माणसात मिसळलेले. अन् तो माणूस म्हंजे शिवराम. लढाईनंतरच्या काळात अतिपूर्वेकडच्या राजकारणाचे तज्ज्ञ म्हणून एम. शिवरामचं चांगलं नाव झालं. खरंतर शिवराम त्यादिवशी जबरदस्तीनंच मला रासबिहारींच्याकडे घेऊन गेले होते. नानापरीनं त्यांनी मला लालूच दाखवली होती. गोड बोलून मला भुरळ पाडली होती.

हे सगळं जसं अगदी खरं आहे, तसंच आणखीही एक खरं आहे--एकदा रासबिहारींचा आशीर्वाद मिळाल्यानंतर एकदा त्यांची चांगली ओळख पटल्यानंतर मला त्यांच्यापास्नं खेचून उलटया दिशेला नेण्याची शिवरामची देखील काय बिशाद होती ! रासबिहारींचं शिवरामवर खास प्रेम होतं. अन् ते स्वाभाविकच आहे. कारण रासबिहारींनी बँकॉकमध्ये पाऊल टाकल्यापास्नं शिवरामनं आपलं सगळं त्यांच्या पायाशी ठेवलं होतं. त्या मानानं मी बऱ्याच वेळानं आलो होतो.

सर्वसामान्य लोकांना रासबिहारींची ओळख सर्रास 'सेनसाई' म्हणून होती. सेनसाई म्हंजे जपानी भाषेत गुरुजी. निव्वळ भारतीय अनुयायीच नव्हेत, तर सगळेच लोक त्यांना सेनसाईच म्हणायचे. जपानीपण. पण ते तर म्हणणारच की ! हे नावच त्यांनी दिलेलं !

असे शेकडचांनी क्रांतिकारक लोकांच्या नजरेआड स्वेच्छेनं घेतलेल्या निर्वासनात तिळतिळ धुपासारखे जळून गेलेयत ! त्या धुपाचा सुवास सातासमुद्रापलीकडच्या देशातनं ह्या देशापर्यंत येऊन पोचलाच नाही बहुतेक. पण ह्या सगळ्या देशभक्तांबद्दल विचार करायची एवढीशीसुद्धा फुरसत भारताला अजूनदेखील होत नाही का ?

नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारतवर्षासमोर आत्ता खूपच तातडीची कामं उरकल्यावर विचार करायला जेव्हा उसंत मिळेल, त्याचदिवशी भारत रासबिहारींच्याकरता एक साजेसं स्मृति-

मंदिर इथं उभारेल. ह्या स्मृतिमंदिराच्या भिंतीवर सुवर्णाक्षरात भारत मान्य करेल जपानचं ऋण. आपल्या प्रिय देशभक्ताला जपाननं निवांत आसरा दिला होता. आयुष्य संपल्यावर त्यांच्या देहाला चिरविश्रांती दिली होती जपानच्या मातीनं—ही गोष्ट भारत विसरणार नाही, विसरू शकणार नाही. भारत आपलं कर्तव्य लौकरच पार पाडेल.*

---

* अय्यरजींच्या ह्या समजुतीनंतर पंधरा वर्षांनी २५ मे १९६६ च्या स्टेट्समनच्या अंकात प्रख्यात चरित्रकार श्री. मणी बागची यांच्या पत्राचा काही भाग मी खाली देतोय्—

Sir, It is unfortunate that no adequate steps have been taken by the public or the Govt. to perpetuate the memory of the great freedom fighter, Rash Behari Bose, whose 81st birthday anniversary will be observed today... Suitable memorials to whom should be erected both in Calcutta and Delhi and arrangements made. to bring his ashes back to India from Tokyo.

ह्याच्यानंतर आणखी सहा वर्षं उलटून गेल्यायत. सेनसाईनी अजुनी जपानमधेच पडून आहेत.

'भारतवर्षाची' ती ट्रॅडिशन अजून तशीच आहे !

मी काही आझाद हिंद सेनेचा तपशीलवार इतिहास सांगायला बसलेलो नाही. तसंच हे काही नेताजींचं चरित्रपण नाही. माझ्यापेक्षा जास्ती लायक माणूस ह्या दोन्ही बाबतीत बारीक संशोधन करेल अशी मी आशा बाळगत आहे.

पंचेचाळीसच्या ऑगस्टमध्ये जपाननं अमेरिकेपुढं शरणागती पत्करल्यानंतर मी जेव्हा जपानला गेलो, तेव्हा—मला अजून आठवतंय्—टोकिओत ओमिया पार्कमधल्या थेट गेलेल्या झाडांच्या रांगेखाली असलेल्या एका बाकावर मी गप्प बसून ऱ्हायचो. दिवसामागनं दिवस हे असंच. हातात बायबल असायचं. ते मनातल्या-मनात वाचायचो एकट्यानं. सेंट पीटरसारखं आत्मबळ मिळावं म्हणून मूक प्रार्थना करायचो मी. मनातल्या-मनात म्हणायचो, हे करुणामया, तू मला शक्ती दे, संधी दे—नेताजींच्या लोकोत्तर कीर्तीची कहाणी जगातल्या लोकांना ऐकवून जाता येऊ दे मला. मी तीळभरसुद्धा अतिशयोक्ती करणार नाही. जे दोन्ही डोळ्यांनी पाह्यलंय्, दोन्ही कानांनी ऐकलंय्—तेच तेवढं सांगून टाकीन नम्र श्रद्धेनं. सत्याचा आसरा घेणाऱ्या निर्भय साक्षीदारासारखं.

जगदीश्वरानं माझी प्रार्थना मंजूर केली होती.

मला पकडून घेऊन गेले दिल्लीला. लालकिल्ल्यातल्या ऐतिहासिक न्यायालयात उभं करण्यात आलं मला—साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत !

हे माझं श्रद्धेचं अर्घ्य अगदी व्यक्तीगत आहे. भक्तीनं नम्र झालेल्या शिष्याची गुरूला श्रद्धांजली ! नेताजींच्या पायावर वाह्यलेल्या ह्या श्रद्धेच्या अर्घ्यांत लौकिक दृष्टीनं काही त्रुटी कदाचित् तुमच्या नजरेला पडतील. माझी वाचकांना अगदी कळकळीची विनंती आहे—लक्षात ठेवा, हृदय पिळवटून त्यातनं निघालेला हा आर्तनाद आहे. मला व्हायचं होतं निव्वळ—Unto him, a witness !

ही माझी प्रत्यक्ष साक्षीदाराची जबानी आहे. हिच्या मुळाशी दोन उद्दिष्टं आहेत. पहिल्यांदा संबंध भारतवर्षासमोर मला एक गोष्ट ठेवायच्याय्. की किती प्रचंड अनावर उत्साहानं, मृत्यूवर जय मिळवणाऱ्या प्ररणेनं मत्त होऊन लक्षावधी माणसं धावली होती. त्या रक्ताळलेल्या वाटेनं—ती वाट सुरू झाली होती. सिंगापुरातनं न् संपली होती दिल्लीत. त्या रक्तानं न्हालेल्या रस्त्याच्या कडेला आयुष्यांतला शेवटचा नमस्कार करून लोळण घ्यायची काय ती वेडी व्याकुळता ! आधी कोण जीव वेचणार ह्याचीच तारांबळ, घाई ! रक्ताळलेल्या ओठांनी 'चलो दिल्ली' हा मंत्र जपत-जपत टोळक्या-टोळक्यांनी ते जमिनीवर पडले !

पण हाय ! तरीही सगळेच काही मरून गेले नाहीत. निदान पंधरा हजार तरी माणसं जिवंतच येऊन पोचली भारताच्या भूमीत. ती मेली नाहीत ह्याच का त्यांचा गुन्हा होता ? ते जिवंत आहेत ह्याच का त्यांचा गुन्हा झाला ? तर मग आज त्यांची अशी दुर्दशा का ? व्हाइसरॉयच्या प्रासादावर आज जो झेंडा फडकतोय्, ते आश्चर्यानं पाहतात, आपलाच झेंडा आहे की हा ! लालकिल्ल्यावर ते बघतात—हो, आपलाच तिरंगी झेंडा हा ! पंडित जवाहरलाल नेहरूंनी स्वतः समारंभपूर्वक हा झेंडा फडकवला होता. आपली दोन्ही स्वप्नं पुरी झाली ! इंफाळ न् कोहिमाच्या रक्तानं भिजलेल्या भारताच्या भूमीवर शहीदांच्या प्रेतांचा खच पडलेला असताना त्यांनी ही दोन स्वप्नंच तर बघितली होती ! तर मग आज त्यांची ही दशा काय म्हणून ?

माझ्या प्रत्यक्ष साक्षीदाराच्या जबानीचं दुसरं उद्दिष्ट आहे भारत सरकारला आठवण करून देणं. आठवण करून देणं की नेताजींच्या अस्थि मानानं भारतात घेऊन येणं अजुनी बाकीच आहे ! लालकिल्ल्याच्या मुख्य दरवाजासमोर ह्या पुण्यश्लोक हुतात्म्याचं स्मारक कसंकाय तयार करावं हे आता तरी सरकारनं ठरवून टाकावं.

रंगूनच्या ज्या घरात नेताजी चव्वेचाळीसच्या जानेवारीपासनं पंचेचाळीसच्या एप्रिलपर्यंत राह्यले होते, जियनं त्यांनी हा स्वातंत्र्यसंग्राम चालवला होता, ती इमारत भारत सरकारनं खरेदी करणं उचितच ठरेल. त्यांच्या गळ्यातला फुलांचा हार सात लाख डॉलर्संना विकला गेला होता, त्याच्यावरनं जाऊ नका. घर अगदी छोटंसं आहे. ते घेतल्यामुळं काही भारतीय

नागरिकांच्यावर कराचा प्रचंड बोजा पडणार नाही.

आणखी एक काम बाकी आहे. सिंगापूरच्या समुद्र किनाऱ्यावर आझाद हिंद सेनेतल्या अज्ञात शहीदांच्या नावानं बांधलेलं स्मारक परत एकदा उभं करणं. नेताजींनी स्वतः ह्या शहीद-स्मारकाची कोनशिला बसवली होती पंचेचाळीस सालच्या जुलै महिन्याच्या आठ तारखेला. जपाननं शरणागति पत्करल्यावर विश्वासपण बसणार नाही इतक्या थोडक्या काळात कर्नल स्ट्रॅचींनी हे स्मारक तिथं उभं करून टाकलं होतं ब्रिटिश सैन्य सिंगापुरात यायच्या आधीच. सप्टेंबर महिन्यात ब्रिटिश सैन्य मलायात आलं न् तात्काळ अॅडमिरल माउंटबॅटनच्या हुकमावरनं हे स्मारक जमीनदोस्त करण्यात आलं. ब्रिटिश सैन्यानं असं रानवटपणानं वागायचा आणखी दाखला काही महायुद्धाच्या आख्ख्या इतिहासात नाही !

आझाद हिंद सैनिक आजदेखील घरदार हरवल्यासारखे भटकतायत. ही गोष्ट नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशाला लाजिरवाणी आहे असं नाही वाटत तुम्हाला ? मला आशा आहे की स्वतंत्र भारताचे सध्याचे राज्यकर्ते किमान एवढं तरी मानत असतील की नेताजींनी न् त्यांच्या आझाद हिंद सेनेनं आपल्याला निदान थोडीशी तरी मदत केलेली आहे.

असं असेल तर मग आझाद हिंद सेनेला असं अस्पृश्य करून का ठेवलंय् ? भारतीय सेनेत त्यांना काय--म्हणून परत दाखल होता येऊ नये ? १९४०-४१ साली ते सगळे भारतीय सेनेतच होते. ब्रिटिश भारतीय सेनेत त्यांना पूर्व-आशियात पाठवलं होतं. मग शरण जायला सांगण्यात आलं. तसे ते शरण गेले होते. मग त्याच्याहि नंतर नेताजींच्या झेंड्याखाली एकत्र येऊन भारताच्या स्वातंत्र्याकरता प्राण द्यायलाही त्यांनी मागंपुढं बघितलं नाही. ह्याच्यामुळं ब्रिटिश इंडियाला राग आला तर ते ठीकच आहे. पण स्वतंत्र भारताची सेना का म्हणून त्यांना छातीशी ओढून घेणार नाही ? की आझाद हिंद सेनेच्या मूठभर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सध्याच्या भारत सरकारच्या सावत्र आईसारख्या वागणुकीबद्दल आपला विरोध जाहीर केला म्हणून ही सर्रास सजा ? पण इथं देखील एक गोष्ट लक्षात घ्या--काही थोडक्या लोकांना जरी हा अपमान सहन करता आला नाही तरी बहुतेकच आझाद हिंद सेनेचे सैनिक एक शब्ददेखील बोललेले नाहीत, एकदासुद्धा त्यांनी आपला निषेध नोंदवलेला नाही. अन् तरीदेखील अशी सरसकट सजा ?

स्वतंत्र भारताच्या तिरंगी झेंड्यावरला हा काळा डाग डोळ्यात खुपण्यासारखा आहे. तो धुऊन काढायलाच हवा.

१९४६ मध्ये १४ एप्रिलच्या ‘हरिजन’च्या अंकात महात्माजींनी लिहिलं होतं :

‘आझाद हिंद सेनेला आपलं तात्कालिक ध्येय जरी गाठता आलं नसलं, तरी त्यांच्या हातनं जेवढंकेवढं काम झालंय्, ते त्यांनी अभिमान बाळगावा

असंच आहे. त्यांचं सर्वात मोठं यश म्हंजे वेगवेगळ्या धर्मांची न् जातींची माणसं एकाच झेंड्याखाली एकत्र आली होती. सगळा एकांगीपणा, फुटीरपणा न् धार्मिक कडवेपणा गाडून टाकून त्यांनी एकतेच्या महामंत्राची दीक्षा घेतली होती. त्यांनी घालून दिलेला हा धडा आज आपण गिरवण्याजोगा आहे.'

पाच वर्षं ते भारतीय सेनेत नव्हते. पण तेवढ्या सबबीवर परत भारतीय सेनेत यायचा त्यांना अधिकारच नसावा हे कुणाला पटेल ? अन् ह्यात सैनिकांचा काय दोष ? सेनेतल्या वरिष्ठ मंडळींनीच उलट आपली चूक सुधारून घ्यावी. अगदी किमान जे आहे ते तरी त्यांनी करावं. त्यांनी मोकळ्या मनानं कबूल करून टाकावं की ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतीय सेनेच्या वतीनं आझाद हिंद सेनेबद्दल जे विषारी उद्गार न् हुकुमनामे काढून ठेवलेयत् ते स्वतंत्र भारताच्या हिताच्या विरुद्ध आहेत. आझाद हिंद सेनेत सामील झालेल्या सैनिकांचा बाकी पगार ताबडतोब चुकता करून टाकावा. अन् अगदी थोडी का होईना पण काही रक्कम त्यांना नुकसानभरपाईची म्हणून मानानं मिळायला हवी. निव्वळ आर्थिक तंगीमुळंच ही सोय करता येत नसेल तर माझी हात जोडून विनंती आहे की तसं जाहीरपणानं कबूल तरी करा. आझाद हिंद सेनेच्या सैनिकांच्या वतीनं मी नि.संदिग्धपणं असं सांगून टाकतो की, बाकी पगाराची आपली मागणी ते आपणहोऊन मागं घेतील. ज्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याखातर मशिनगनसमोर छाती उघडी करायला ते डगमगले नाहीत, त्या गरीब देशाकरता उपाशीपोटी मरायलापण ते तितकेच तयार आहेत, हे मला ठाऊक आहे.

ब्रिटिशांचं राज्य गेल्या गेल्या लगेचच सुरवातीलाच आझाद हिंद सेनेला देशाच्या फौजेत का सामील केलं गेलं नाही ? भारतीय सेनेच्या काही वरिष्ठ मंडळींचा ह्याला विरोध होता म्हणं. त्यांच्या ह्या परधार्जिण्या मनोवृत्तीबद्दल मी काही बोललो तर ते अभिरुचीच्या मर्यादा सोडून जाईल कदाचित्. देशाचं हित लक्षात घेऊन मी त्याच्याबद्दल काहीच बोलत नाही कसा ? पण सेनेच्या कर्णधारांच्या वर मंत्रिमंडळ आहेच की. त्यांना काही खंबीरपणा दाखवता आला नसता ? आम्ही मागणी काहीच करत नाही आहोत. आमचं म्हणणं एवढंच आहे की---आम्ही काही भीक मागत नाही एवढं लक्षात ठेवा. आमची कथा तुम्हाला ठाऊक झालेली आहे. आता तुमच्या विवेकाप्रमाणं आम्हाला जे मिळायला हवं असं तुम्हाला वाटत असेल, तेवढंच आझाद हिंद सेनेच्या पदरात टाका ना !

पण ह्या अन्यायाला आणखीही बाजू आहे, ती आल्याय् का तुमच्या लक्षात ? हा अन्याय, हे नुकसान, ही फसवणूक काही फक्त आझाद हिंद सेनेची नाही—ती सबंध भारतवर्षाची आहे. नदीचा हा तीर मोडून काढला की तो तीर काही आपोआप बांधला जात नाही. शिवाय अशीपण एक दृष्टी असते की

जिच्यामुळं दोन्ही तीर एकाचवेळी मोडून पडतात. भारतीय सेनेच्या मूठभर बड्या धेंडांच्या मानापमानाच्या कल्पनेकरता आझाद हिंद सेनेसारख्या दक्ष देशप्रेमी सेनेच्या सेवेला भारतवर्ष का म्हणून पारखा होईल? भारत स्वतःचं असं नुकसान कशाला करून घेईल? आझाद हिंद सेनेतल्या बहुसंख्य सैनिकांना भारतीय सेनेत परत घेणं योग्य ठरेल. तेच त्यांचं एकमेव स्थान आहे एक-दोघांची नावं घेतो. म्हंजे शाहनवाज, सैगल, धीलन, रातुडी, मेहरदास, महबूब अहमद, गुलजारासिंग, ठाकूरसिंग, प्रीतमसिंग वगैरे लोक. ह्यांच्यापैकी प्रत्येकाला मी फार जवळून ओळखतो. भारतमातेचं दुर्दैव––ह्या वीर संतानांची सेवा आज तिच्या कारणी लागत नाही! ह्या पोरांना तिनं टाकून दिलंय्!

आझाद हिंद सेनेच्या विरुद्ध असल्याचं जाळं पसरून खोटे विषोद्गार काढणारे ब्रिटिश राज्यकर्ते होते. त्यांच्यातलेच शेवटचे तीन धुरंधर––लॉर्ड वेव्हेल, लॉर्ड माउंटबॅटन न् सर क्लॉड अचिनलेक. ह्या त्रिमूर्तींनी ज्यांच्या हातात राजदंड दिला त्या भारतभाग्य-नियंत्यांच्या टोळक्यानं हा खोटारडा प्रचार निमूट गिळला––हे आमचं दुर्दैव आहे! अर्थात् हे झालं त्यात अस्वाभाविक काहीच नाही. कारण कॅबिनेट मिशनच्या ह्या त्रिमूर्तींनी दिल्लीत ठाण मांडलं होतं, तेव्हा भारतीय नेते त्यांच्या मागंमागं रात्रंदिवस सावलीसारखे फिरत असायचे.

मला काही मोह नाही. तरी नाव कशाला घेऊ उगाच? भारताच्या एका तथाकथित भाग्यविधात्यानं स्वच्छच म्हटलंय् की–– 'आय-एन-एचे ऑफिसर्स अन् सैनिक हे सगळेच काही शूरवीर नव्हते.' ह्या तुच्छतेचा मी नम्रपणानं स्वीकार करतो. आम्ही सगळेच एकजात शूरवीर होतो असा दावा तर आम्हीदेखील केलेला नाही कधीच! पण मला एक पालटा प्रश्न विचारायचाय्. बॅरिस्टरसाहेबांच्या ह्या म्हणण्यातनं असा एक अर्थ निघतो की आय-एन-एचे निदान काही थोडे लोक––मग भले ते मूठभरच का असेनात––शूरवीर होते असा अर्थ निघतो ना? ठीक तर मग. ह्या मूठभर काही लोकांनाच तेवढं निवडून निवडून घ्या ना तुमच्या सैन्यात! द्या त्यांना देशाकरता जीव वेचायचा अधिकार! अन् हे जर जमत नसेल तर मग निदानपक्षी स्वतःचं म्हणणं मागं घ्या. अन् हिंमत करून म्हणून बघा की––'आय-एन-एचे ऑफिसर्स अन् सैनिक सगळेच भेकड होते' म्हणून!

आणखीपण एक अजबच आरोप केला जातो. हसावं का रडावं तेच कळत नाही! आझाद हिंद सेनेचे कुणी-कुणी विश्वासघातकी सैनिक म्हणे पाकिस्तानी सैन्यात दाखल झालेयत! सगळेच अपमान आम्ही सहन केलेयत. तसा हा पण सहन करू! पण हा वार अचानक कमरेखाली झाला ना, त्यामुळं तोंडातनं किंकाळी बाहेर आली इतकंच. एक प्रश्न अगदी नम्रपणानं पेश करू का? सद्गृहस्थहो, पाकिस्तान कुणी बनवलं? आझाद हिंद सेनेनं? रायफल अन् रेशन वाहाण्यातच आमची पाठ

मोडून गेल्याय्. खरंच सांगतो, कोहिमा इंफाळच्या वाटेवर त्या बोजाच्यावर आणखी एक गवताची काडीपण पेलायची ताकद नव्हती आमच्यात. जातीयता काही पूर्व आशियातनं पाठीवर घेऊन आलो नाही आम्ही! रक्तानं न्हालेला आझाद हिंद सेनेचा सैनिक जेव्हा आपल्या जन्मभूमीत पोचला, तेव्हा पहिल्यांदा त्याला कळलं की तुम्ही म्हणे रक्तपाताविनाच आझादी मिळवल्याय्, मातृभूमीचे दोन तुकडे करून! त्यामुळं नाइलाजानं कानपूरच्या अधिवेशनात आझाद हिंद सेनेच्या सल्लागार मंडळाला असं सांगावं लागलं की ज्यांची जन्मभूमी पाकिस्तानात पडत असेल, त्यांनी पाकिस्तानचं नागरिक व्हावं म्हणून. पाकिस्तान सरकारचा हुकूम त्यांनी पाळावा म्हणून. असा निर्णय घेण्यात आमची काही चूक झाली असेल तर तसं सांगाना छातीठोकपणानं!

ह्याच्याही नंतर एक लहानसा प्रश्न शिल्लक आहेच. असा सल्ला दिल्यावरदेखील जे मुसलमान पाकिस्तानात गेले नाहीत, त्यांना का म्हणून सैन्यात घेतलं नाही तुम्ही? मला असे कित्येकजण ठाऊक आहेत. एकतर त्यांच्यातला अगदी लख्ख हिरा आहे. त्याला लष्करात वरिष्ठ पद द्यायला मागपुढं पाह्यलं नसतं पाकिस्ताननं–पण तो मुसलमान, आझाद हिंद सेनेचा अधिकारी भारतातच राहून गेला. सामान्य मुलकी नागरिक म्हणून!

माझ्या मूळ मुद्यावर परत येतो. मी तुम्हाला नेताजींची गोष्ट ऐकवणाराय्. त्यांचं मृत्युंजयी शौर्य, त्यांची लोकोत्तर प्रतिभा, त्यांचा दुर्दम्य आशावाद, त्यांची मुत्सुद्देगिरी अन् आध्यात्मिक विश्वातलं त्यांचं साफल्य. ह्या सगळ्या गोष्टी जर मला नेटक्या भाषेत सांगता आल्या नाहीत तर––ध्यानात ठेवा–– ती त्रुटी माझी आहे. निव्वळ माझी. एक कुणीतरी म्हणालं होतं की त्यांच्या व्यक्तिमत्त्वात तीन युगांचे तीन भारतीय महामानव मूर्त झाले होते––अकबर, शिवाजी अन् विवेकानंद. ह्यातनंसुद्धा त्यांची पुरती ओळख मिळत नाहीच, एवढंच मी म्हणेन.

आपल्या समाजाचं दुर्दैव असं आहे की नेताजींच्या नावाची पण आपल्याला आज आठवण होत नाही. आज जिकडे नजर टाकावी तिकडे समस्या भयंकर रूपानं आपल्यासमोर उभ्या राहतायत. ह्या समस्यांना निमिषार्धात नाहीसं करता आलं असतं आपल्याला. नेताजींच्या संदेशाकडे, प्रेरणेकडे आपल्या समाजाच्या नियंत्यांनी अशा उपेक्षेनं पाह्यलं नसतं तर. नेमक्या ह्याच समस्यांनी नेताजींच्या आसपासपण डोकं वर काढलं होतं, हे मी पाह्यलंय्. अन् हेही पाहयलंय की काही आठवड्यांच्या काळात ह्या सगळ्या समस्या नेताजींनी नेस्तनाबूत करून टाकल्या. जात-धर्म मधे न येता पूर्वआशियातल्या तीस लाख माणसांची अनिर्बंध सहानुभूती अन् अनुयायीत्व मिळालं होतं त्यांना. भारतीय महासागरापास्नं प्रशांत महासागरापर्यंतच्या आठ देशात एकतेच्या ह्या महामंत्रानं आपलं साम्राज्य पसरवलं होतं. तिथं कुणी हिंदु-मुसलमान नव्हते, कुणी शीख ख्रिश्चन नव्हते. कुणी बंगाली नव्हते, बिहारी नव्हते, मद्रासी नव्हते, पंजाबी नव्हते, मराठी नव्हते. आम्ही सगळेच

होतो भारतवासी ! ब्रह्मदेश, मलाया, थायलंड, इंडोनेशिया, फिलिपाईन, चीन अन् जपाननं कबूल केलं होतं त्यांचं एकमुखी नेतृत्व. हे त्यांना कसं काय शक्य झालं ह्याचा विचार तुम्ही नाही करून बघणार ? त्यांना तुम्ही मान द्या किंवा देऊ नका--त्यात त्यांचं काहीच जात नाही. पण त्यांचा हा जादूचा मूलमंत्र आपल्या स्वार्थाकरता वापरायचा तरी प्रयत्न करू नका. बघा ना, ह्या मूलमंत्राचा प्रयोग आजच्या भारतवर्षात नव्यानं करता येतो का नाही ते.

ह्या मंत्रानं तुम्हाला कदाचित् आजच्या सैतानांना थंड करता येईल ! ह्या मंत्राच्या जोरावर कदाचित् सहा महिन्यांच्या आतच उखडून टाकता येईल नफ्याची लूटमार करणाऱ्या काळ्याबाजारी भांडवलदारांना ! लगाम घालता येईल लाचखाऊ बशिलेबाज नोकरशहांना ! मानगूट धरून खेचून खाली आणता येईल ह्या सगळ्या आपमतलबी कटवाज मंत्र्यांना !

ते स्वतःच इथं पोचले असते तर एका सहामाहीतच त्यांच्या झेंड्याखाली गोळा झाले असते भारतातले करोडो लोक ! मजूर, शेतकरी, कामगार, खालच्या वर्गातली, मध्यमवर्गातली करोडो माणसं ! अन् स्वार्थानं आंधळे झालेल्या तथाकथित मूठभर नेत्यांच्या हातनं त्यांनी छिनून घेतला असता देशाचा मंगलकलश ! पाच-सहा वर्षांच्या काळातच ही सुजला-सुफला मातृभूमी खरोखरीच भरून गेली असती पिवळ्याधमक पिकानं !

मी काय भर दिवसाढवळ्या हे स्वप्न बघतोय् ? नाही मित्रा, तसं काही नाही. उलट मी गुन्हाच केलाय् ह्या सगळ्याला 'कदाचित्' न् 'जर-तर'-ची जोड देऊन ! कारण ह्यात 'जर-तर' कसलं ? हा माझा दृढ विश्वास आहे, पक्का निर्णय आहे ! त्यांना अगदी सहजगत्या हे स्वप्न खरं करता आलं असतं ! तशी धमक होती त्यांच्यात. मी साक्षी आहे त्याला !

मला तुलना-बिलना करायची इच्छा नाही. तुलना करायला बसलं तर समुद्र-मंथनातनं जसं हलाहल बाहेर पडलं, तसं ह्याच्यातनंदेखील मत्सराचं हलाहल बाहेर पडेल. म्हणून आपल्या कोणत्याच नेत्याबरोबर मी नेताजींची तुलना करणार नाही. तरी आज चोहीकडे जे दिसतंय् ते बघितल्यावर माझा आत्मा रक्तबंबाळ होऊन ओरडायला पहातोय्-- Netaji ! Thou shouldst be living at this hour ! India hath need of thee !

देश फार मोठा आहे. गांधी-सुभाषचंद्र-वल्लभभाई-नेहरू ह्या सर्वांच्या प्रतिभेची बेरीज केली तरी देश तिच्यापेक्षा मोठा आहे ! ही मातृभूमी मत्सराच्या विषानं जर्जर व्हायची शक्यता असल्यामुळंच मला काही तुलना वगैरे करायची नाही. माझं म्हणणं फक्त एवढंच आहे की नेताजींच्या मंत्रामुळंच हा दीणवाणा भारतवर्ष परत आपल्या मानाच्या आसनावर विराजमान होईल असं जर देशाला वाटत असेल, तर मग निःसंकोच तो मंत्र घेतला पाहिजे. त्यामुळे कुठला नेता जर चिडणार असेल, तर त्या धुसफुशीकडे लक्ष देण्याइतकी फुरसत काही आपल्याला नाही.

[ पुढील अंकी चालू ]

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH–649

तूफान

कुर्बानी

आणि

शनवारवाड्यातील शमादान

व. मो. पुरंदरे

यांच्या

तीन

कथांचा

संग्रह

राजहंस प्रकाशन

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**